(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ. शी. : मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक

मु. शी. : L.A. BILL NO. XLI OF 2009

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948, THE BOMBAY POLICE ACT, 1951 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)
AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.

(विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रश्न पुन्हा प्रस्तुत करण्यात आला .....

उपसभापती : विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, सय्यद पाशा पटेल यांचा प्रस्ताव आहे. त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा.

प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपसभापती : यानंतर विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांचा प्रस्ताव आहे. त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा.

प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपसभापती : यानंतर विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, परशुराम उपरकर, डॉ.दीपक सावंत यांचा प्रस्ताव आहे. तो त्यांनी मांडावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकावर सर्वप्रथम सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम आपले विचार मांडणार आहेत. त्यानंतर मी माझे भाषण करणार आहे. तत्पूर्वी मी एक बाब सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो. मी या विधेयकाला उपसूचना सुचविल्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

होत्या. तत्कालीन मुख्यमंत्री यांनी माननीय नगरविकास राज्यमंत्री व नगरविकास विभागाचे सचिव यांच्यासमवेत एक बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये मी सुचविलेल्या उपसूचना स्वीकारण्याचे त्यांनी मान्य केले होते. उपसूचना मान्य करुन विधानसभेत विधेयक सादर करण्यात येणार होते. बैठकीच्या दिवशी सायंकाळी 4.30 वा 5.00 वाजले होते व पावसाळी अधिवेशनाचा शेवटचा दिवस होता. शासनाच्या वतीने सांगण्यात आले होते की, पुढील अधिवेशनात उपसूचना सुचविल्याप्रमाणे विधेयक मंजूर करुन घेण्यात येईल. म्हणून मी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी हे विधेयक चर्चेला घेण्याची विनंती कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये केली होती. त्या विनंतीनुसार हे विधेयक सभागृहापुढे चर्चेला आलेले आहे. मी मुद्दाम माननीय मंत्रीमहोदयांच्या निदर्शनास आणून देत आहे की, तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी बैठकीमध्ये उपसूचना स्वीकारण्याचे मान्य केले होते. नगरविकास विभागाच्या सचिवांनी देखील मान्य केले, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. कारण हा महानगरपालिकांच्या स्वायत्ततेचा विषय आहे. शासनाने तो स्वीकारला त्याबद्दल धन्यवाद. मी या विधेयकावरील माझे विचार नंतर मांडणार आहे.

उपसभापती : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे तो मांडावा.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक -41 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948, मुंबई पोलीस अधिनियम, 1951 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक दोन्ही सभागृहाच्या 35 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्याच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव या प्रस्तावांवर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर सर्व प्रथम विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मताला टाकला जाईल. तो असंमत झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल.

आता सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मुंबई शहराची आजची अवस्था पाहिली तर वाढत जाणाऱ्या झोपडपट्टया, वाढती रहदारी यामुळे अनेक बिकट समस्या निर्माण झालेल्या आहेत. मुंबई शहरातील एकही फुटपाथ मोकळा असल्याचे दिसून येत नाही. नागपूर शहरात आल्यानंतर काही अंशी समाधान वाटले. किमान काही भागातील फुटपाथ मोकळे दिसून येतात. मुंबई शहरामध्ये मात्र फुटपाथ कशासाठी निर्माण केले आहेत हेच कळून येत नाही. फुटपाथ कोणासाठी आरक्षित ठेवले आहेत? या प्रश्नाचे उत्तर शासनाकडून मिळणे क्रमप्राप्त आहे. मुंबई शहरामध्ये अनधिकृतरित्या निर्माण केल्या जाणाऱ्या झोपड्या, अनधिकृतपणे चालणारे व्यवसाय व धंदे, पिण्याच्या पाण्याची समस्या, नव्याने उभारल्या जात असलेल्या उत्तुंग इमारती यांचा विचार करता हे शहर आता नागरी सुविधांच्या दृष्टीने आवाक्याबाहेर गेलेले आहे. मुंबई शहर प्रशासनाच्या हातामध्ये आहे की, पूर्णपणे अतिरेकी आणि बांगलादेशी नागरिकांनी व्यापले आहे,

(नंतर बी.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

असा प्रश्न देखील मला पडला असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. म्हणून एका बाजूला या सभागृहात मुंबईच्या विविध प्रश्नांवर चर्चा करीत असताना मी असे निदर्शनास आणून देणार आहे की, मे. ह्युमन रिसोर्सेस कन्सल्टन्सी या कंपनीने सबंध जगाचा सर्व्हे केला असता त्यामध्ये कोलंबो शहरापेक्षाही मुंबईचा शेवटचा नंबर लागतो. त्याचबरोबर संपूर्ण जगातील 350 शहरांच्या राहणीमानाच्या निरीक्षणात सुध्दा मुंबईचा शेवटचाच नंबर लागतो. वास्तविक मुंबई महानगरपालिका ही आशिया खंडातील सर्वात मोठी महापालिका असून तिचे बजेट हे एखाद्या छोट्या राज्यापेक्षाही मोठे असते. असे असताना याच मुंबई शहराची एवढी दयनीय अवस्था असावी ही बाब निश्चितपणे शोभादायक नाही. मी लहानपणापासून मुंबईतच राहिलो आहे त्यामुळे मी या शहराला अगदी जवळून ओळखतो. कालची मुंबई आणि आजची मुंबई यामध्ये जमीन-असमानचा फरक आपल्याला दिसून येईल. मी शक्यतोवर राजकीय भाषण करणार नाही पण काही गोष्टींचे स्पष्टीकरण मात्र शासनाकडून येणे अत्यंत गरजेचे आहे, असे मला वाटते. या मुंबईतूनच केंद्रशासनाला आपण कराच्या माध्यमातून जवळपास 1 लाख कोटी रुपयांचा महसूल देत असतो व त्या निमित्ताने मागील वेळेस माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांना मी सहजपणे एक प्रश्न विचारला होता की, आपण जेवढी रक्कम करापोटी देतो त्या रकमेच्या 10 टक्के रक्कम, जी आपल्या हक्काची आहे तेवढी जरी मुंबईच्या विकासासाठी केंद्रशासनाने मुंबईसाठी दिली तरी मुंबईच्या विकासाला चांगली चालना मिळाली असती. आज मुंबईची अशी दयनीय अवस्था राहिली नसती. त्यावर माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. परंतु मला असे म्हणावयाचे आहे की, ज्या मुंबईचे कपडे विकून तिला विवस्त्र करुन त्याच पैशाने आपण इतर राज्ये सजविता हे कुठल्या नैतिकतेत बसते? शासनाने या विधेयकात काही चांगल्या बाबी समाविष्ट केल्या त्याबद्दल वाद नाही पण मी मागणी केली होती की, करापोटी जेवढी रक्कम देतो त्याच्या 10 टक्के रक्कम म्हणजेच 10 हजार कोटी एवढी आमच्या हक्काची रक्कम तरी आम्हाला द्यावी. या शासनाकडे मुंबईचा लोकप्रतिनिधी भीक मागता अशातला भाग नाही तर ती आमच्या हक्काची रक्कम आहे, म्हणून ती दिली पाहिजे. पण फक्त निवडणुका येतात तेव्हा मात्र माननीय पंतप्रधान येतात, माननीय मुख्यमंत्री सुध्दा सांगतात की, मुंबई महापालिका आमच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

हातात द्या, आम्ही तुम्हाला मदत करु, अशी राजकीय भाषणे करुन आपली पोळी भाजण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा प्रकारे सतत केंद्रशासन आणि राज्य शासनाकडून या मुंबई महापालिकेवर अन्याय होत आहे. म्हणून एकदा स्पष्ट झाले पाहिजे की, मुंबईतून जाणाऱ्या करापोटी कोट्यवधी रुपयाची रक्कम आपण केंद्रशासनाला देतो, त्या रकमेतून अनेक राज्यांचा विकास होत आहे पण मुंबईला मात्र विकासापासून वंचित ठेवण्यात येत आहे. त्या रकमेतून किती टक्के रक्कम मुंबईच्या विकासासाठी देणार आहात. वास्तविक आजच्या विधेयकाच्या निमित्ताने जी महत्वाची चर्चा होत आहे तेव्हा या चर्चेच्या वेळेस माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक होते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय सदस्य व माजी विरोधी पक्ष नेते श्री. रामदास कदम हे कोणत्या विषयावर बोलत आहेत ते स्पष्ट होत नाही. आज सभागृहासमोर सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 41- मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका नागपूर शहर महानगरपालिका, मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक,2009 आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य केवळ मुंबई महानगरपालिकेपुरतेच बोलत आहेत. परंतु या विधेयकामध्ये केवळ मुंबई महानगरपालिका नसून राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा यांच्याशी संबंध आहे. सन्माननीय सदस्य केवळ मुंबईतील हॉकर्स झोनच्या बाबतीतच उल्लेख करीत आहे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, विधेयक क्रमांक 41 हे मी चांगल्या प्रकारे वाचले आहे. हे बील माझ्यासाठी नवीन नाही. मुंबईच्या विकासाच्या दृष्टीने हॉकर्स झोन हा महत्वाचा मुद्दा असल्याने मी त्यापासून सुरुवात केलेली आहे. मुंबईच्या हॉकर्स झोनचा विषय फार महत्वाचा आहे त्यामुळे मी मुंबई पासून सुरुवात केलेली आहे. आज मुंबई बकाल झाली आहे, मुंबई विकासापासून वंचित राहत आहे. मुंबईचा निधी मुंबईला कधीही मिळत नाही. मुंबईला निधी उपलब्ध करुन देण्याचे काम पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्याचे असल्यामुळे मी माझ्या भाषणात मुख्यमंत्र्यांचा उल्लेख केला होता.

सभापती महोदय, मुंबईमध्ये फेरीवाले कसे काय येऊन बसतात, मुंबईतील फेरीवाले कोण आहेत ? या ठिकाणी मुख्य विषय परप्रांतीयांच्या लोंढयाचा आहे. मुंबईमध्ये 99 टक्के फेरीवाले हे उत्तर भारतीय आहेत. मुंबईला बकालपणा हा परप्रांतीयांच्या लोंढयामुळेच येत आहे. त्यामुळे मुंबईत येणारे परप्रांतीयांचे लोंढे आपण थांबवणार आहात की नाही ? या सभागृहात तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी असे आश्वासन दिले होते की, मुंबईचा बकालपणा नष्ट करण्यासाठी किंवा फुटपाथवर ज्या झोपडया होतात त्याची जबाबदारी जॉईन्ट कमिशनर आणि त्या भागातील पोलीस इन्सपेक्टरवर सोपवली जाईल व ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या झोपडया होतील किंवा अनधिकृत बांधकाम होईल त्यावेळी त्या ठिकाणच्या जॉईंट कमिशनरला व पोलीस

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

इन्सपेक्टरला सस्पेंड केले जाईल. त्यामुळे मी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांना विचारु इच्छितो की, आपण आतापर्यंत मुंबई महानगरपालिका किंवा नागपूर महानगरपालिकेतील किती जॉईंट कमिशनरांना आणि पोलीस इन्स्पेक्टरांना सस्पेंड केलेले आहे ? मला वाटते मा. मंत्री महोदय या प्रश्नाचे उत्तर देऊच शकणार नाहीत. आपण अनाधिकृत झोपडपट्टी विरोधात कायदा केलेला आहे, माजी मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात घोषणाही केली आहे परंतु आपण कायद्याची अंमलबजावणी करीत नसल्यामुळे मुंबईत अनधिकृत झोपडयांची संख्या वाढते आहे. आपण जर कायद्याची अंमलबजावणी केली असती तर मुंबईत किंवा इतर ठिकाणी अनधिकृत झोपडपट्टया झाल्या नसत्या. त्यामुळे या विधेयकाच्या निगडीत ब-याच गोष्टी आहेत.

सभापती महोदय, अनधिकृत झोपडपट्टयांचा विषय कोणी निर्माण केलेला आहे ? आज मुंबईमध्ये अनेक फुटपाथवर फेरीवाले बसले आहेत. आपण जर या कायद्याची अंमलबजावणी केली असती तर मुंबईमध्ये झोपडया झाल्या नसत्या, परप्रांतीय आले नसते व फुटपाथवर फेरीवाले बसले नसते.

श्री. जयंत प्र.पाटील : (खाली बसून) : कृपाशंकर सिंह सुध्दा मुंबईत आले नसते.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, हे वाक्य मी मागच्या वेळेस सुध्दा बोललो नव्हतो. शक्यतो वाद निर्माण होऊ नये यासाठीच हे वाक्य मी उच्चारले नव्हते. त्यावेळेस सन्माननीय श्री. जयंत पाटील यांनी असे म्हटले होते की, परप्रांतीयांना रोखले नाही तर उद्या या राज्याचा मुख्यमंत्री पदी श्री. कृपाशंकर सिंह हे सुध्दा बसलेले आपल्याला पहावे लागेल. यासंदर्भात अनेक वर्तमानपत्रात याबाबत माहिती छापून आली होती. यामध्ये अनेक लोकांनी राजकरण करण्याचा देखील प्रयत्न केला होता. हा जो उल्लेख आहे तो उल्लेख मी कधीही केला नव्हता.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

केंद्रीय अवजड उद्योग मंत्री श्री.विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री असताना म्हणाले होते की, "आता कुठेतरी हे लोंढे थांबले पाहिजेत."

सभापती महोदय, मुंबई शहराचे एकूण क्षेत्रफळ 737 चौ.कि.मी. आहे. सात बेटांचे मिळून मुंबई शहर झालेले आहे. आज या मुंबईची अवस्था अतिशय बकाल झालेली आहे. मी मघाशी माननीय मुख्यमंत्री यांचा यासाठी उल्लेख केला होता की, आज मुंबई शहरात त्यांनी एक फेरफटका मारावा. मुंबईतील प्रत्येक पदपथावर उत्तर भारतीयांनी कब्जा केलेला आहे. एक उत्तर भारतीय वर्षभर त्याठिकाणी धंदा करतो आणि त्या धंद्यातून मिळालेली कमाई नंतर आपल्या घरी ठेवण्यासाठी गावी जातो. गावी जाताना आपली जागा दुसऱ्या उत्तर भारतीयाला भाड्याने देतो. जागा मुंबई महानगरपालिकेची आणि त्या जागेचे भाडे एक उत्तर भारतीय घेतो... (अडथळा).. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप आपल्याला घाई का आहे ? ... आपण दोघेही भाई आहोत.. (अडथळा).. सभापती महोदय, "आप तो भाइयों के भाई है"...

सभापती महोदय, मी याठिकाणी गंभीरपणे सांगू इच्छितो की, आता याठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित असते तर बरे झाले असते. कारण माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी 20 वर्षापूर्वी सांगितले होते की, "परप्रांतियांचे लोंढे थांबविले पाहिजेत". त्यावेळी त्यांचेवर जातीयवादी व परप्रांतिय विरोधी असा शिक्का मारण्यात आला. माननीय शिवसेनाप्रमुख 20 वर्षापूर्वी बोलले होते ते आज माननीय मुख्यमंत्री तसेच मंत्री बोलत आहेत की, "लोंढे थांबले पाहिजेत." आज परप्रांतियांनी मुंबई आणि नागपूर शहर उद्ध्वस्त करण्याचे पाप केलेले आहे.

सभापती महोदय, आज मुंबई शहरातून मराठी माणसाचा टक्का कमी झालेला आहे. काही वर्षापूर्वी लालबाग व गिरगावात गिरणी कामगार हातात डबे घेऊन गिरणीत जाताना दिसायचे. आम्हाला गिरण्यांचे भोंगे ऐकायला मिळायचे, असे चित्र होते....(अडथळा)..एखाद्या मराठी माणसाने कोहिनूर मिल घेतली तर ते लगेच आपल्याला दिसते, परंतु परप्रांतीय जे उद्योग करीत आहेत ते आपणास दिसत नाहीत. मी बोलत असताना श्री.भाई जगताप यांनी तरी मध्ये बोलू नये. कारण आम्ही दोघेही कोकणातील आहोत. कोकणी माणसाला खेकड्याची उपमा दिली जाते. कोकणामध्ये कोळी खेकडे पकडण्यास जातो त्यावेळी सोबत एक टोपली घेतो. एक खेकडा पकडल्यानंतर तो

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

टोपलीत टाकतो आणि लगेच ती टोपली झाकणाने बंद करतो. पण दुसरा खेकडा टोपलीत टाकल्यानंतर झाकणाने टोपली बंद करीत नाही. कारण त्याला माहीत असते की, एक खेकडा वर जायला लागला तर दुसरा खेकडा त्याचे पाय ओढून त्याला खाली खेचतो.

यानंतर श्री.गायकवाड...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे सभागृहात आले होते तेव्हा त्यांनी गळयात काळा लांब पट्टा अडकवला होता तेव्हा त्या मागचा त्यांचा इरादा काय आहे हे मला त्यांना विचारावयाचे आहे.

उपसभापती : याबाबतीत मी त्यांना खुणेने विचारले होते आणि त्यांनी जे काही सांगितले त्यामुळे माझ्या शंकेचे निरसन झालेले आहे.

श्री.03-12-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1
SGB/ KGS/ KTG/ 11:00

: सन्माननीय सदस्य श्री राम पंडागळे हे नेहमीच आमच्या बाजूने बोलत असतात आता सुध्दा त्यांनी मला बोलण्याची संधी दिली आहे. मी काळा पट्टा का अडकवला या बाबतीत मला त्यांना सांगावयाचे आहे की, आमदारांची विधानमंडळाच्या परिसरात मुस्कटदाबी चालविलेली आहे त्याचा निषेध करण्यासाठी काळा पट्टा अडकवला होता आज तो गळयात आहे आणि सत्ताधारी पक्षाचा गळा दाबण्याचा विचार दिसतो. सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी बरोबर सांगितले आणि तो इरादा माझ्यापर्यंत पोहोचला आहे. त्यांनी मला वाचवले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

उपसभापती : आमदारांची जर मुस्कटदाबी होत असेल तर त्यांनी तोंडाला पट्टी लावावयास पाहिजे परंतु त्यांनी गळयात का पट्टा अडकवला असा माझ्यासमोर प्रश्न निर्माण झाला आहे.

श्री.भाई जगताप : सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे यांच्या निदर्शनास मी आणून देऊ इच्छितो की ,सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांच्या घरी आज शुभ कार्य असतांना आपण अशा प्रकारे बोलणे बरोबर नाही.

श्री.विनोद तावडे : आधी लगीन कोंडाण्याचे आणि मग रायबाचे ...

श्री.भाई जगताप : रायबाचे लग्न काल झाले आहे.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय,.....

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, तुम्ही खरे छत्रपती आहात त्यामुळे आपण भाषणास सुरुवात करावी.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, कोणत्याही छत्रपतीला माझ्या भाषणात अडथळा आणण्याची संधी आपण देऊ नये अशी माझी आपल्याला विनंती आहे.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे.सभागृहापुढील कामकाज मला पूर्ण करावयाचे असल्यामुळे कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी अडथळा आणू नये.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री राम पंडागळे यांना मी सांगू इच्छितो की सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे काळया पट्टयाने गळफास लावून घेणार नाहीत वेळ आली तर ते सरकारला फाशी दिल्याशिवाय राहणार नाहीत.

सभापती महोदय, मुंबईमध्ये दररोज परराज्यातून मोठया प्रमाणावर लोंढे येत आहेत. एक काळ असा होता की, लालबाग, परळ,गिरगाव या भागात 80 टक्के मराठी माणसे राहत होती परंतु आज त्या भागात मराठी माणूस पहावयास मिळत नाही. त्या भागातील मराठी माणसे आपल्या लहान लहान खोल्या विकून नाला सोपारा, वसई या भागात रहावयास गेले आहेत आणि आज मुंबईमध्ये फक्त 20 ते 22 टक्के मराठी माणसे शिल्लक आहेत. हे मी अत्यंत जबाबदारीने या ठिकाणी सांगत आहे.एके काळी 80 टक्के मराठी माणसे मुंबईत राहत असतांना हे प्रमाण आज 20 ते 22 टक्क्यावर आलेले आहेत. दुस-या बाजूला परराज्यातून मोठया प्रमाणावर माणसांचे लोंढे मुंबईत येत आहेत. त्यांना अडविण्याचे काम केवळ मुंबई महानगरपालिकचे नाही तर हे काम शासनाचे आहे.या बाबतीत आपण माननीय मुख्यमंत्र्याना सांगावे.

श्री.भाई जगताप : 1995 ते 2000 पर्यत राज्यामध्ये आपलीच सत्ता होती.

श्री.रामदास कदम : आमच्याकडे फक्त साडेचार वर्षेच सत्ता होती. परंतु आपल्या ताब्यात तर 50वर्षापेक्षा जास्त काळ सत्ता होती.आम्ही साडेचार वर्षे सत्तेत होतोआणि त्याकाळात मुंबईत55 उड्डाण पूल तयार झाले होते व त्या पुलावरुनच आपली गाडी येत आहे.अन्यथा मुंबईची अवस्था काय होती हे आपल्याला माहीत आहे.

सभापती महोदय, माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी फेरीवाल्यांच्या संदर्भात या ठिकाणी विधेयक मांडले आहे मुंबईमध्ये दर दिवशी 350 कुटुंबे बाहेरच्या राज्यातून येत आहेत.

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सन्माननीय सदस्य अतिशय चांगले भाषण करीत आहेत. त्यांच्या भाषणात इतर सन्माननीय सदस्यांनी अडथळे आणू नयेत.

उपसभापती : ही बाब आपण सन्माननीय सदस्यांना सांगावी त्याचबरोबर राम बोलत असतांना लक्ष्मणानेसुध्दा सत्ताधारी पक्षाची बाजू सांभाळली पाहिजे.

श्री.सरफरे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : लक्ष्मणच जर रामावर अन्याय करणार असेल तर कसे चालेल? आज मुंबईच्या फुटपाथवर बसणाऱ्या फेरीवाल्यांच्या बाबतीत हे विधेयक आणण्याची शासनावर कां वेळ आली? मुंबईमध्ये दररोज 350 नवीन कुटुंबे बाहेरुन येत आहेत. ती जर वेळीच थांबविली गेली असती तर हे विधेयक सभागृहामध्ये आणण्याची वेळ या शासनावर आली नसती. हे आपण समजून घेतले पाहिजे. माननीय नामदार श्री.लक्ष्मणरावजी ढोबळे साहेब आपणही समजून घेतले पाहिजे. मी या विधेयकाच्या बाहेर जाऊन कधीही बोलणार नाही. बाहेरच्या राज्यामधून येणारी कुटुंबे थांबविण्याबाबत शासनाकडून केवळ घोषणा करण्यात आल्या. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे माजी मुख्यमंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी असे सांगितले होते की, मुंबई शहरामध्ये यापुढे एकही अनधिकृत झोपडी किंवा बांधकाम निर्माण झाले तर तेथील इन्सपेक्टर, जॉईंट कमिशनर यांना सस्पेंड करण्यात येईल. याबाबतीत आपण जर वेळीच यापैकी एका अधिकाऱ्यावर कारवाई केली असती तर आज हे विधेयक या सभागृहामध्ये आणण्याची वेळ आली नसती. शासनाने अशाप्रकारची अनेक विधेयके या सभागृहामध्ये मांडली आहेत, परंतु त्यांची अंमलबजावणी होत नाही. मुंबई शहरामध्ये दररोज 350 कुटुंबे येतात. ही कुटुंबे कशासाठी येतात, ती कुठे थांबतात, कुठे जातात, कुठे रहातात, त्यांना पाणी कोण देते, त्यांच्यासाठी शौचालये कुठे आहेत, त्यांचा उदरनिर्वाह कसा चालतो याचा आपण विचार केला आहे काय? काल येणारा बाहेरच्या राज्यातील माणूस फूटपाथवर बसतो, काल येणारा भैय्या आमच्या कोळी समाजाच्या महिलांचा परंपरागत चालत आलेल्या मासळी विकण्याचा व्यवसाय ताब्यात घेऊन तो मासळी विकायला जातो. या भैय्यांमुळे आमच्या मासळी विकणाऱ्या कोळी भगिणींची काय अवस्था झाली आहे? मुंबई शहरातील मासळी बाजार या भैय्यांनी स्वत:च्या ताब्यात घेतला आहे हे आपण त्या शहरामध्ये जाऊन पहा. कदाचित आपल्याला कल्पना नसेल इतकी भयावह अवस्था झाली आहे. ही परिस्थिती कुणी निर्माण केली आहे?

सभापती महोदय, सन 1961 मध्ये मुंबईची लोकसंख्या 41 लाख 48 हजार होती, त्यानंतर 1971 सालामध्ये 60 लाख होती, 1981 सालामध्ये 93 लाख 90 हजार होती, 1991 सालामध्ये 99 लाख 25 हजार होती, त्यानंतर 2001 सालामध्ये 1 कोटी 19 लाख 14 हजार झाली, त्यानंतर सन 2006 मध्ये 1 कोटी 35 लाख झाली. आज 2010 साल सुरु असून या चार वर्षामध्ये मुंबईची लोकसंख्या दीड कोटींच्यावर गेली आहे. हे फेरीवाल्यांसंदर्भातील विधेयक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. रामदास कदम....

आणण्याची आवश्यकता कां निर्माण झाली? जर ही मुंबई शहराची लोकसंख्या वाढली नसती तर हे विधेयक सभागृहामध्ये मांडण्याची आवश्यकता भासली नसती.

सभापती महोदय, मी याठिकाणी राजकीय भाषण करीत नाही. मी जबाबदारीने बोलत आहे. आपल्याला मुंबईला वाचवावयाचे असेल तर हे लोंढे आपण थांबविले पाहिजेत. आणि ते थांबविण्यासाठी अशाप्रकारचे विधेयक आणून चालणार नाही. या विधेयकामध्ये काय म्हटले आहे याचा मी मागील वेळी उल्लेख केला होता. मागच्यावेळी मी माननीय मुख्यमंत्र्यांना म्हटले होते की, कोणत्याही परिस्थितीत हे विधेयक मी संमत होऊ देणार नाही. फेरीवाल्यांनी कुठे बसावे याचा निर्णय शासन घेणार आहे, याचा संबंध काय? मुबई महानगरपालिकेने शासनाकडे प्रस्ताव पाठविल्यानंतर शासनाने त्याला मंजुरी द्यावयाची अशी पध्दत आहे. मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. असे असतांना हे शासन त्यांच्या हातामधील अधिकार कसे घेऊ शकते? सभापती महोदय, हे विधेयक साधे नाही. एका बाजूला एमएमआरडीएच्या माध्यमातून वेगवेगळया मार्गाने मुंबई महानगरपालिका आपल्या हातामध्ये येत नाही म्हणून मुंबई महानगरपालिकेचे अधिकार हे शासन आपल्या हातामध्ये घेत आहे. आज आपण एमएमआरडीएला सर्व अधिकार देऊन टाकले आहेत. मुंबईचा पाण्याचा प्रश्न एमएमआरडीएकडे दिला, रस्ते व पूलाचा प्रश्न एमएमआरडीएकडे दिला, घरे बांधण्याचा प्रश्न एमएमआरडीएकडे दिला आहे, मुंबईचा कचऱ्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न देखील एमएमआरडीएने सोडवावयाचा आहे. आता मुबईच्या फूटपाथवरील फेरीवाल्यांचा प्रश्न सुध्दा एमएमआरडीएकडे देऊन टाका आणि मग मुंबई महानगरपालिकेने हातामध्ये फक्त झाडू घेऊन साफसफाई करावयाची. अशाप्रकारे तुम्ही मुंबई महानगरपालिकेवर अन्याय करीत आहात. आपले हे विधेयक मी चांगल्याप्रकारे वाचले आहे. त्यामुळे मला कुणीही शिकविण्याची आवश्यकता नाही. मी आतापर्यंत कधीही या विधेयकाच्या बाहेर बोललो नाही, मी भान ठेऊनच या विधेयकावर बोलत आहे. हे सर्व करीत असतांना आपण मुंबई महानगरपालिकेचे अधिकार स्वत:कडे कशासाठी घेत आहात? सभापती महोदय, आज मी याठिकाणी मुद्दाम यादी आणली आहे, ती नंतर आपणाकडे पाठवून देतो. हे शासन मुंबई महानगरपालिकेचे 1 हजार कोटी रुपयांचे देणे लागत आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशोधित प्रत / मुद्रणासाठी नाही

श्री.रामदास कदम . . . .

राज्य शासनाकडून मुंबई महानगरपालिकेला एक हजार कोटी रुपये देणे आहे आणि ते कशासाठी देणे आहे? पण ते मिळालेले नाहीत. तसेच महानगरपालिकेने तीन हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यासाठी शासनाकडे परवानगी मागितलेली आहे.वास्तविक पाहता मुंबई महानगरपालिकेने शासनाकडे अशी परवानगी मागण्याची गरज नाही.परंतु शासनाने जर यासाठी परवानगी दिली आणि त्यातून जर मुंबईचा विकास झाला तर मग यावेळेसही मुंबई महानगरपालिका आपल्या हातात येणार नाही अशी भीती वाटते आणि त्यामुळे यासाठी परवानगी दिली जात नाही.मुंबई महानगर पालिका शासनाकडे भीक मागत नाही.परंतु शासनाकडून जो निधी यावयास पाहिजे,तो देखील दिला जात नाही अशी स्थिती आहे.याठिकाणी फेरीवाल्यांच्या बाबतीत विधेयक आणत असताना, या फेरीवाल्यांना कुठे जागा द्यावयाची याचा निर्णय शासन घेणार आहे म्हणजे हे कशा प्रकारचे राजकारण सुरु आहे? हे कशासाठी सुरु आहे? म्हणून मला माननीय मुख्यमंत्र्यांना सांगावयाचे आहे की,मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये रहाणाऱ्या नागरिकांवर अशा प्रकारे अन्याय करुन चालणार नाही तर मुंबई महानगरपालिकेने शासनाकडे तीन हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यासाठी परवानगी मागितलेली आहे, ती तात्काळ दिलीच पाहिजे.मी आपला याठिकाणी यादी वाचून वेळ घेत नाही.पण मुंबई महानगरपालिकेला शासनाकडून एक हजार कोटी रुपयांचे देणे शिल्लक आहे, ते ताबडतोब दिले पाहिजे.

सभापती महोदय,याठिकाणी गाळ्यांचा विषय उपस्थित केला आहे. हे गाळे बांधून कोणाला, कशा प्रकारे देण्यात येणार आहेत ? खरे म्हणजे शासनाने यासंबंधातील अधिकार मुंबई महानगर पालिकेला द्यावेत, कारण हा त्यांचा विषय आहे.त्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये फेरीवाल्यांसाठी गाळे बांधणे आणि शासनाने त्याचे वाटप करणे हे बरोबर नाही.याठिकाणी नगरविकास राज्यमंत्री माननीय श्री.भास्कर जाधव उपस्थित नाहीत.मी त्यासंबंधात विषय मांडणार आहे.मुंबई महानगरपालिकेमध्ये जे स्टॉल देण्यात आलेले आहेत, ते माननीय मंत्र्यांच्या, माननीय राज्यमंत्र्यांच्या भावाला देण्यात आलेले आहेत.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : तत्कालीन.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय,तत्कालीन नाहीतर आताच्या मंत्री आणि राज्य मंत्र्यांच्या भावाला देण्यात आलेले आहेत. मी याविषयाच्या बाबतीत संबंधितांना नोटीस देणार आहे आणि त्यानंतर सदनामध्ये बोलणार आहे. आपण एका बाजूला फेरीवाल्यांसाठी विधेयक आणत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहात. गाळेधारकांना फेरीवाला क्षेत्रामध्ये शिफ्ट करीत आहात आणि दुसरीकडे मुंबई महानगरपालिके मध्ये मात्र माननीय मंत्र्यांच्या, राज्यमंत्र्यांच्या भावाला स्टॉल देत आहात, ही बाब कशामध्ये बसते ? मी हे सगळे सदनासमोर आणणार आहे.अशा प्रकारे मुंबई महापालिकेवर अन्याय करण्याचे काम राज्य शासन कशा प्रकारे करीत आहे, हे मला सदनासमोर स्पष्ट करावयाचे आहे.मुंबई महानगर पालिकेला न्यायालयाने तीन वेळा नोटीस दिली आहे की, फेरीवाल्यांच्या बाबतीत तुमचे धोरण काय आहे,नियम काय आहेत ते निश्चित करुन सांगावे. मग फेरीवाल्यांना स्टेशनच्या जवळ ठेवणार की लांब ठेवणार,त्यांच्यासाठी गाळे कुठे बांधणार, गाळे मार्केटमध्ये बांधणार की त्याच्या बाहेर बांधणार? यासंबंधात तुमची पॉलिसी नक्की होऊ द्या. यासाठी महापौरांना बोलवावे आणि महापौर माननीय मुख्यमंत्र्यांकडे भेटीसाठी वेळ मागत आहेत, पण त्यांना भेटण्यासाठी वेळ नाही. त्यांच्या कडून निवेदन घेण्यासाठी वेळ नाही. त्याकडे लक्ष द्यावयाचे नाही.

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी भाषण करीत असताना माननीय मंत्री महोदयांच्या, राज्यमंत्री महोदयांच्या भावाचा उल्लेख केलेला आहे. सभापती महोदय, मी आपल्यावतीने विनंती करतो की, यामध्ये जे कोणी राज्यमंत्री असतील त्यांचे नाव गुलदस्त्यामध्ये ठेऊ नये.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी या विषयाच्या संदर्भात संबंधितांना नियमाप्रमाणे नोटीस देणार आहे. कारण आपण सदनामध्ये नवीन नाही. आपल्याला नियमबाह्य काम करता येत नाही. मी काल एका माननीय मंत्री महोदयांना नोटीस दिली आहे आणि आज मी त्यासंबंधात बोलत आहे. तशा प्रकारे मी माननीय राज्यमंत्र्यांना देखील नोटीस देईन आणि मग सदनामध्ये बोलेन. कारण याबाबतीत नोटीस दिल्याशिवाय कोणाचे नाव घेता येत नाही, असा आपला नियम आहे. त्यामुळे याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.रामभाऊ पडांगळे यांनी चिंता करु नये, काही काळजी करु नये. या अधिवेशनाच्या कालावधीमध्ये आमच्याकडून पुष्कळ नोटीसेस जाणार आहेत.

सभापती महोदय,आपल्या राज्यामध्ये मोठया प्रमाणात परप्रांतीय येत आहेत आणि ते फेरीवाले म्हणून काम करीत आहेत.मात्र केवळ मुंबई,नागपूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये ही समस्या नाही. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगतापसाहेब यांना सांगू इच्छितो की, जेव्हा आम्ही ग्रामीण भागामध्ये जातो, तेव्हा एस.टी.मध्ये बटर आणि बिस्किट विकणारा हा लुंगी घातलेला भैय्याच .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिसतो. शहरापासून 20 कि.मी., 30 कि.मी.आतमध्ये असलेल्या गावामध्ये भय्या दिसतो अशी अवस्था आहे. तेव्हा केवळ मुंबईमधीलच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राची सूत्र त्यांनी हातामध्ये घेतली आहेत आणि ही गंभीर बाब आहे.

यानंतर कु.थोरात . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

सभापती महोदय, स्थानिक माणसाने, मराठी माणसाने कुठे जावयाचे?

उपसभापती : मला सभागृहाच्या निदर्शणास आणून द्यावयाचे आहे की, हे विधेयक चर्चेसह दुपारी 12.30 वाजेपर्यंत मंजूर करावयाचे आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, हे विधेयक अतिशय महत्वाचे आहे. त्यामुळे कृपाकरुन आम्हाला या विधेयकावर बोलू द्यावे. ज्या नागपूर नगरीमध्ये अधिवेशन सुरु आहे त्या नागपूरच्या दृष्टीने मुंबईच्या दृष्टीने हे विधेयक अतिशय महत्वाचे आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या विधेयकावर सर्व सन्माननीय सदस्यांना त्यांचे विचार मांडण्याची संधी मिळाली पाहिजे. कारण या विधेयकात कष्टकऱ्यांच्या रोजगाराशी निगडित काही प्रश्न आहेत. त्यामध्ये काही भावनिक गोष्टी सुध्दा आहेत. तेव्हा या विधेयकावर विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी बोलावे त्याचबरोबर सत्ताधारी पक्षातील सदस्यांना सुध्दा बोलण्याची संधी देण्यात यावी. कारण हा अतिशय महत्वाचा असा विषय आहे. या विधेयकात फक्त परकीय लोढयांशी संबंधित विषय नाही तर येथील रोजगाराशी संबंधित विषय आहे. मुंबई शहराची सगळी आवश्यकता या विधेयकामध्ये आहे एवढेच नाही तर ती मुंबई शहराची गरज आहे. त्यामुळे या विघेयकावर आम्हाला सुध्दा आमचे विचार मांडण्याची संधी देण्यात यावी अशी विनंती आहे.

उपसभापती : वेळेचे बंधन का हवे हे देखील मी सभागृहाला सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्यांचे भाषण पूर्ण झाले की, ते सभागृहाबाहेर निघून जातात. मात्र पीठासीन अधिकारी या आसनावर बसलेले असतात. या आसनावर बसून राहणे हे त्यांचे कर्तव्यच आहे पण त्याच वेळेला सभागृहासमोरील कामकाजही पूर्ण व्हावयास पाहिजे. सन्माननीय सदस्य सभागृहात भाषण करतात आणि सभागृहाबाहेर निघून जातात, त्यांनाही यासंबंधीचे गांभीर्य असले पाहिजे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझी अशी विनंती आहे की, या संदर्भात शासनाने एक विधेयक आणावे. एखाद्या सन्माननीय सदस्यांनी सभागृहात भाषण केल्यानंतर त्यांनी सभागृहाबाहेर जाता कामा नये. आणि जर ते त्यांचे भाषण संपल्याबरोबर सभागृहाबाहेर गेले तर त्यांचे सदस्यत्वच रद्द करण्यात यावे.

उपसभापती : सन्माननीय सदस्यही फेरीवाल्यांसारखेच निघून जातात. आपला कामधंदा आटोपला की चालले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदय सभागृहात बसून नोट्स लिहून घेत आहेत. तेव्हा सभापती महोदय, आपल्या मार्फत माननीय मंत्रिमहोदयांना मला सांगावयाचे आहे की, त्यांनी उत्तराच्या भाषणाच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांना या सभागृहात बोलवावे. मुंबई महानगरपालिकेने तीन हजार कोटी रुपये कर्ज घेण्यासाठी एका वर्षापूर्वी प्रस्ताव पाठविलेला आहे तो प्रस्ताव शासन अद्याप का मंजूर करीत नाही? यासंबंधीचे उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहात दिले पाहिजे. मुंबई महानगरपालिकेला एक हजार कोटी रुपये शासन देणे आहे ते एक हजार कोटी रुपये शासनाकडून कधी देण्यात येतील? या दोन गोष्टीचा खुलासा माननीय मुख्यमंत्र्यांकडून मिळणे आवश्यक आहे. मुंबईच्या विकासाच्या संदर्भात पदपथाचा विषय असो, मुंबईतील बेरोजगारांचा प्रश्न असो, रोजगाराचा प्रश्न असो या सगळया गोष्टी पैशाशी निगडीत आहेत. या विधेयकाच्या निमित्ताने जर बेरोजगारांसाठी, फेरीवाल्यांसाठी गाळे बांधावयाचे असतील तर त्यासाठी पैशाची निकड लागणार आहे. म्हणून यासंदर्भात कोणतेही राजकारण आणता कामा नये. निवडणुका तोंडावर आल्या नंतर तीन हजार कोटी रुपये दिल्यानंतर आमचे पुढे काय होईल अशी भिती मनामध्ये न बाळगता ते पैसे मिळाले पाहिजेत. हे पैसे मिळाले तरच या विधेयकाचा हेतू साध्य होणार आहे.

सभापती महोदय, मी आपल्या मार्फत माननीय मंत्रिमहोदयांकडे माझ्याकडील यादी पाठवू इच्छितो, ती त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे द्यावी. एक हजार कोटी रुपये मुंबई महानगरपालिकेला शासन देणे आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी यादी वाचली तर त्यांच्या लक्षात ही गोष्ट येईल.

सभापती महोदय, बेरोजगाराचां आणि फेरीवाल्यांचा विषय महत्वाचा आहे. पण जोपर्यंत परप्रांतीय लोंढे थांबत नाहीत, तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. परप्रांतीय लोढयांमध्ये उत्तर भारतीय 28.5 टक्के आहेत. म्हणजे सगळयात जास्त उत्तर भारतीय लोक आहेत. कर्नाटकचे 14.7 टक्के लोक आहेत. मध्यप्रदेशचे 8.5 टक्के, गुजराचे 7.1 टक्के आणि आंध्रप्रदेशचे 6 टक्के लोक आहेत. ही टक्केवारी मुंबईतील परप्रांतीय लोकांची आहे. ही मुंबईची अवस्था आहे. कोकणातील माणूस मुंबईत येऊन पदपथावर राहू शकत नाही. त्याला मुंबईत रोजगार मिळत नाही ही अवस्था आज मुंबईची आहे. पंधरा वर्षापासून मुंबई राहतो, असा ज्याच्यांकडे दाखला असेल त्यांना आपण महाराष्ट्रीयन असे म्हणतो.

यानंतर श्री. बरवड....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)

श्री. रामदास कदम ....

मग हे खोके आपण त्यांना बांधून देणार आहात, तेव्हा हा नियम आपण पाळणार काय ? कारण या फेरीवाल्यांना तुम्हाला पिस लायसन्स द्यावे लागते. त्यांना पिस लायसन्स दिल्यानंतर आपण खोके देतो. ज्या बाबतीत आपण हे बिल आणले त्या बाबतीत आपली नेमकी भूमिका काय असणार आहे ? मुंबई महानगरपालिकेमध्ये शासनानेच आयुक्त दिलेले आहेत. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री. स्वाधीन क्षत्रिय हे शासनानेच दिलेले आहेत. त्यांच्यावर आपला विश्वास असला पाहिजे. आपला महापालिकेवर विश्वास नाही, आमच्यावर विश्वास नाही, नगरसेवकांवर विश्वास नाही पण त्या ठिकाणी आयुक्त आपले आहेत. यासंदर्भात स्पष्टपणे आणि निश्चितपणे आपली कालमर्यादा असली पाहिजे. किती वर्षे राहणाऱ्या माणसाला आपण फेरीवाल्यांचे गाळे देणार आहात ? कारण आपण जे फेरीवाला झोन काढणार त्या झोनमध्ये आपण किती वर्षाच्या उत्तरभारतीयाला बसविणार आहात, त्या ठिकाणी मराठी माणसाला जागा मिळेल की नाही ? मराठी माणसाला न्याय देण्याच्या बाबतीत आपली भूमिका काय असणार आहे हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. भास्कर जाधव आता सभागृहात उपस्थित झालेले आहेत. मी मघाशी सांगितले की, मुंबई महानगरपालिकेला शासन 1 हजार कोटी रुपये देणे आहे. तसेच मुंबई महानगरपालिकेने 3 हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यासाठी शासनाकडे परवानगी मागितलेली आहे. ती परवानगी शासन देत नाही. म्हणून या संदर्भातील भूमिका आपल्याकडून स्पष्ट होणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, फूटपाथवर ज्या अनधिकृत झोपड्या झालेल्या आहेत, ज्या फेरीवाल्यांनी अनधिकृत झोपड्या बांधलेल्या आहेत त्याबाबतीत शासन काय निर्णय घेणार आहे, हे समजले पाहिजे. ज्यावेळी आपण फेरीवाला झोन काढत आहात, ज्यावेळी फेरीवाल्यांसाठी गाळे बांधत आहात तेव्हा सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, प्रत्येक दिवसाला 350 कुटुंबे या पध्दतीने परप्रांतीयांचे लोंढे मुंबईमध्ये येत आहेत. मी मुंबईबाबत बोलत आहे. मी नागपूरच्या बाबतीत बोलत नाहही. 350 कुटुंबे प्रत्येक दिवसाला मुंबईमध्ये येत आहेत. त्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

शौचालयाची काय व्यवस्था आहे, ते पाणी कोठून आणणार, ते कोठे झोपणार ? मुंबईमध्ये जे फेरीवाले आहेत ते सगळे बांगलादेशी लोक आहेत. ज्यावेळी आपण फेरीवाल्यांची व्यवस्था करणार त्यावेळी किती दिवसांमध्ये फूटपाथ रिकामे करणार ? मी अनेक वेळा सभागृहामध्ये मागणी केली की, अतिक्रमणे काढण्यासाठी मुंबई महानगरपालिकेला एक पोलीस फोर्स आपण द्यावा. पोलीस अधिकारी द्यावा. शासन होय म्हणते. ते देणार असे सांगितले जाते. फक्त आश्वासन मिळते. ज्यावेळेला आपण फेरीवाल्यांसाठी कायदा आणत आहात त्यावेळी मुंबईतील फूटपाथ मुंबईच्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी किती दिवसात रिकामे करणार, जे नागरिक अधिकृतपणे कर भरतात त्यांना फूटपाथवरुन चालण्याचा अधिकार नाही काय ? ज्यावेळी आपण हा कायदा आणत आहात त्यावेळी मुंबईतील फूटपाथ किती दिवसात रिकामे करणार आणि स्वच्छ करणार, हे माननीय मंत्रिमहोदयांनी हे स्पष्ट केले पाहिजे. त्यासाठी आपली काय उपाययोजना असणार आहे ? त्यासाठी वेगळा पोलीस बंदोबस्त मुंबई महानगरपालिकेला देण्याचे मान्य केले होते. या सभागृहामध्ये तसे आश्वासन दिले आहे. त्या आश्वासनाची पूर्तता शासन किती दिवसामध्ये करणार आहे, हे सांगावे.

सभापती महोदय, या ठिकाणी बिल आणावयाचे, भाषणे करावयाची, चर्चा करावयाची आणि अंमलबजावणी काही नाही असे होता कामा नये. मुंबई महानगरपालिका असेल, नागपूर महानगरपालिका असेल, ज्यावेळी आपण फेरीवाला झोन निश्चित करणार आहात त्यावेळी त्याबाबतीत सगळे अधिकार मुंबई महानगरपालिकेला द्यावेत. त्यामध्ये सरकारचा कोणताही वाटा असता कामा नये. परवा मी आरे कॉलनीत गेलो होतो. त्या ठिकाणी मी एका ठिकाणी विचारले की हा स्टॉल कोणाचा आहे ? त्यांनी सांगितले की, एका राज्यमंत्र्यांच्या भावाचा आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

मी त्या राज्यमंत्र्यांना नोटीस देणार आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी त्याची काळजी करु नये. मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील आरे कॉलनीमध्ये मी 3 दिवसापूर्वी गेलो होतो. त्याठिकाणी मला एक चांगला स्टॉल दिसला. तो स्टॉल एका राज्यमंत्र्यांच्या भावाचा असल्याची माहिती मला मिळाली आहे.

श्री.भाई जगताप : आरे कॉलनीसंबंधी या सभागृहात चर्चा होईल त्यावेळी माजी राज्यमंत्री, माजी मंत्री, माजी मुख्यमंत्री यांच्या मुलांच्या नावाची यादी सभागृहासमोर येईल. या सभागृहामार्फत सर्व जनतेला त्यांची नावे कळू द्या. आजी मंत्री, माजी मंत्री या सर्वांची नावे सभागृहासमोर येऊ द्यावीत. ती माहिती आपल्याकडे नसेल तर मी ती माहिती पटलावर ठेवीन.

श्री.रामदास कदम : सन्माननीय सदस्यांना कोणचेही नाव घ्यावयाचे असल्यास प्रथम जे कोणी संबंधित असतील त्यांना नोटीस द्यावी. त्यानंतर आपल्याला नाव घेता येईल. माननीय मंत्री महोदय श्री.भास्कर जाधव यांनी आता त्या नावाचा उल्लेख करावा, त्यांच्या जवळ माहिती नसल्यास मी एका मिनिटात ते नाव घेण्यास तयार आहे. त्या राज्यमंत्र्यांच्या भावाचा दादरला सुध्दा स्टॉल आहे अशी मला माहिती समजली आहे. माननीय मंत्री महोदयांनी त्यांचे नाव सांगावे, अन्यथा मी त्यांचे नाव सांगू शकतो. त्यांचा आरे कॉलनीतच स्टॉल आहे असे नाही तर दादरला सुध्दा स्टॉल आहे. मी त्याबाबतची अधिक माहिती घेत आहे. त्या कामाला मी सुरुवात केली आहे.

सभापती महोदय, एका बाजूला बेरोजगारांसाठी मुंबईत हॉकर्ससाठी स्टॉल बांधत असताना मंत्री, राज्यमंत्रीच आपल्या भावाचे पुनर्वसन करतात ही मुंबई महानगरपालिकेची आजची स्थिती आहे. म्हणून मी मघाशी म्हटल्याप्रमाणे मुंबईतील फूटपाथ मोकळे करण्याची कार्यवाही शासनाकडून किती दिवसात केली जाणार आहे ? मुंबईकर शासनाला विविध कर देतात. त्यामुळे फूटपाथवरुन चालण्याचा त्यांना अधिकार आहे, तो हिरावून घेण्याचा कोणत्याही सरकारला अधिकार नाही. मुंबईतील फूटपाथ मोकळे करुन देण्यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे, त्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे त्याचे उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांच्या भाषणातून आम्हाला मिळाले पाहिजे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, परप्रांतीयांकडून कोळी बांधवांवर किंवा कोळी समाजावर सुध्दा अन्याय होत आहे. कोळी समाजाचा पिढीजात धंदा हिसकावून घेऊन हे परप्रांतीय स्वत: बाजारामध्ये मासे विकण्यासाठी बसत आहेत. काल मुंबईत आलेला भैय्या मासे कसे काय विकू शकतो, तो महाराष्ट्रामध्ये 10-15 वर्षे राहिलेला आहे किंवा नाही ते कोण पाहणार ? मराठी माणसांना संपविण्याचा एक कलमी कार्यक्रम सरकारने हातात घेतला आहे काय, मराठी माणसांना नेस्तनाबूत करण्याचे काम सरकार करणार आहे काय, केवळ परप्रांतीयांना खूष करण्यासाठी सरकार हे करीत आहे काय ? आपल्यामार्फत माझी शासनाला विनंती आहे की, हे मतांचे राजकारण थांबवावे. मराठी माणसांना संपविण्याचे पाप या सरकारच्या हातून होता कामा नये. जे स्टॉल उभे राहणार आहेत ते मराठी माणसांनाच मिळाले पाहिजेत अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बचत गटाबाबत मी सांगेन की, हे बचत गट केवळ महिलांनाच द्यावेत. ज्यावेळी मुंबईच्या समस्यांवर स्वतंत्रपणे चर्चा होईल त्यावेळी मी पुन्हा बोलीन. मुंबई महानगरपालिकेला शासनाकडून जे येणे आहे ते कधी मिळणार आहे ते सांगावे. मुंबईच्या विकासासाठी 3 हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने शासनाकडे परवानगी मागितलेली आहे ती तात्काळ मंजूर करावी. मुंबईत फेरीवाला झोन कोठे निर्माण करावयाचे हा अधिकार शासनाला असता कामा नये, तो अधिकार मुंबई महानगरपालिकेलाच असला पाहिजे. तो हिरावून घेण्याचा अधिकार सरकारला नाही. हा अधिकार यापूर्वी होता तो काढून घेतला गेला आहे.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, हा अधिकार मुंबई महानगरपालिकेकडेच आहे.

श्री.रामदास कदम : हा अधिकार काढून घेतलेला आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगावे. मुंबई महानगरपालिकेमार्फत केंद्र सरकारला मोठया प्रमाणात कर मिळतो. त्याच्या 10 टक्के निधी मुंबई महानगरपालिकेला मिळाला पाहिजे. मुंबई महानगरपालिका आपल्याकडे नाही, ती शिवसेना-भाजपाच्या हातात आहे असे त्यामध्ये राजकारण आणू नये.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामदास कदम...

म्हणून सुडाच्या भावनेने काम करण्याचे राज्य शासनाने सोडून द्यावे आणि मुंबई महानगरपालिकेचा जो कोट्यवधीचा टॅक्स केन्द्र सरकारकडे जातो त्यातील 10 टक्के टॅक्स मुंबईच्या विकासासाठी देण्यासाठी केन्द्राकडे आग्रह धरावा. फेरीवाला झोन करण्याचे अधिकार हे मुंबई महानगरपालिकेलाच असले पाहिजेत आणि हे झोन करीत असताना त्यामध्ये मराठी माणसाला स्थान असले पाहिजे अशी मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2009 चे वि.स.वि. क्रमांक 41, मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयकावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, माझ्या आधीचे वक्ते सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी या विधेयकाचे काही अंशी समर्थन केलेले आहे. त्यांनी मांडलेले काही मुद्दे समर्थनीय आहेत. या विधेयकाच्या निमित्ताने काही महत्वाचे मुद्दे मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणू इच्छितो. शासनाच्या वतीने फेरीवाला झोन निर्माण करण्यात येणार आहेत. विशेषत: मुंबईच्या संदर्भात मी राज्यमंत्री महोदय श्री. भास्कर जाधव यांना विचारु इच्छितो की, मुंबईतील कोणती फूटपाथ तुमच्या हातामध्ये राहिलेली आहे की जी तुम्ही फेरीवाला झोनसाठी देणार आहात ? मुंबईतील एक इंच फूटपाथ तरी आपल्या ताब्यात राहिलेली आहे काय ? कुलाब्या पासून दहीसर पर्यन्तच्या सर्व फूटपाथ फेरीवाल्यांनी गिळंकृत केलेल्या आहेत. मुंबईतील सर्व फूटपाथ फेरीवाल्यांच्या कब्जात आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सांगितले की मुंबईच्या फूटपाथवर असलेले फेरीवाले हे परप्रांतीय आहेत. या फेरीवाल्यांमध्ये एक टक्का देखील मराठी माणूस नाही. आपण जर एखादी समिती नेमून शोध घेतला तर एक हजार फेरीवाल्यांमागे एक सुध्दा मराठी माणूस पहायला मिळणार नाही हे दुर्भाग्य आहे.

सभापती महोदय, मुंबईतील फूटपाथवर जे फेरीवाले बसतात त्या जागेची, फूटपाथवरील स्टॉलची किंमत लाखांमध्ये आहे. आपण मुंबईतील फॅशन स्ट्रीटवर फेरीवाले बसविलेले आहेत. त्या फेरीवाल्यांचा एक स्टॉल जर तीन वर्षाकरिता चालविण्यास द्यावयाचा असेल तर त्यासाठी 25 लाख रु. मोजावे लागतात. 5x5 च्या फेरीवाल्याच्या जागेची किंमत 25 लाख रु. झालेली आहे. कांदिवली, मालाड आणि बोरिवली या ठिकाणचे फूटपाथवरचे स्टॉल किंवा जागा 11 महिन्याच्या कराराने चालविण्यास द्यावयाची असेल तर त्यासाठी 2 लाख रु. मोजावे लागतात. सभापती महोदय, फूटपाथ सरकारची आणि परप्रांतीय फेरीवाले ती भाड्याने चालविण्यास देतात. परप्रांतीयांनी मुंबईतील सर्व फूटपाथवर कब्जा केलेला आहे.असे सांगितले जाते की, शासनाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे...

झोपडपट्टयांची मुदत 1995 पर्यन्त वाढवली आणि नंतर ती 2000 पर्यन्त वाढवली त्यामुळे हे प्रश्न निर्माण झालेले आहेत. मी सांगू इच्छितो की, हे फेरीवाले बसविण्याची किमया या मुंबई महानगरपालिकेने केलेली आहे आणि हे कोणालाही नाकारता येणार नाही.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे.....

हे फेरीवाले महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडे जातात. ते नगरसेवकांकडे जात नाहीत, आमदार महोदयांकडे जात नाहीत, तहसीलदार यांच्याकडे जात नाहीत. महानगरपालिकेतील परवाना देणाऱ्या अधिकाऱ्यांकडे जातात. तेथे सौदा होतो. अमुक ठिकाणी जागा असल्याचे सांगितले जाते. इस जगह पर मुझे बैठना है. मैं कल ही बनारस से आया हूँ. अभी आप मुझे बैठने दें. मुझे अपने बच्चो का पेट पालना है. तेथे सौदा होतो आणि मग ती जागा त्या फेरीवाल्याला अलॉट केली जाते.

सभापती महोदय, दर महिन्याचा हप्ता ठरलेला आहे. एका वॉर्डमधील फेरीवाल्यांचे महिन्याचे कलेक्शन किती असावे? एका वॉर्डमधील फेरीवाल्यांचे प्रत्येक महिन्याचे कलेक्शन किमान एक कोटी रुपयांचे आहे. या धंद्याला शासन प्रोत्साहन देणार आहे का? हे कुठेतरी थांबले पाहिजे. एका बाजूला एक-दीड कोटी रुपयांचे दुकान घेतले जाते, त्यासाठी लायसन्स घेतले जाते, अधिकृतपणे शासनाकडे आणि महानगरपालिकेकडे फी भरली जाते आणि व्यवसाय सुरु केला जातो. दुसऱ्या बाजूला परप्रांतातून येणारी माणसे महापालिकेच्या वॉर्ड ऑफिसमध्ये जाऊन तेथे सौदा करतात आणि एकही पैसा न भरता खुशालपणे फुटपाथवर धंदा करतात व लाखो रुपये कमावतात. अशा लोकांना आपण प्रोत्साहन देणार आहात का? हे कुठेतरी थांबले पाहिजे. कोणाला प्रोत्साहन देत आहात? या ठिकाणचा जो भूमिपुत्र आहे त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. जो दलित समाजाचा आहे, गरीब आहे, वंचित आहे, आर्थिकदृष्टया दुर्बल आहे त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. शासन कोणाला प्रोत्साहन देत आहे? याचा निश्चितपणे विचार केला पाहिजे. आज मुंबई शहरातील फुटपाथवर काय काय मिळते? परदेशात आज निर्माण होणाऱ्या वस्तू दुस-या दिवशी मुंबई शहरातील फुटपाथवर मिळतात. इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंपासून साड्या, रेडिमेड कपडे, खेळण्यांपासून दागदागिन्यांपर्यंत सर्व काही फुटपाथवर मिळते. अशा प्रकारचे धंदे करणाऱ्यांना हॉकर्स म्हणायचे का? रेडिओ, घड्याळे, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू फुटपाथवर विकणाऱ्यांना हॉकर्स म्हणायचे का?

सभापती महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी घोषणा केली होती त्याचा आम्हाला आनंद वाटला. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितल्याप्रमाणे ठराविक अधिकाऱ्यांवर वेळीच कारवाई झाली असती तर कदाचित हे प्रकार थांबले असते. या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे.....

विधेयकाचे समर्थन करीत असताना मी सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री यांना विनंती करतो की, एखादी समिती नेमून या प्रश्नांचा सर्वंकष अभ्यास करण्यात यावा. हे काय चालले आहे? कशाप्रकारे चालले आहे? कोणकोण यामध्ये सामील आहेत? याचा सांगोपांग विचार करावा आणि झोन अलॉट करताना दलित माणसांचा, वंचित, गरीब, आर्थिकदृष्टया दुर्बल असलेले जे लोक आहेत, मग ते कोणत्याही जातीचे असोत या सगळ्यांचा विचार करण्यात यावा. किमान 50 टक्के महाराष्ट्रातील स्थानिक भूमिपुत्रांना या योजनेमध्ये सामावून घ्यावे अशी मी विनंती करतो आणि या विधेयकाचे समर्थन करुन माझे भाषण संपवितो.

नंतर एम.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसैन दलवाई : सभापती महोदय, आज सभागृहासमोर ज्या विधेयकावर चर्चा सुरु आहे त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जवळपास 15 मिनिटे आपले विचार मांडलेले आहेत. अशी चर्चा सुरु झालेली असताना.....

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम हे "ऑन लेग" होते म्हणून सुरुवातीला त्यांनी आपले विचार व्यक्त केले. मूळ प्रस्ताव माननीय मंत्री महोदयांनी मांडलेला आहे त्यामुळे विधेयकावर चर्चा सुरु झालेलीच आहे. तशी माझी सुध्दा भाषण करण्याची तयार आहेच पण माननीय सभापतींनी विनंती केल्यानुसार सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना बोलण्याची मी संधी देत आहे. त्यानंतर मी माझे विचार मांडणार आहे.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या विधेयकावर यापूर्वी सुध्दा सभागृहात चर्चा झालेली आहे व त्यावेळेस काही विधायक सूचना सभागृहाच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत, त्यामुळे नव्यानेच हे विधेयक इंट्रॉड्युस झालेले आहे, अशातला भाग नाही. मी या विधेयकावर फार मोठे भाषण करणार नाही परंतु काही गोष्टींचा परामर्श घेत असताना उत्तरामध्ये स्पष्ट झाले पाहिजे म्हणून काही सूचना सुध्दा करणार आहे. सर्वप्रथम राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागू करण्याच्या दृष्टीने तत्पूर्वी हे जाणून घेणे आवश्यक आहे की, फेरीवाला म्हणजे कुठल्याही शहराची, राज्याची, देशाची व समाजाची गरज आहे आणि या आपल्या गरजेपोटी आवश्यक असलेल्या घटकाची जी दुरवस्था आहे त्याकडे कोणीही लक्ष देत नाही, असा माझा आरोप आहे. लोकसंख्येच्या किती टक्के फेरीवाल्यांची संख्या असावी ही गोष्ट प्रथम लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण त्याला सुध्दा काही नियम आहेत आणि त्या नियमांचे उल्लंघन मुंबईत झालेले नाही त्यामुळे असे कोणीही समजू नये की, मुंबईत अनेक लोंढे येतात आणि फुटपाथवर थांबतात. ही माहिती मी शासनाच्या आकडेवारीच्या आधारे देत आहे. दिल्लीसारख्या शहरात सुध्दा लोकसंख्येच्या 5 टक्के फेरीवाले आहेत. मुंबईत मात्र हे प्रमाण फक्त 1.5 टक्के एवढे आहे हे मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

आणि म्हणून या गोष्टीमध्ये कोणाचेच दुमत असू शकणार नाही असे मला वाटते. आज फेरीवाल्यांना रोजगार मिळत आहे. स्थानिक माणसाला सुध्दा रोजगार मिळाला पाहिजे या मताचे आम्ही सुध्दा आहोत. आज मुंबई, पुणे, नागपूर या ठिकाणी मोठया प्रमाणात शहरीकरण होत आहे. या सर्व ठिकाणी आता हाच प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे आपल्याला प्रथम देश केंद्रीभूत ठेवावा लागणार आहे कारण आपण प्रथम आपल्या देशाचे नागरिक आहोत व त्यानंतर आपण राज्याचे घटक आहोत हे विसरता कामा नये. त्यामुळे मराठी माणसाला, किंवा स्थानिकाला रोजगार मिळू नये या मताचे आम्ही सुध्दा नाही. आम्ही जर या मताचे असतो तर 1972 मध्ये या संदर्भातील कायदाच पास झाला नसता. स्थानिकांना 80 टक्के रोजगार हा मिळालाच पाहिजे. स्थानिक कुशल आणि अकुशल कामगारांना देखील रोजगार मिळालाच पाहिजे. जो 15 वर्षापासून या राज्यात स्थायीक आहे त्याला आपण त्या राज्याचा घटक मानतो.

सभापती महोदय, गेल्या आठवडयात मी बनारस येथे गेलो होतो. बनारस येथे सुध्दा मराठी माणसांचा एक एरिया आहे. या ठिकाणी जवळ जवळ तीन हजार मराठी कुटुंब राहत आहेत व ते देखील अशाच प्रकारचा व्यवसाय करुन आपला उपजीविका तेथे करीत आहेत. आपण सुध्दा अभ्यास म्हणून या ठिकाणी भेट दिली तर आपल्याला त्याचा फायदा होऊ शकेल. दिल्लीतील नोएडा येथे 7 लाख मराठी कुंटुंब अशाच प्रकारे आपला व्यवसाय करुन आपली उपजीविका करीत आहेत. या ठिकाणी असलेली महाराष्ट्रीयन कुटुंबे केवळ फेरीवाल्यांचाच व्यवसाय करीत आहेत असे मला म्हणावयाचे नाही. पानिपत येथे सुध्दा मी गेलो होतो. पानिपतची लढाई होऊन आज 225 वर्ष झालेले असल्यामुळे या ठिकाणी 225 वर्षाचा पानिपतचा इतिहास साजरा केला जाणार आहे. पानिपत येथे सुध्दा 7 लाख मराठी कुटुंब व्यवसाय करुन उदरनिर्वाह करीत आहेत. प्रत्येक राज्यामध्ये प्रथम तेथील स्थानिकांना रोजगार मिळालाच पाहिजे, त्यांच्या कुटुंबाना संरक्षण मिळालेच पाहिजे. राजकारण बाजूला सारुन खरे म्हणजे या विषयावर एकदा चर्चा झाली पाहिजे. स्थानिकांना रोजगार मिळाला पाहिजे यासाठी सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे. मुंबईतील साडेचार लाख फेरीवाल्यांच्या उदरनिर्वाहासाठी, त्यांच्या आरोग्याच्या प्रश्नासाठी कोणीच बोलत नाही. त्यामुळे त्यांना संरक्षण मिळावे यासाठी हे विधेयक येथे आलेले आहे असा माझा समज आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

या विधेयकाला अनेक कंगोरे आहेत याबाबत कोणाचेच दुमत नाही. परंतु त्याचा फोकस बाजूला जात आहे असे मला वाटते. मुंबई महानगरपालिकेला त्यांच्या हक्काचे पैसे मिळालेच पाहिजे यासाठी आपल्याला अनेक आयुधांचा वापर करुन हा विषय उपस्थित करता येईल व या आयुधांचा वापर करुन राज्य सरकारला धारेवर धरता येईल. परंतु आपण कष्टक-याला काय देणार आहात, फेरीवाल्याच्या कुटुंबासाठी आपण काय देणार आहोत, मागासवर्गीयाना आपण काय देणार आहात, उत्तर भारतीयांना काय देणार आहोत ? याचा आपल्याला प्रथम विचार करावा लागणार आहे. आपण प्रथम या देशाचे नागरिक आहोत व त्यानंतर राज्याचा घटक आहोत हे विसरता कामा नये एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. या विधेयकावर माझे विचार मांडत असतांना मी काही सूचना या ठिकाणी करणार आहे.

यानंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

या फेरीवाल्यांचे कुठेतरी स्थलांतर करावयास पाहिजे. मध्यंतरीच्या काळात माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबईतील जवळपास 276 रस्ते आपण "ना फेरीवाले क्षेत्र" म्हणून घोषित केले. त्यातील 176 रस्त्यांवर काही कालावधीकरिता फेरीवाले नव्हते. याठिकाणी जे सांगण्यात आले ते मी सांगत आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आपण "ना फेरीवाले क्षेत्र" घोषित केल्यानंतरही त्याठिकाणी फेरीवाले येत असतील तर तेथील वॉर्ड ऑफीसर, तेथील पोलीस स्टेशन किंवा जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. आपण फक्त माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशांची पूर्तता करण्यासाठी कागदपत्रांनी रकाने भरत आहोत. आज काही उच्चभ्रू वस्तीतील रस्ते सोडले तर सर्वच ठिकाणी आपणास फेरीवाले दिसतात. जे पोटाची खळगी भरण्यासाठी असे उद्योग करीत आहेत. परंतु त्याबाबतीत राजकारण केले जात आहे. फेरीवाल्यांकडून पैसे घेतले जातात ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. याबाबत सरकार काय करणार आहे ?

सभापती महोदय, आपला जो 1951 चा कायदा आहे त्यातील 313 मधील अ, ब व क मध्ये सुधारणा करीत आहोत. तेव्हा त्यामध्ये या सर्व गोष्टींचा अंतर्भाव होणे आवश्यक आहे असे मला वाटते. मध्यंतरी आपण दादर परिसरात हॉकर्स झोन केला. माझी माहिती चुकीची असेल तर त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी प्रकाश टाकावा. त्यावेळी सभागृहात चर्चा झाली होती. आपण हॉकर्स म्हटले की, डोक्यावर पाटी घेतलेल्या माणसाचे चित्र उभे राहते. ज्याला आपण "पीच" म्हणतो. तेव्हा हा हॉकर्स दुसऱ्या - तिसऱ्या मजल्यावर कसा धंदा करील हे जाणून घेणे महत्वाचे आहे. तसेच कष्टकरी वर्ग, कामगार वर्ग घरी जाता जाता घरच्या रस्त्यावर एखादा फेरीवाला असेल त्याच्याकडून त्याला कमी दरात भाजी मिळते म्हणून तो घेऊन जातो. कारण त्यासाठी त्याला कोणताही टॅक्स भरावा लागत नाही. फेरीवाल्याकडून कमी दरात भाजी मिळते म्हणून तो वर्ग तेथून खरेदी करतो ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. तेव्हा आपण जर फेरीवाल्यांना दुसऱ्या तिसऱ्या मजल्यावर जागा दिली तर हा कष्टकरी वर्ग त्या ठिकाणी जाऊन खरेदी करेल का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

सभापती महोदय, आपण दादर येथे करोडो रुपये खर्च करुन "हॉकर्स प्लाझा" उभा केला, परंतु आज त्याचे थडगे झालेले आहे. तेथे कोणीही धंदा करीत नाहीत. तेव्हा आपण या संदर्भात वास्तववादी धोरण स्वीकारणार आहात की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. आपल्या डोळ्यासमोर दादर येथील अनुभव आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सरकारने प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. माझ्या माहितीनुसार अंधेरी भागातील टिळक नगर, पालिका बाजार, नवरंग व मालाड येथील साईनाथ रोड हे चार विभाग हॉकर्स झोन म्हणून घोषित करण्याचे तत्कालीन युती सरकारने धोरण जाहीर केले होते. आमच्या सरकारने देखील तसे धोरण जाहीर केले आहे. तेव्हा माझी अशी सूचना आहे की, दादर येथे उभारण्यात आलेला "दादर हॉकर्स प्लाझा" पूर्णत: फेल्युअर झालेला आहे. त्याठिकाणी ज्या सुधारणा करण्याची आवश्यकता होती त्या बाबी ध्यानात घेऊन वरील चार ठिकाणी त्याप्रमाणे हॉकर्स झोन बनावावा.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप ...

शासनाने कोटयावधी रुपये खर्च करुन स्काय वॉक बांधले आहेत. मी सर्वच स्काय वॉकची आकडेवारी देत नाही, परंतु या स्काय वॉकवरुन चालण्याची लोकांना सवय नाही त्यामुळे हे स्काय वॉक अयशस्वी ठरले आहेत. अनेक लोकांना स्कायवॉकवरुन चालण्याची सवय नाही. रस्ता ओलांडून उडया मारुन जाण्याचीच सवय आहे तसेच फुटपाथवरुनच गर्दीतून धक्के खात चालण्याची लोकांना सवय आहे. त्याचा दोष लोकांकडे न जाता शासनाकडेच जास्त जातो. नियोजन करीत असतांना शासनाने जास्तीत जास्त प्रॅक्टीकल राहिले पाहिजे.नियोजन करीत असतांना ते जास्त वास्तववादी असणे हे अधिक महत्वाचे आहे. ख-या अर्थाने हॉकर्सला प्रस्थापित केले पाहिजे असे जर आपल्या मनात असले तरी एका बाबीचा आपण जरुन विचार केला पाहिजे.मुंबईत स्काय वॉकची संख्या 150 पेक्षा जास्त आहे असा माझा समज आहे. माझ्याकडे त्यासबंधी निश्चित आकडा नाही परंतु या बाबतीत आपण जो काही विचार मांडलेला आहे त्या बाबतीतील विचार किती प्रॅक्टीकल असू शकेल हे मला माहीत नाही परंतु तो विचार प्रॅक्टीकल असावा असे मला वाटते. हॉकर्सचा सबंध हा फक्त नागरिकांशी येतो नागरिकांनी स्कायवॉकवरुन जावे अशी आपल्या सर्वाची जरी इच्छा असली तरी त्यांची अडचण अशी आहे की, स्कायवॉकच्या खाली फुटपाथवर हॉकर्स बसलेले असतात आणि नागरिकांना घरी जात असतांना जीवनावश्यक वस्तू खरेदी करावयाच्या असतात त्यामुळे नागरिक स्कायवॉकवरुन न जाता फुटपाथवरुनच जातात हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. जे काही बांधकाम करण्यात आलेले आहे त्याचा वापर तर करुन घेतला पाहिजे. कोटयावधी रुपये खर्च करुन आपण हॉकर्स प्लाझा तयार केला आहे त्याचा काही तरी विनियोग करण्यात आला पाहिजे त्यादृष्टीकोनातून मी माझे मत या ठिकाणी मांडत आहे.

सभापती महोदय, कष्टक-याच्या रोजगाराच्या बाबतीत आपण नेहमीच अत्यंत पोटतिडकीने बोलत असतो त्यावेळी त्याच्यावर काही बंधनेसुध्दा असली पाहिजेत.काही गोष्टी सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी या ठिकाणी माडल्या आहेत.त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करुन चालणार नाही.या बाबतीत जो काही गैरवापर होतो तो आपण कशा प्रकारे थांबवू शकतो याकडे लक्ष घावे लागेल.असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या कलम 313 इ मध्ये असे म्हटलेले आहे की, " जो कोणी कलम 313 अ, 313 ब किंवा 313 ड यांच्या तरतुदींचे उल्लंघन करील, त्याची अपराधसिध्दी

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप ...

झाल्यावर, त्याला सहा महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या साध्या कारावासाची आणि पाच हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा ठोठावण्यात येईल, आणि असे पहिले उल्लंघन केल्यानंतर आणखी उल्लंघन करणे चालू राहिल्यास अशा प्रथम उल्लंघनासाठी अपराधसिध्दी झाल्यावर असे उल्लंघन करणे चालू राहील अशा प्रत्येक दिवसासाठी पाचशे रुपयापेक्षा कमी नसेल मात्र पाच हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा ठोठावण्यात येईल. "माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, या विधेयकात आपण आज ही तरतूद करीत आहात परंतु ही तरतूद केल्यानंतर 25 वर्षे याकडे कोणी ढुंकून पाहील असे मला वाटत नाही. 100 ते 500 रुपये दंड भरुन व्यवसाय करणा-यांचे रॅकेट त्या ठिकाणी सुरु आहे .एखाद्या विशिष्ट जागेवर जर दहा हजार रुपयांचा धंदा होत असेल तर तो असे म्हणेल की मी दररोज दंड भरीन. अशा प्रवृत्तीला शासन आळा कसा घालणार आहे ? म्हणून मला माननीय मंत्र्यांना या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की, ही शिक्षेची तरतूद अधिक कठोर असली पाहिजे. आपण जेव्हा त्यांच्या रोजगाराच्या प्रश्नाचा विचार करतो, त्याला पाठिंबा दिला पाहिजे, त्याला सहकार्य केले पाहिजे असे जेव्हा आपण म्हणतो त्यावेळी दंडाची रक्कम देखील अधिक असली पाहिजे. आज या कायद्यात आपण सुधारणा आणत आहोत परंतु 313 इ मध्ये जे सुचविले आहे त्याबाबतीत माझी एवढीच सूचना आहे की, जी दंडाची रक्कम सुचवली आहे त्या ऐवजी जास्त दंड आकारण्यात आला पाहिजे. सहा महिने शिक्षेची तरतूद केलेली आहे त्यात वाढ केली गेली पाहिजे आणि या सगळया केसेस फास्ट ट्रॅक कोर्टामार्फत त्वरित निकाली काढल्या पाहिजेत आणि जे कोणी अपराधी आहेत त्यांना त्या ठिकाणी व्यवसाय करण्यापासून मज्जाव करण्यात आला पाहिजे, तसे केले तर एखादी व्यक्ती आपल्या ऐवजी दुस-या व्यक्तीला व्यवसाय करण्यासाठी जागा देण्याचे प्रकार करते ते थांबतील..

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

असे मी याठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो. मागील वेळी माझे विचार व्यक्त करीत असतांना आपल्याला काही सूचना केल्या होत्या. कदाचित त्यांची नोंद आपणाकडे असेल. मंत्री महोदय, आपण अभ्यासू आहात याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. हा विषय आमच्याशी निगडीत आहे. कारण त्यांचे नेतृत्व करीत असतांना सुप्रीम कोर्टामध्ये गेली दहा ते पंधरा वर्षे आम्ही लढत आहोत. आणि म्हणून राजकीय अभिनिवेश न आणता आपल्याला या कायद्याचे गठन कशाप्रकारे करता येईल आणि यामध्ये फेरीवाल्यांना कशाप्रकारे संरक्षण देता येईल . त्याचबरोबर त्यांच्यावर कशी बंधने घालता येतील याचा विचार करावा असे मी संबोधित करुन आपण मला संधी दिल्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मंत्री महोदयांची उत्सुकता मला माहीत आहे. मी मंत्री महोदयांना नम्रपणे सांगू इच्छितो की, हे शासकीय विधेयक आहे आणि ते सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार आहे. त्यावर या सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने घातलेल्या बंधनामुळे शासनाने हे विधेयक या सभागृहामध्ये आणले आहे त्यावर मी माझे विचार याठिकाणी मांडणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात काय म्हटले आहे ते जर समोर आले तर यामध्ये नक्की कोण असणार आहे आणि कोण नसणार आहे यासंबंधीचा खुलासा देखील याठिकाणी होईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी फार महत्त्वाचे मुद्दे मांडले. परंतु सर्वोच्च न्यायालयाने ते मुद्दे नाकारले आहेत हे आपल्याला माहीत आहे, ते मी याठिकाणी वाचून दाखविणार आहे. याठिकाणी मी ज्या अधिसूचना मांडल्या आहेत त्यावर मी नंतर बोलणार आहे. सभापती महोदय, शासनाने मुंबई महानगरपालिकेची स्वायत्तता कायम ठेवण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मला आनंद आहे, त्या निर्णयाचे मी मनापासून स्वागत करतो. त्याबाबत जास्त चर्चा न करता फक्त हे विधेयक याठिकाणी मांडले जाईल व नंतर ते विधानसभेमध्ये मंजूर होईल व त्यानंतर कायदा अस्तित्वात येईल हा सोपस्काराचा भाग झाला.

सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, हे विधेयक आपण थांबवून ठेवले होते. या विषयावर आदरणीय उप सभापती महोदयांच्या दालनामध्ये फार गंभीर स्वरुपाची चर्चा झाली. तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. अशोकरावजी चव्हाण हे स्वत: आले आणि त्यांनी विनंती केली. त्यावेळी मी त्याठिकाणी उपस्थित होतो. मी त्यांच्या निर्दशनास काही गोष्टी आणून दिल्या होत्या. त्यावेळी ते म्हणाले की, ठीक आहे ही चर्चा झाली पाहिजे आणि म्हणून त्यावेळी सभागृहामध्ये गोंधळ असतांना सुध्दा घाई-घाईत हे विधेयक संमत केले नाही. मी आज सुध्दा सरकारला धन्यवाद देतो की, काल देखील कामकाज उरकून घेण्याच्या कार्यक्रमामध्ये माननीय उप मुख्यमंत्री व या सभागृहाचे नेते श्री. अजितदादा पवार यांनी देखील या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन हे विधेयक संमत करुन घेतले नाही. या विधेयकाच्या बाबतीत मी कामकाज सल्लागार समितीमध्ये आग्रह धरला होता की, अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयामध्ये हे विधेयक चर्चेकरिता आणले पाहिजे. कारण हे विधेयक तातडीने मंजूर होणे आवश्यक आहे आणि म्हणून उपसूचना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

श्री. दिवाकर रावते ...

मान्य करुन हे सरकार मुंबई महानगरपालिकेची स्वायत्तता अबाधित ठेवणार असेल तर हे विधेयक तातडीने मंजूर होणे आवश्यक आहे आणि ते होत असतांना या सदनामध्ये माननीय सदस्यांच्या भावना व्यक्त झाल्या पाहिजेत. हे विधेयक फक्त मुंबई व नागपूर शहराकरिता आहे काय? नाही तर महाराष्ट्रामध्ये असलेल्या छोटया-मोठया शहरांमध्ये असलेल्या फेरीवाला विभागासंदर्भात हे विधेयक आहे. हा संपूर्ण कायदा महाराष्ट्रामधील शहरांसाठी होणार आहे. या विधेयकाचे महत्वाचे गांभीर्य असे की, यामध्ये किती टक्के फेरीवाले आहेत यापेक्षा आज संपूर्ण देशामध्ये जी परिस्थिती निर्माण झाली आहे, आज ग्रामीण भाग ओस पडला आहे, शहरीकरण वाढत आहे. आणि आज 42 टक्क्यांवर असलेले शहरीकरण येत्या 15 वर्षामध्ये 52 टक्क्यापर्यंत जाईल आणि ग्रामीण भाग अल्पमतात येईल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत जे शहरामध्ये येणार आहेत ते उद्योगधंदे बसविणार आहेत. त्यामुळे शहरी भागामध्ये येणारे लोंढे गंमत करावयास येणार नाहीत. ते आपले उदरनिर्वाहाचे साधन शोधण्यासाठी येणार आहेत. याचे गांभीर्य लक्षात घेऊन या विधेयकामधून फार महत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे म्हणून हे विधेयक तातडीने मंजूर होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात आपल्याला अनेक गोष्टी सांगता येतील. तत्कालीन मंत्री नामदार श्री. राजेश टोपे यांनी मला दिनांक 12 नोव्हेंबर 2008 रोजी एक पत्र पाठविले होते. त्या पत्राचा विषय शहरातील फेरीवाला विभाग निर्माण करण्यासंदर्भातील होता. त्यामध्ये त्यांनी म्हटले होते की, विधानसभा आणि विधानपरिषदेतील सर्व आमदारांना बोलावून उपरोक्त विषयांच्या बाबतीत संदर्भीत पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येत आहे की, राज्यातील इतर भागातील फेरीवाल्यांच्या समस्यांपेक्षा बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांच्या समस्या काही अंशी वेगळया आहेत, जटिल आहेत असे आमचे मत आहे. सरकारच्या लक्षात आले आहे की, उर्वरीत महाराष्ट्र आणि मुंबईच्या बाबतीत हा विषय वेगळया पध्दतीने हाताळावा लागेल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याठिकाणी पुढे असे म्हटलेले आहे की, "बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांच्या विनिमया संदर्भात करावयाच्या उपाययोजनांबाबत बृहन्मुंबई सन्माननीय विधानसभा व विधान परिषद सदस्यांचे मत जाणून घेण्यासाठी दिनांक 23-10-2008 रोजी बैठक बोलावून विचारविनिमय करुन सादर करण्यात आले आहे." त्याप्रमाणे सदरहू बैठक बोलविण्यात आली होती आणि त्यावेळी आम्ही सर्वजण उपस्थित होतो. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप देखील कदाचित त्यावेळी उपस्थित असतील. पण त्यावेळी ही बैठक जवळजवळ उद्ध्वस्त आणि उधळून लावण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. कारण त्या बैठकीमध्ये जे सादरीकरण करण्यात आले होते, ते अतिशय गंभीर स्वरुपाचे होते. तसेच ते सादरीकरण तुम्हाला आणि आम्हाला देखील उपलब्ध करुन दिले नाही. त्यावेळी आपण सांगितले होते की, आम्हाला अभ्यास करण्यासाठी ते देण्यात यावे. पण नंतर मी ते माननीय मंत्री महोदयांकडूनच अधिकृतरित्या उपलब्ध करुन घेतले. खरे म्हणजे ज्यावेळेस आम्हाला सादरीकरण मिळाले, तेव्हाच मी उप सूचना मांडलेल्या आहेत की, शहरामध्ये फेरीवाले किती असावेत ? तर यासंदर्भात सादरीकरणामध्ये म्हटलेले आहे की,लोकसंख्येच्या दोन टक्के फेरीवाले असावेत.जर मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी धरली तर याठिकाणी फक्त दोन लाखच फेरीवाले असावयास पाहिजेत. यापेक्षा याठिकाणी जास्त फेरीवाले असता कामा नयेत असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने जे सांगितलेले आहे, ते मी वाचणार आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"ना फेरीवाला क्षेत्रातील फेरीवाल्यांना स्थलांतरीत करण्यात येईल."तसेच त्यामध्ये सामाजिक सुरक्षिततेचा मुद्दा देखील मांडण्यात आला आहे. महानगरपालिका शहर विकास समितीची स्थापना झाल्यानंतर त्यामध्ये निर्णय घेणारे प्रमुख कोण असणार आहेत? त्यात महापौर, उप महापौर, स्थायी समितीचे सभापती, सभागृहाचे नेते, विरोधी पक्षनेते, आयुक्त, पोलीस उप आयुक्त (वाहतूक) आणि पोलीस आयुक्तांच्यावतीने नामनिर्देशित केलेला अधिकारी. तेव्हा याबाबतीत जर महानगरपालिकेनेच निर्णय घ्यावयाचा असेल तर याठिकाणी मी उपसूचना मांडलेल्या आहेत. त्यानुसार "राज्य शासनाची पूर्वमान्यता घेऊन" हा विषय येथे लागू होत नाही. कारण याबाबतीतील अधिकार पूर्णपणे त्यांच्याकडे जाणार आहे म्हणून संपूर्ण तो भाग डिलीट करण्यात यावा. यासाठी मी ही बाब उपस्थित केली आहे आणि हे गांभीर्य लक्षात आल्यानंतर शासनाने यासंदर्भात होकारार्थी मतप्रदर्शन केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

. . . .आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, ना-फेरीवाला क्षेत्र कसे असावे यासंदर्भात म्हटलेले आहे की, "2 मीटर पेक्षा कमी रुंदीचे पदपथ, गर्दीच्या ठिकाणी वाहतूक कोंडीच्या ठिकाणी, गोपनीयता व सुरक्षिततेच्या ठिकाणी, संवेदनशील ठिकाणे उदा.धार्मिक स्थळे, शैक्षणिक स्थळे, रुग्णालये व दुकानाच्या समोरील पदपथ येथे फेरीवाले नसावेत. अशा प्रकारे जर निर्देश दिलेले असतील तर आमच्या दादर मधील लोकांचे आक्रंदन आहे की, आम्हाला तेथून जाता-येता येत नाही. तसेच दादर मधील जे फेरीवाले आहेत, ते प्रामुख्याने दुकानदारांनीच बसविलेले आहेत. त्यांच्याचकडील माल ते बाहेर विकतात. परंतु जर दुकानदारांसमोर फेरीवाला नसावा अशा प्रकारचे निर्देश असतील तर ते मग या बाबी तुम्ही कशा काबूत आणणार आहात हे मला शासनाकडून समजून घेण्यामध्ये जास्त स्वारस्य आहे. मी येथे जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने उल्लेख केलेल्या बाबी वाचेन, त्यावेळी आपल्या लक्षात येईल की, शासनाने तयार केलेले जे निर्देश आहेत, त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करणाऱ्या बाबी आहेत.

(सभापतीस्थानी - माननीय उपसभापती)

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सभागृहाच्या या विशेष बैठकीची वेळ 15 मिनिटाने वाढवावयाची काय?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझे भाषण ऑन लेग ठेवण्यात यावे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

उपसभापती : अनेक सन्माननीय सदस्यांनी एकाचवेळी न बोलता कोणाही एका सन्माननीय सदस्यांनी बोलावे. सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई आपले म्हणणे काय आहे?

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, या विधेयकावरील चर्चा पुढच्या आठवडयात ठेवण्यात यावी. याचे कारण असे की, या विधेयकावर बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. अतिशय महत्वाचे असे हे विधेयक आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे भाषण ऑन लेग ठेवावयाचे की, सभागृहाच्या या विशेष बैठकीची वेळ 15 मिनिटांनी वाढवावयाची असे मी याठिकाणी विचारले होते.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, सभागृहाची विशेष बैठक सकाळी 11.00 वाजता सुरु झालेली आहे त्यामुळे आता ती तहकूब करण्यात यावी. सभागृहाची नियमित बैठक 1.00 वाजता सुरु होणार आहे. तोपर्यंत आम्हाला अर्धा-तास वेळ मिळेल.

उपसभापती : ठीक आहे. सभागृहाचे नियमित कामकाज 1.00 वाजता सुरु होईल.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.30 ते 1.00 वाजे पर्यंत तहकूब झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाबाबत

सभापती : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये दोन प्रस्ताव आलेले आहेत. त्यापैकी एक प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी दिलेला आहे आणि दुसरा प्रस्ताव माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी दिलेला आहे. माननीय विरोधी पक्ष नेते यांना याबाबतीत काही सांगावयाचे असेल तर थोडक्यात सांगावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नागपूरचे हे हिवाळी अधिवेशन सुरु झाल्यानंतर गेल्या दोन दिवसांपासून या सभागृहाचे बाकीचे कामकाज बाजूला सारुन महाराष्ट्रातील अवकाळी पावसावर आणि अतिवृष्टीवर चर्चा करुन या राज्यातील 27-28 जिल्ह्यातील जे शेतकरी उद्ध्वस्त झालेले आहेत त्या शेतकऱ्यांना न्याय मिळावा अशी आम्ही मागणी केली. त्या आधी शासनाने घोषणा करावी अशा प्रकारची मागणी आम्ही केली होती. मी या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. आमचा जो मुद्दा होता की, गेल्या दोन तीन वर्षात जी जी नैसर्गिक अवकृपा झाली आणि त्यासंदर्भात सरकारतर्फे मदत जाहीर करण्यात आली ती मदत आतापर्यंत शेतकऱ्यांना मिळालेली नाही. त्यामुळे सरकारने काहीही घोषणा केली तरी ती मदत मिळणार नाही असा आमचा निश्चित समज झालेला होता. म्हणून आम्ही आग्रही होतो की, आधी घोषणा करावी त्यानंतर आम्ही चर्चा करण्यास तयार आहोत. आम्ही चर्चा नाकारलेली नव्हती. परंतु काल माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या सभागृहामध्ये या राज्यातील नैसर्गिक आपत्तीमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांचे जे 250 कोटी रुपये होते, मग लाल्या रोगाचे असतील, अतिवृष्टीच्या संदर्भात असतील किंवा खरडून गेलेल्या जमिनीच्या संदर्भातील असतील, ते 250 कोटी रुपये येत्या मार्चच्या आत देण्याचा निर्णय जाहीर केला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचा एक निर्णय झालेला आहे.

सभापती महोदय, जे विद्युत कनेक्शन कट झालेले आहेत ते ताबडतोब जोडण्यात येतील अशा प्रकारची घोषणा शासनाने करावी अशी आमची दुसरी मागणी होती. याबाबतीत मी माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

उपमुख्यमंत्र्यांना आठवण करुन देऊ इच्छितो की, त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर जी पत्रकार परिषद घेतली त्यामध्ये त्यांनी या राज्यामध्ये अतिवृष्टी झाल्याचे मान्य केले आणि त्यांनी आपल्या पत्रकार परिषदेमध्ये पंचनाम्याचे आदेश दिले. त्याचबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांनीही आदेश दिलेले आहेत. या सरकारने अतिवृष्टीमुळे शेतकरी उद्ध्वस्त झालेले आहेत हे तत्वत: मान्य केले आहे. जर शासनाने हे मान्य केले असेल आणि राज्यामध्ये जर ओला दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झाली असेल, राज्यामध्ये ओला दुष्काळ पडला असेल तर त्या ओल्या दुष्काळाच्या अनुषंगाने ज्या ज्या सवलती शेतकऱ्यांना द्यावयाच्या असतात त्या सरकारला द्याव्या लागणार आहेत आणि त्यामध्ये ज्या शेतकऱ्यांचे विद्युत कनेक्शन कट झालेले आहेत त्या शेतकऱ्यांना कनेक्शन जोडून देण्याचा मुद्दा सुध्दा येणार आहे. काल माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी सांगितले की, जे शेतकरी चालू बिल भरतील त्यांचे कनेक्शन तोडणार नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

तो एक प्रश्न सुटला आहे. एका ट्रान्फार्मरवर जर 20 कनेक्शन्स असतील आणि त्यापैकी केवळ 10 शेतक-यांनी विजेच्या बिलाचे पैसे भरले असतील तरी सर्व कनेक्शन्स बंद करण्याचा सपाटा वीज कंपनीने लावलेला होता, तो प्रकार यानंतर होणार नाही असे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आम्हाला आश्वासन दिलेले आहे. या राज्याच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. या गंभीर विषयावर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना आपापली मते मांडावयाची आहेत, सभागृहात चर्चा घडवून आणावयाची आहे. शासनाने ओला दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झाल्याचे मान्य केलेले आहे. त्यादृष्टीने एक पॉझिटिव्ह संकेत शेतक-यांपर्यंत जावा. या सभागृहातील बाकीचे कामकाज बाजूला सारुन ताबडतोब या विषयावर चर्चा करण्यासाठी आम्ही तयार आहोत. दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांना आपल्या भावना व्यक्त करावयाच्या आहेत. राज्याच्या दृष्टीने हा महत्वाचा प्रश्न आहे. गेल्या 3 दिवसांपासून नागपूरमध्ये अधिवेशन सुरु झाल्यानंतर शेतकऱ्यांना काय मिळणार आहे त्याची शेतकरी वाट पहात आहेत. म्हणून ही चर्चा अत्यंत महत्वाची असल्यामुळे ती सुरु झाली पाहिजे अशी आमची भावना आहे तशीच सत्तारुढ पक्षातील सभासदांची सुध्दा आहे. त्यादृष्टीने या चर्चेला आपण अनुमती द्यावी अशाप्रकारची मी आपल्याला विनंती करतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, नियम क्रमांक 289 अन्वये मी देखील आपल्याकडे एक प्रस्ताव दिलेला आहे. आपल्यामार्फत शासनाला एक गोष्ट सांगितली पाहिजे की, एका बाजूला अस्मानी संकट आणि दुस-या बाजूला शासननिर्मित संकट अशा कैचीत शेतकरी सापडला आहे. गेल्या 8 दिवसात विदर्भातील 12 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. मागील एका वर्षात विदर्भातील 700 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. यवतमाळ जिल्हयातील श्री.रवींद्र खोके, श्री.सुभाष आढाव, अमरावती जिल्हयातील श्री.शामराव सोळंकी, श्री.सुधीर साबळे, चंद्रपूर जिल्हयातील श्री.अरुण धावडे, श्री.हेमंत पाटोळे अशी ही नावे असून ती आपल्याकडे पाठविलेली आहेत. एका बाजूला अवकाळी पाऊस पडला आहे व दुस-या बाजूला शासन शेतक-यांवर अन्याय करीत आहे. माननीय उपमुख्यमंत्री यांचे मी आभार मानतो. मागच्या वेळी 300 कोटी रुपये देण्याचे शासनाने जाहीर केले होते ते आता दिले जातील असे त्यांनी सांगितले आहे. मग आताची मदत शेतक-यांना कधी दिली जाईल ?

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, आपण जो प्रस्ताव दिलेला आहे तो नियम 289 अन्वये कसा होतो तेवढेच सांगावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, या अधिवेशनाच्या पूर्व संध्येला 10-12 शेतक-यांच्या आत्महत्या होतात, त्याचा डायरेक्ट शासनाशी संबंध आहे, या विषयाला तातडी आहे. शासनाने चर्चेपूर्वी पॅकेज जाहीर केल्याची अनेक उदाहरणे आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी देखील चर्चेपूर्वी पॅकेज जाहीर केले होते. त्यामुळे आम्ही काही नवीन सांगत आहोत, नवीन मागणी करीत आहोत अशातील भाग नाही. माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी मागे जाहीर केलेले पैसे तात्काळ देतो असे सांगितल्याबद्दल मला त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. आम्ही याच्या व्यतिरिक्त एक मागणी केली होती की, शेतीचे विजेचे पंप आहेत ते तात्काळ सुरु करावेत. मागील 3 दिवस चर्चा होऊ शकली नाही. परंतु आज आम्ही पुन्हा या विषयावरील प्रस्ताव दिलेला आहे. प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून, शेतकरी आत्महत्या करीत असल्यामुळे ही बाब तातडीची समजून नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाला मान्यता द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.अजित पवार : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन बाकीचे कामकाज बाजूला ठेवण्याची मागणी केलेली आहे. अवेळी पडलेला पाऊस व अतिवृष्टी या दोन्ही संकटात राज्यातील शेतकरी सापडलेला आहे, त्रासलेला आहे त्यातून त्याला बाहेर काढण्यासाठी सरकार काय मदत करणार आहे अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. या विषयाबाबत सरकारला देखील आपली भूमिका मांडावयाची आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आज जो मुद्दा मांडला आहे त्याबाबत मी काल देखील सांगितलेले आहे. आता दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या विषयावर चर्चा करण्याची तयारी दर्शविलेली आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून अवकाळी पावसासंबंधी चर्चा करण्यासंबंधी जो नवीन प्रस्ताव मांडलेला आहे. त्या प्रस्तावात असलेल्या महत्वाच्या विषयाला सत्ताधारी पक्षाचाही पाठिंबा राहील.

यानंतर श्री.शिगम

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अजित पवार...

माझी अशी विनंती आहे की, आज निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना निरोप द्यावयाचा आहे. त्यानंतर सर्वांना महत्वाच्या स्वागत समारंभासाठी जावयाचे आहे. त्यामुळे चर्चेला सुरुवात झाल्यानंतर त्या चर्चेसाठी ठराविक वेळ द्यावी आणि त्यानंतर निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम घ्यावा आणि त्यानंतर कामकाज थांबवावे आणि राहिलेली चर्चा उद्या पूर्ण करावी. या चर्चेला सत्ताधारी पक्षाच्या वतीने उद्या उत्तर देण्यात येईल. या कामकाजाच्या क्रमाला माननीय सभापतींनी, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि सभागृहाने मान्यता द्यावी.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी देखील नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री आणि सभागृहाचे नेते श्री. अजित पवार यांनी महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली परिस्थिती, पडलेला ओला दुष्काळ याबाबतच्या आपल्या भावना सभागृहासमोर व्यक्त केलेल्या आहेत. हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे असे विरोधी पक्षातर्फे जसे सांगण्यात आले त्याप्रमाणे सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या दृष्टीने देखील हा जीवाभावाचा प्रश्न आहे, शेतक-यांच्या जीवाभावाचा प्रश्न आहे. सभागृहाचे सन्माननीय नेते, सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि अन्य सन्माननीय सदस्य यांची माझ्या दालनामध्येही चर्चा झाली. खरे तर पहिल्या दिवशी अवेळी पावसामुळे निर्माण झालेली परिस्थिती ही अत्यंत महत्वाची बाब असल्यामुळे या संदर्भात सभागृहापुढील सर्व कामकाज तहकूब करुन चर्चा करण्यास मी परवानगी दिली होती. परंतु अन्य काही कारणामुळे ती होऊ शकली नाही. काल देखील ही चर्चा होऊ शकली नाही. सुदैवाने आज दोन्ही बाजूकडून नवा प्रस्ताव आलेला आहे. हा प्रस्ताव एक अपवाद म्हणून मी मान्य करतो.तसे पाहिले तर नियम 289मध्ये ही चर्चा बसत नसली तरी महाराष्ट्रामध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे जी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्यावर खुल्या मनाने चर्चा केली पाहिजे. म्हणून मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करीन की, आता आपण कामकाजपत्रिकेवरील औपचारिक कामकाम 10 मिनिटामध्ये पूर्ण करु. त्यानंतर या चर्चेला सुरुवात करु. ही चर्चा बरोबर 2.30 वाजता थांबविण्यात येईल. त्यावेळी बोलणा-या सन्माननीय सदस्यांचे भाषण अपूर्ण राहिल, ते सदस्य ऑन लेग असतील. अपूर्ण राहिलेली चर्चा उद्या केव्हा घ्यायची त्याची वेळ मी ठरवीन.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी आणि दहावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अतांराकित प्रश्नोत्तराच्या याद्या सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने धुळे नंदुरबार जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, धुळे यांचा सन 2007-2008चा एकोणीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अकोला-वाशिम-बुलढाणा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अकोला यांचा सन 2003-2004, 2004-2005 व 2005-2006 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : सभापती महोदय, पिंपरी चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, चिंचवड यांचा सन 2001-2002, 2002-2003, 2003-2004, 2004-2005, 2005-2006 व 2006-2007 चा अनुक्रमे दहावा, अकरावा, बारावा, तेरावा, चौदावा व पंधरावा वार्षिक अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सोलापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, सोलापूर यांचा सन 2004-2005 व 2005-2006 चा अनुक्रमे सोळावा व सतरावा वार्षिक अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचा सन 2008-2009 चा चौविसावा वार्षिक अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर यांचा सन 2007-2008 चा सतरावा वार्षिक अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, दी रेल्वे गुड्स क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डींग एस्टॅब्लिशमेंट लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन 2008-2009 चा बत्तीसावा वार्षिक अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>कामकाम पत्रिकेतील कामकाजाबाबत</u>

सभापती : नियम 289 अन्वये परवा, काल आणि आजही ज्या सूचना प्राप्त झाल्या त्या सर्व सूचनांमधील विषय जवळजवळ समान आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 97 अन्वये प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी. या प्रस्तावावर सत्तारुढ आणि विरोधी पक्षाकडील सन्माननीय सदस्य आपले विचार मांडतील. ही चर्चा होत असताना सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी दुष्काळाविषयी जो प्रस्ताव दिलेला होता, त्या प्रश्नासंबंधी भाष्य करण्यास काही हरकत नाही. कामकाजपत्रिकेतील प्रश्नोत्तराचा तास आज होणार नाही. कामकाजपत्रिकेमध्ये अन्य ज्या बाबी आहेत त्या देखील आज चर्चेला घेतल्या जाणार नाहीत. फक्त निवृत्त सदस्यांना निरोप देण्यात येईल. अशासकीय कामकाज देखील आज होणार नाही.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, आज आणि मागील दोन दिवस प्रश्नोत्तराचा तास झालेला नाही. त्यामुळे या प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न पुढील काळात चर्चेला घेण्यात येणार आहेत की नाही?

सभापती : मी यापूर्वीच सांगितले आहे. माझ्या दालनामध्ये सदनाचे नेते आणि विरोधी पक्षनेते यांच्यासमवेत चर्चा झाली. त्या चर्चेनुसार नियम 97 अन्वये मान्य करण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चा व्यवस्थितरित्या होण्यासाठी आजचे अन्य कामकाज तहकूब करण्यात येत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रस्ताव मांडण्यापूर्वी माननीय मदत आणि पुनर्वसन मंत्री सभागृहात उपस्थित असणे योग्य होईल.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, विधानसभेमध्ये याच विषयावर चर्चा सुरु होणार असल्यामुळे सन्माननीय मदत व पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम खालच्या सभागृहात उपस्थित आहेत. त्या विभागाचे माननीय राज्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. मी स्वत: देखील उपस्थित आहे. त्यामुळे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी, अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती : ठीक आहे. आता माननीय विरोधी पक्षनेते प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे शेतीपिकाचे झालेले नुकसान

मु.शी.: अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे शेतीपिकाचे झालेले नुकसान यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री चंद्रकांत पाटील, किरण पावसकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री परशुराम उपरकर, जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

सभापती : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे सन्माननीय सदस्यश्री.पांडुरंग फुंडकर आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"या वर्षी जुलै-ऑगस्ट, 2010 महिन्यामध्ये आणि त्यानंतर झालेल्या अतिवृष्टीने विदर्भ, खानदेश, कोकण, मराठवाडा तसेच माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, 2010 मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे धान, कापूस, सोयाबीन, ज्वारी, उडीद, मूग, तीळ, भाजीपाला व फळे तसेच कोकणातील भातशेती आणि फळबागा यांचे झालेले नुकसान तसेच 40 शेतमजूर व शेतकऱ्यांचे झालेले मृत्यू, शेतकऱ्यांच्या कृषि पंपांची वीज जोडणी तोडण्यात येणे, राज्यातील अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन ओला दुष्काळ जाहीर करण्याची शेतकऱ्यांची मागणी व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नंतर एक्स.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, राज्याच्या तसेच राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेल्या या प्रस्तावावर गेल्या दोन दिवसांपासून चर्चा झाली पाहिजे अशी आमची मागणी होती. फरक एवढाच पडला की विरोधी पक्षाची मागणी होती की प्रस्तावावर चर्चा होण्यापूर्वी काही घोषणा शासनाने सभागृहात केल्या पाहिजेत, परंतु शासनाने आमची मागणी मान्य केली नाही. त्यात आमची पहिली मागणी अशी होती की, कापूस, ज्वारी, मूग, उडीद आणि सोयाबीन या पिकांचे जे नुकसान झालेले आहे त्या नुकसानीपोटी सरकारने हेक्टरी 25 हजार रुपये एवढी मदत द्यावी. दुसरी मागणी होती की, फळबागांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्याला हेक्टरी 50 हजार रुपयाची मदत करावी. पण दुष्काळात तेरावा महिना या उक्तीप्रमाणे राज्यात सुध्दा प्रचंड अतिवृष्टी झाली, शेतातील पीक उद्ध्वस्त झाले. विहिरीत, तळ्यात तसेच नद्यांमध्ये पाणी असल्यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढली आहे म्हणून शेतकऱ्याला थोडीसी रब्बीच्या पिकाची आशा होती. त्या आशेपोटी शेतकऱ्याने आपल्या शेतीची मशागत करण्यास सुरुवात केली. गहू पेरावयाचा असेल तर त्याला पाणी द्यावे लागते, हरभऱ्याच्या पिकाला सुध्दा पाणी भरावे लागते, उन्हाळी भुईमूग किंवा सुर्यफुलाच्या पिकासाठी सुध्दा विहिरीचे पाणी द्यावे लागते. असे पाणी देण्यासाठी विजेची गरज असते. पण राज्यातील विजेची कनेक्शन्स मोठ्या प्रमाणात तोडण्यात आलेली आहेत. गेल्या दोन चार महिन्यात राज्यात धो-धो पाऊस पडत होता, जणू निसर्गाचाच कोप झाला असे वाटत होते. गेल्या 20 वर्षाच्या काळात असे कधीही झाले नाही, एवढा पाऊस कधीच पडला नाही तितका या एकाच वर्षात पडला. दुसऱ्या बाजूला मात्र राज्यात मोठ्या प्रमाणात लोड शेडिंगचे संकट, त्यात वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांनी विजेचे कनेक्शन्स तोडण्याची मोहीम सुरु केली. अशा अवस्थेमध्ये शेतकरी घाबरला आणि ही कनेक्शन्स कपात करु नये अशा प्रकारची विनंती शेतकऱ्याने वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांना केली. आम्ही देखील हीच मागणी केली होती की, राज्यातील शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन्स तोडण्याचे थांबवावे आणि ज्यांचे कनेक्शन्स तोडले असतील ते किमान एप्रिल, 2011 पर्यंत तरी सुरु ठेवावेत, जेणेकरुन त्याला या काळात रब्बीचे पीक तरी घेता येईल. आम्ही शेतकऱ्याला वीज बिलाची माफी देण्याची मागणी करीत नाही. मी कालही सांगितले होते की, शेतकऱ्याला भीक नको आहे परंतु तो अडचणीत सापडलेला असल्याने त्याला मदत करणे ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

शासनाचीच जबाबदारी आहे म्हणूनच ही कनेक्शन्स तोडू नयेत अशी मागणी होती आणि ती शासनाला मान्य करायला हरकत नव्हती. वास्तविक माननीय उप मुख्यमंत्र्यांकडेच तिजोरीच्या चाव्या आहेत त्यामुळे पैसा कुठेही कमी पडणार नाही. तसेच त्यांची क्षमता सुध्दा आहे व त्यांनी ठरविले की, राज्यातील शेतकऱ्यासाठी पैसा आणावयाचा आहे तर ते असा पैसा आणू शकतात याची आपणा सर्वांना जाणीव आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना जरी त्यांनी एक शब्द टाकला तरी त्यांच्या बँकेतून ते पैसा उभा करु शकता आणि आपणही त्यांना नकार देणार नाही, परंतु असे शासनाने काल सभागृहात सांगितले असते तर आम्हाला अधिक आनंद झाला असता तसेच या राज्याच्या उप मुख्यमंत्र्याची धुरा सांभाळताना माननीय उप मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना दिलासा देऊन पहिला एक चांगला निर्णय घेतला असा चांगला संकेत शेतकऱ्यांमध्ये गेला असता. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी काल सदनात सांगितले की, राज्यातील शेतकऱ्यांकडे वीज बिलापोटी 5000 कोटीची थकबाकी आहे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

शेतक-याकडे 5 हजार रुपये थकबाकी असली तरी आपण शेतक-यांचे वीज कनेक्शन कट केलेली आहेत. परंतु मला आपण सांगा की, आपल्या राज्यातील उद्योग धंद्यावाल्यांकडे किती कोटी रुपयांची थकबाकी आहे, सिंचनाच्या सोसायटयांकडे किती कोटी रुपयांची बाकी आहे, साखर कारखान्यांकडें विजेची किती कोटी रुपयांची थकबाकी आहे व त्यातील किती कोटी रुपये शासनाने माफ केलेले आहेत ? अन्नदाता शेतक-यांची आपल्याकडे फार काही मोठी मागणी नाही. आपण शेतक-यांच्या संदर्भात काल जी घोषणा केलेली आहे त्या संदर्भातील आदेश त्वरित काढले तर आमचा शेतकरी जिवंत राहू शकेल. अतिवृष्टीमुळे शेतक-यांची अस्वस्थता वाढत चालली आहे. शेतक-यांकडील मागच्या वर्षाचे जे 250 कोटी रुपये बाकी होते ते आपण माफ केल्यामुळे शेतक-यांना दिलासा मिळाला आहे. या चर्चेच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडून जे काही उत्तर येईल ते पॉझीटीव्ह येईल अशी आम्हाला खात्री आहे. शेतक-यांच्या संदर्भातील आमच्या मागण्या फार काही नाहीत. शासनाने ओला दुष्काळ, अतिवृष्टी व अवकाळी पाऊस जाहीर करावा, शेतक-याचे जे नुकसान झालेले आहे त्यासाठी शासनाने धानासाठी हेक्टरी 25 हजार रुपये मदत जाहीर करावी, फळबागासाठी हेक्टरी 50 हजार रुपये मदत जाहीर करावी तसेच ज्या शेतक-यांचे वीज कनेक्शन्स तोडलेले आहेत ते किमान चार महिन्यासाठी जोडून द्यावे, शेतक-याकडे विजेची जी थकीत बिले असतील त्याचे हप्ते पाडून द्यावेत व शेतक-यांची विजेची जी कनेक्शन्स तोडलेली आहेत ती पुन्हा जोडून द्यावीत अशा आमच्या मागण्या आहेत.

सभापती महोदय, एखाद्या ट्रान्सफॉर्मवर 30 कनेक्शन असतील व त्यातील 20 शेतक-यांनी विजेचे बील भरले नसले तरी सुध्दा तो ट्रान्सफॉर्मर बंद केला जात असे. म्हणजे जो प्रामाणिकपणे विजेचे बील भरतो त्याचे वीज कनेक्शन बंद केले जात असे. त्यामुळे मा. उपमुख्यमंत्र्यांनी हे ट्रान्सफॉर्मर पुन्हा सुरु करण्याचे आदेश आजच्या आज वीज मंडळाला देणे गरजेचे आहे. जो प्रामाणिकपणे विजेचे बील भरतो त्याचे कनेक्शन्स अजिबात तोडता कामा नये , त्याला वीज दिलीच गेली पाहिजे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मी दोन वेळा विधानसभेचा सदस्य म्हणून काम केलेले आहे व गेल्या आठ वर्षापासून विधानपरिषदेमध्ये काम करीत आहे. ज्या ज्यावेळी विदर्भामध्ये हिवाळी अधिवेशन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

होते त्या त्या वेळी विदर्भातील शेतक-यांना, विदर्भवासीयांना 3-3,2-2,1-1 हजार कोटीच्या पॅकेजचा तुकडा टाकून शासन निघून जात असते. तुकडा टाकून विदर्भातील शेतक-यांची दिशाभूल केली जात असते त्यामुळे यावर्षी नेहमी प्रमाणे होऊ नये म्हणून आम्ही शेतक-याला शासन काय नुकसानभरपाई देणार आहे या घोषणेची वाट पहात होतो. आज आपल्या राज्यात गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे, निसर्ग बदलत चालला आहे. नोव्हेंबरच्या शेवटी पाऊस कधी पडत नसे परंतु गेल्या आठ दिवसापूर्वी विदर्भातील अनेक जिल्हयात प्रचंड प्रमाणात पाऊस पडल्यामुळे शेतक-यांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. आपल्याला माहिती आहे की, नागपूरला अधिवेशनासाठी आल्यानंतर नागपूरमध्ये एकही माणूस बिगर स्वेटरचा बाहेर पडत नसे परंतु आज नागपूरमध्ये आपल्याला कोणीही स्वेटर घातलेला माणूस सापडणार नाही. खरे म्हणजे निसर्ग बदलत चालला आहे. बदलत्या निसर्गामुळे शेतकरी उद्ध्वस्त होत चालला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सांगितले आहे की, विदर्भामध्ये गेल्या 72 तासात 17 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. पूर्वीच्या काळात शेतकरी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करीत असे परंतु आज शेतक-याला त्याच्या समोर पाणी दिसते,नदीत पाणी दिसते, विहिरीत पाणी दिसते, पीकही चांगले आलेले दिसते, परंतु चांगल्या आलेल्या पिकाला पाणी देऊ शकत नसल्यामुळे तो आपल्या मुलीचे लग्न करु शकत नाही, कुटुंबाला पोसू शकत नाही त्यामुळे शेतकरी आज आत्महत्या करावयास लागला आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

शेतकऱ्यांची परिस्थिती गंभीर झालेली आहे. हा प्रस्ताव आणण्याचा मूळ उद्देश हाच आहे. मी याठिकाणी आकडेवारी सांगून सभागृहाचा वेळ घेणार नाही.परंतु गेल्या 25 वर्षात इतका पाऊस इ ाला नाही हे मी याठिकाणी नमूद करु इच्छितो. विदर्भ आणि मराठवाड्यात तसेच राज्याच्या इतर जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात 989.08 मी.मी. पाऊस झाला. म्हणजे सरासरी पावसाच्या 149 टक्के इतका जास्त पाऊस झाला. मागील वर्षी 633.17 इतका मी. मी. पाऊस पडला होता. अकोला जिल्ह्यामध्ये 824.4 मी.मी. पाऊस पडला. मागील वर्षी 628.97 मी.मी.पाऊस पडला होता. म्हणजे 113 टक्के जास्त पाऊस झाला. वाशिम जिल्ह्यामध्ये 1121.01 मी.मी.पाऊस पडला, मागील वर्षी 569 मी.मी. पाऊस पडला म्हणजे 121 टक्के जास्त पाऊस झाला. अमरावती जिल्ह्यामध्ये 1076 मी.मी.पाऊस पडला तर मागील वर्षी 629.01 मी.मी. पाऊस पडला म्हणजे 125 टक्के जास्त पाऊस झाला. यवतमाळ जिल्ह्यामध्ये 1102.04 मी.मी.पाऊस पडला, मागील वर्षी 503.05 टक्के पाऊस पडला. वर्धा जिल्ह्यामध्ये 1195 मी.मी.पाऊस पडला, मागील वर्षी 589.06 मी.मी.पाऊस पडला म्हणजे 124 टक्के जास्त पाऊस झाला. नागपूर जिल्हयामध्ये 1186.06 मी.मी पाऊस पडला, मागील वर्षी 891.79 इतका पाऊस झाला म्हणजे 114.1 टक्के इतका जास्त पाऊस पडला. गोंदिया जिल्ह्यामध्ये 1408 मी.मी.पाऊस पडला, मागील वर्षी 966.51 मी.मी.पाऊस पडला म्हणजे 105 टक्के जास्त पाऊस पडला. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये 1556 मी.मी.पाऊस पडला मागील वर्षी 655.30 मी.मी.पाऊस पडला म्हणजे 130 टक्के जास्त पाऊस पडला.गडचिरोली जिल्ह्यामध्ये 1799.8 मी.मी.इतका पाऊस पडला, मागील वर्षी 881.36 मी.मी.पाऊस पडला म्हणजे 127 टक्के जास्त पाऊस पडला. मी या ठिकाणी संपूर्ण राज्यातील जिल्ह्यांची आकडेवारी देऊ इच्छित नाही. परंतु सर्वसाधारणपणे सर्व जिल्ह्यात म्हणजे मराठवाडा, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात अशीच परिस्थिती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, एका दिवसाला 65 मी.मी.पाऊस झाला तर अतिवृष्टी समजण्यात यावी अशाप्रकारचे महसूल विभागाने सन 1983 मध्ये क्र.सीएलएस 8981/24/8361 क्र.820 एमटी दि.31 जानेवारी 1983 असे एक परिपत्रक काढलेले आहे आणि त्या परिपत्रकाच्या आधारावर अतिवृष्टी घोषित करण्यात येते. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये सलग तीन-चार दिवसांमध्ये 65 मी.मी., 60 मी.मी. 61 मी.मी. असा पाऊस झालेला आहे. माझ्याजवळ सर्व आकडेवारी आहे. ही आकडेवारी सांगून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. महसूल विभागाचे बाबा आदमच्या काळातील परिपत्रकानुसार अतिवृष्टी घोषित करण्यात येते. हे परिपत्रक काढून 30 वर्षाहून अधिक कालावधी लोटलेला आहे. आता निसर्गामध्ये बदल होत आहे. पावसाच्या सरासरीमध्ये बदल होत आहे. तेव्हा सरकारने त्यांच्या परिपत्रकामध्ये बदल करावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, विदर्भाचा 12 लाख हेक्टर सिंचनाचा अनुशेष आहे. विदर्भात कोरडवाहू शेती आहे. कोरडवाहू शेतीमध्ये जास्त पाऊस झाला तर पीक येऊ शकत नाही. या अवकाळी पावसामुळे विदर्भातील कापूस,सोयाबीन, भात इत्यादी पिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी पत्रकारपरिषदेत सांगितले की, भाताच्या पेंढ्यावर पाणी पडल्यामुळे त्या सडून गेल्या आहेत.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .

जी स्थिती कोकणात होती तीच स्थिती विदर्भामध्ये होती. ठाणे जिल्हयात जी स्थिती होती तीच स्थिती भंडारा व गोदिंया या जिल्हयामध्ये होती. त्या भागात भाताची कापणी केली आणि बांधावयास सुरुवात केली त्याच वेळी धो धो पाऊस आला आणि जागेवरच कापलेल्या धानाला कोंब फुटावयास लागले अशी स्थिती अनेक भागात निर्माण झाली होती. कापसाचीसुध्दा तीच स्थिती आहे. सुरुवातीला जुलै ऑगस्ट महिन्यात चांगला पाऊस पडला होता त्यामुळे सुरुवातीला असे वाटावयास लागले की,या वर्षी चांगला पाऊस पडत आहे त्यामुळे शेतक-यांचे कल्याण होईल . पाच ते दहा क्विंटल कापूस येईल परंतु त्यानंतर पावसाचे प्रमाण वाढले आणि एखाद्या व्यक्तीने जास्त खाल्ले की अजीर्ण होते त्याप्रमाणे अती पावसामुळे शेतीचे नुकसान झाले. कापसाच्या शेतात पाने राहिली नाही, कापसाचे बोंड राहिले नाही,पाती राहिली नाही फक्त काडीच राहिली अशा प्रकारची स्थिती कापसाच्या पिकाची झाली आहे असे आपल्याला रस्त्याने जातांना पहावयास मिळेल. 5 क्विंटल कापूस होईल अशी शेतक-यांना अपेक्षा होती परंतु ती अपेक्षा पूर्ण होऊ शकली नाही.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, काही ठिकाणी एक ते दीड क्विंटल कापसाचे पीक आलेले आहे. परंतु त्याच्या उत्पादनासाठी शेतक-याला मोठया प्रमाणावर खर्च आला आहे. एखाद्या शेतक-याने जर जहर खावयाचे म्हटले तर ते विकत आणण्यासाठी देखील त्याच्याकडे पैसे नाहीत.फवारणी करण्यासाठी 2500 रुपये लिटर या भावाने एल्ड्रीन त्या शेतक-याला आणावे लागते. त्यामुळे उत्पादन खर्च मोठया प्रमाणावर वाढला आहे. या वर्षी कापूस खरेदी करण्याची कापूस पणन महासंघाची ताकद नाही परंतु कापूस खरेदी करण्याचे नाटक केले पणन महासंघाने आतापर्यंत किती कापूस खरेदी केला आहे या बाबतीत माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आम्हाला सांगावे. कापूस पणन संघाचा भाव तीन हजार रुपये क्विंटल एवढा आहे.त्यामुळे शेतक-याने एक बोंडसुध्दा खरेदी केन्द्रात आणले नाही. सभापती महोदय, मी काल मार्केटमध्ये फोन केला होता त्यावेळी मला असे सांगण्यात आले की बारीक वाणाच्या कापसाला मार्केटमध्ये व्यापारी 4600 रुपये प्रती क्विंटल भाव देत आहेत. एवढा भाव या शेतक-यांना त्याच्या आयुष्यात कधीही मिळाला नाही.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, माननीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री शरद पवार यांचा मी नेहमीच आदर करतो. कापूस निर्यात करण्याची परवानगी 15 डिसेंबरपर्यंत देण्यात आली असून ती मुदत वाढवून देण्यात यावी अशी मी त्यांना विनंती केली आहे. कापूस पणन महासंघ जरी शेतक-याच्या कापसाला जास्त भाव देऊ शकत नसले तरी आज व्यापारी 4600 रुपये भाव देत आहेत. 15 डिसेंबर ही तारीख आता जवळ आलेली आहे.सभापती महोदय, सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, या तारखेपर्यंत कापसाच्या गाठी निर्यात करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.या तारखेपर्यंत 65 लाख गाठी कापूस निर्यात करावयाचा होता परंतु आतापर्यंत फक्त 30 ते 35 लाख गाठी परदेशात गेल्या आहेत. 15 डिसेबर पर्यंत हा कापूस निर्यात करावयाचा आहे परंतु तोपर्यंत हे टारगेट पूर्ण होणार नाही. आता जो काही कापूस व्यापा-यांनी खरेदी करुन ठेवलेला आहे तो कापूस जरी निर्यात करावयाचा म्हटले तरी तो कापूस निर्यात करण्याची त्यांना संधी मिळणार नाही कारण या भागातून जहाजापर्यंत कापूस न्यावयाचा म्हटले तर त्याला सात ते आठ दिवस लागतील म्हणून कापूस निर्यात करण्याची मुदत वाढवून देण्यात यावी अशी आपण माननीय केन्द्रीय कृषी मंत्र्यांना विनंती करावी. मध्यंतरी केन्द्रीय कृषी मंत्री माननीय श्री शरद पवार यांनी असे निवेदन केले होते की," राज्यातील शेतक-याच्या कापसाचे भाव पडू दिलें जाणार नाहीत " कापूस निर्यात करण्याची मुदत संपली की व्यापारी शेतक-यांकडून तीन हजार रुपयापेक्षा कमी भावाने कापूस खरेदी करतील . दुष्काळात सापडलेल्या शेतक-याला सर्व प्रकारची मदत करावयाची असेल , विदर्भातील कापूस उत्पादक शेतक-याला मदत करावयाची असेल तर वर्धा, यवतमाळ जिल्हयातील एक क्विंटल, दीड क्विंटल उत्पादन केलेला कापूस बांगला देशात निर्यात करण्यासाठी, त्या कापूस उत्पादक शेतक-याला जास्त भाव देण्यासाठी व त्याला सावरण्यासाठी कापूस निर्यात करण्याची मुदत वाढवून देण्यात यावी अशी विनंती आम्ही केन्द्रीय कृषी मंत्री श्री शरद पवार यांना केली आहे त्याप्रमाणे आपणसुध्दा त्यांना विनंती केली तर अधिक बरे होईल. कापसाचे भाव पडू द्यावयाचे नसतील तर कापसाच्या निर्यातीवर बंदी करु नका. जानेवारीपर्यंत निर्यातीची मुदत वाढवून देण्यात आली पाहिजे.आताच कापूस खरेदी करण्यास सुरुवात

झालेली आहे कापूस निर्यात करण्याची मुदत वाढवून देण्यात आली तर या शेतक-यांना न्याय मिळणार आहे .सभापती महोदय, अतिवृष्टीमुळे शेत जमीन खरडून गेली आहे.

(**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**) नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

अनेक ठिकाणी जमीन खरडून गेल्यानंतर दोन-दोन महिन्यांनी सुध्दा जिल्हाधिकाऱ्यांनी त्याठिकाणी जाऊन पहाणी केली नाही, तहसीलदारांनी जाऊन पहाणी केली नाही. त्यांना विचारले असता, आम्हाला वरुन आदेश नाहीत असे सांगण्यात आले. शासनाला माहीत होते की, राज्यामध्ये अतिवृष्टी सुरु आहे, नद्यांना पूर येत आहे, शेतकऱ्याची जमीन वाहून चालली आहे, पिके वाहून चालली आहेत. परंतु जिल्हाधिकारी झोपले, तहसिलदार झोपले, एस.डी.ओ. झोपले, शासनाचे महसूल खाते झोपले व सरकारही झोपले होते. त्यावेळी शासनाच्या महसूल व पुनर्वसन विभागाने याकडे लक्ष दिले नाही. माननीय श्री. अजितदादा पवार साहेब आपण आल्यानंतर आपणास पंचनाम्यांचे आदेश द्यावे लागले. तोपर्यंत हे शासन काय करीत होते? या राज्यातील सरकार हे शेतकऱ्यांचे आहे असे आपण सांगत असता. परंतु ज्यावेळी शेतकरी संकटात सापडला होता त्यावेळी हे सरकार मुंबईतील घोटाळयामध्ये अडकले होते. ज्यावेळी पावसाने सरासरी ओलांडली व त्यामुळे राज्यामध्ये महापूर आले ज्यावेळी शेतकऱ्याची संपूर्ण जमीन खरडून गेली त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी भेट देऊन तात्काळ त्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करावयास पाहिजे होते, परंतु ते झाले नाहीत आणि आता परवाच्या दिवशी पंचनाम्यांचे आदेश दिले गेले. एका बाजूला शेतामधील पीक वाहून गेले आणि दुसऱ्या बाजूला रब्बीची मशागत उद्ध्वस्त झाली. अशा परिस्थितीत रब्बीची पेरणी कशी करावी या चिंतेमध्ये शेतकरी सापडला आहे आणि तिसऱ्या बाजूला पूरामध्ये शेतकऱ्याची जनावरे वाहून गेली.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या जनावरांच्या नुकसान भरपाईचे निकष शासनाने बदलले पाहिजेत. मी मागील अधिवेशनामध्ये सांगितले होते की, आज कोंबडीच्या मटनाचा किलोचा दर 125 रुपयांवर असतांना त्याच्या कोंबडीचे नुकसान झाले तर त्याला 2 रुपयांची मदत दिली जाते, त्याची बकरी वाहून गेलीतर त्याला 10 रुपये नुकसान भरपाई दिली जाते. आज बाजारात बकरीचा भाव काय आहे, मदत देण्याचे हे कोणते शास्त्र आहे, तेव्हा मदत देण्याचे हे निकष आपण केव्हातरी बदलणार आहात की नाहीत? शेतकऱ्यांकडील जनावरांना कृषीधन म्हटले जाते त्याच्या भरंवशावर महाराष्ट्राची शेती अवलंबून आहे. ते जर नैसर्गिक आपत्तीमुळे उद्ध्वस्त व्हावयास लागले आणि त्यांना जर आपण मदत देऊ शकला नाही तर हे सरकार कुणासाठी चालविले जात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर ....

आहे? हे सरकार बिल्डरांसाठी चालविले जात नाही, हे सरकार भूखंडवाल्यांसाठी चालविले जात नाही, हे सरकार उद्योगपतींसाठी चालविले जात नाही. या राज्यातील 10 कोटी जनता सरकारकडे या अपेक्षेने पहात असते, परंतु त्यांचा अपेक्षाभंग होतो त्यावेळी मग यवतमाळला 50 हजार शेतकरी एकत्र येऊन माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना सांगतात की, आम्हाला जोपर्यंत मदत मिळत नाही तोपर्यंत आम्ही परत जाणार नाही. काय झाले असेल ते झाले, परंतु अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे आठ दिवसामध्ये करुन शेतकऱ्यांना ताबडतोब मदत देण्याबाबत आपण उत्तराच्या भाषणामध्ये सांगितले पाहिजे. आपण आम्हाला सांगितले की, आपण चर्चा सुरु करा आम्ही घोषणा करतो. त्याप्रमाणे आम्ही आता चर्चा सुरु केली आहे. परंतु पहिल्या आठवडयात निश्चितपणे शेतकऱ्याला काहीतरी मिळेल अशाप्रकारच्या घोषणेची आपणाकडून अपेक्षा बाळगतो. झालेल्या नुकसानीचा प्राथमिक अंदाज आपण घेतला आहे. त्या अंदाजानुसार आपण धोरणात्मक घोषणा करा. ज्या शेतकऱ्याचे नुकसान झाले असेल त्याला हेक्टरी ताबडतोब मदत देण्यात येईल असे आपण जाहीर करा. अतिवृष्टीमुळे ज्या शेतकऱ्याची जमीन उद्ध्वस्त झाली आहे, जमीन खरडून गेली आहे त्याबद्दल पीक विम्याचे पैसे काही शेतकऱ्यांना मिळाले तर काही शेतकऱ्यांना तीन-तीन वर्षे मिळाले नाहीत. 20 शेतकऱ्यांपैकी 5 शेतकऱ्यांना पैसे मिळाले तर 15 शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाहीत. अशाप्रकारे पीक विमा योजनेमध्ये सुध्दा दलाल घुसले आहेत. त्यामुळे या पीक विमा योजनेची सुध्दा चौकशी झाली पाहिजे. शेतकऱ्यांच्या टाळूवरील लोणी खाणारे अनेक दलाल पीक विमा योजनेच्या माध्यमातून घुसले आहेत त्यांची आपण चौकशी केली पाहिजे. कापसावर लाल्या रोग पडल्यामुळे कापसाचे पीक नष्ट झाले त्याचेसुध्दा पीक विमा योजनेचे पैसे मिळाले नाहीत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

परंतु यावेळेला असे होणार नाही याची तुम्ही सदनामध्ये आम्हाला ग्वाही द्यावी. विजेच्या बाबतीत सांगावयाचे तर शेतकऱ्यांची तोडण्यात आलेली विजेची कनेक्शन जोडण्यात यावी. जर विजेची दरवाढ झाली तर या शेतकऱ्यांचे काय होईल याचाही विचार केला पाहिजे. एकदा असे तरी ठरविण्यात यावे की, आम्ही या राज्यातील शेतकऱ्यांना वीज देणारच नाही. या राज्यामध्ये अशी स्थिती निर्माण झाली आहे की, एका बाजूला विजेची दरवाढ झाली आहे आणि दुसऱ्या बाजूला विजेची बिले थकली म्हणून शेतकऱ्यांची कनेक्शन्स् तोडण्यात आली आहेत. परंतु त्याचबरोबर नवीन वीज कनेक्शनच्या बाबतीत देखील घोषणा केली आहे.मात्र त्यासाठी शेतकऱ्याला एवढे खेटे घालावे लागतात. याबाबत मी उदाहरणे देण्यास तयार आहे.हे शेतकरी एक वर्षापासून विजेची मागणी करीत आहेत, पैसे भरावयास तयार आहेत मात्र विद्युत मंडळ त्यांना सहा-सहा महिने ॲडव्हाईज देण्यास तयार नाही अशी आमच्या विदर्भातील स्थिती आहे.म्हणून मी शासनाला विनंती करणार आहे की,संकटामध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांच्या बाबतीत काही विचार करण्याची गरज आहे. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, विदर्भामध्ये असे सहा जिल्हे आहेत की, ज्यांना माननीय पंतप्रधान यांनी सर्टीफाईड केलेले आहे, ज्यांच्यासाठी पॅकेज दिलेले आहे पण ते पॅकेज शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेच नाही. त्यामुळे या सहा जिल्हयांमध्ये पुन्हा आत्महत्येचे सत्र सुरु होण्याची शक्यता आहे आणि ही संख्या वाढणार आहे. याठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे पीक मोठया प्रमाणात येणार आहे. त्यामुळे या भागातील महिलांच्या कपाळावरील कुंकू पुसले जाणार आहे आणि त्या दुर्लक्षित होणार आहेत आणि शासनाला राज्यामध्ये अशा प्रकारचे चित्र निर्माण होऊ द्यावयाचे आहे काय असा माझा सवाल आहे. त्यामुळे याबाबतीत शासनाने निश्चितपणे धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. एका बाजूला विजेचे दर मोठया प्रमाणात वाढत आहेत, या देशामध्ये सर्व दरांमध्ये वाढ होत आहे पण शेतकऱ्यांच्या मजुरीमध्ये वाढ होत नाही. एकीकडे विजेचे दर वाढले आणि दुसरीकडे आपण बियाणे, खत कारखानदारांच्या डोक्यावर मदतीचा हात ठेवला. त्यामुळे आता बियाणे कारखानदारांचे कल्याणच कल्याण आहे. बियाणे तयार करणाऱ्या कंपन्या कशा प्रकारचे बियाणे तयार करतात ते पहावे.या कंपन्या शेतकऱ्यांना डुबवावयास निघालेल्या आहेत. कारण बियाणे प्रचंड दराने विकले जाते,पण शेतकऱ्यांच्या मालाचे भाव वाढत नाहीत.त्यामुळे उत्पन्न आणि खर्च याचा मेळ बसत नाही.

.. . .2 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

आज शेतकऱ्यांसमोर अनेक अडचणी आहेत.एकीकडे विजेची अडचण आहे,पुरेसे खत मिळत नाही. खताच्या बाबतीत अशी स्थिती झाली की, जेव्हा पेरण्या झाल्या तेव्हा राज्यातील प्रत्येक गावामध्ये लाठीचार्ज झाला होता, बंद पुकारण्यात आला होता, अधिकाऱ्यांना मारहाण करण्यात आली होती, दुकानदारांना देखील मारहाण झाली होती. तसेच अशाही बातम्या येत होत्या की,डीएपी-युरिया खत मिळत नाही. अशा वेळी शासनाने काय केले ? या राज्यासाठी खताचा जेवढा कोटा मिळणे आवश्यक आहे, तो मिळविण्याच्या बाबतीत शासन असमर्थ का झाले हे मला कळत नाही. आजही जर शेतकऱ्यांनी रब्बीचे पीक घ्यावयाचे ठरविले तर त्यांना खत मिळत नाही, वीज मिळत नाही,बियाणे मिळत नाही. मग शासन शेतकऱ्यांना काय देणार आहे? असे प्रकार सुरु राहिले तर मग शेतकरी आत्महत्या केल्याशिवाय रहाणार नाहीत हे मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, आता विदर्भावर एक नवीन संकट आलेले आहे. याठिकाणी कधी नव्हे ते घडले आहे, म्हणजे वीज अंगावर पडून लोक मरण पावली आहेत. आम्ही या अनुषंगाने माहिती घेतली, त्यानुसार जर एखादी व्यक्ती दंग्यामध्ये मृत्यू पावली तर त्याच्या नातेवाईकांना 2 लाख रुपये दिले जातात. एखादी दंगल झाल्यानंतर पोलिसांनी केलेल्या गोळीबारामध्ये जर व्यक्ती ठार झाली तर त्यांना देखील आर्थिक मदत केली जाते. परंतु या भागातील शेतकरी शेतामध्ये सवंगणी करीत असताना, पाऊस सुरु झाला आणि त्याच्या अंगावर वीज पडून तो मृत्यू पावला तर त्याच्या कुटुंबियांना एक छदाम देखील मिळत नाही. त्यामुळे याबाबतीत शासनाने काहीतरी धोरण ठरवावे अशी माझी विनंती आहे. वीज कोसळून शेतकऱ्याचा झालेला मृत्यू हा एक नैसर्गिक आपत्तीचा भाग ठरविण्यात यावा आणि अशा वेळी त्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांना मदत जाहीर करावयास पाहिजे. ज्या प्रमाणे इतर आपत्तीच्या वेळी मदत केली जाते, त्याप्रमाणे या शेतकऱ्यांना देखील मदत दिली पाहिजे.

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

श्री. पांडुरंग फुंडकर .....

विदर्भात 40 माणसे वीज पडून मृत्युमुखी पडली. पण एकाही वीज कोसळून मृत्युमुखी झालेल्या माणसाच्या कुटुंबियांना मदत मिळाली नाही. म्हणून यासंबंधीचे धोरण बदलण्यात यावे. नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत देण्यात येते. विजेचा शॉक लागला तरी त्या माणसाला काही ना काही मदत देण्यात येते. पण एखाद्या माणसाच्या अंगावर वीज कोसळून त्याचा मृत्यू झाला तर त्याला कुठल्याही प्रकारची मदत देण्यात येत नाही. म्हणून वीज कोसळून मृत्यू पावलेल्या अथवा जखमी झालेल्या माणसाला मदत मिळाली पाहिजे. सभापती महोदय, या संदर्भात कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यात यावी अशी माझी सूचना आहे. सर्पदंश झालेल्या व्यक्तीला मदत देण्यात येते पण वीज पडलेल्या व्यक्तीला कुठलीही मदत देण्यात येत नाही. त्यामुळे या संदर्भात कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यात यावी अशा प्रकारची मागणी करुन दोन मिनिटात मी माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, जनावरे गेली, माणसे गेली, जमीन खरडली गेली, पीक उद्ध्वस्त झाले, विजेचे कनेक्शन्स कापले गेले यातून शासनाला काय मिळाले? सभापती महोदय, शासनाने आता शेतकऱ्यांचा आणखी अंत पाहू नये. माननीय मंत्री महोदय, या ठिकाणी काय उत्तर देणार आहेत हे मला माहीत आहे. आणखी चार वर्षे कोणीही आमचे काहीही वाकडे करु शकत नाही असे काही लोक बोलतात. आम्हाला लोकांनी राज्यावर बसविले आहे. कितीही आत्महत्या झाल्या, कितीही शेतकरी मृत्युमुखी पडले आणि कितीही महागाई वाढली तरी शेवटी लोक आम्हालाच मत देतात. सभापती महोदय, आता विधानपरिषदेच्या ज्या निवडणुका झाल्या त्यातून लोक कसे मत देतात हे लक्षात आलेले आहे. (अडथळा) सभापती महोदय, आता चार वर्षे आमचे कोणी वाकडे करु शकणार नाही. आम्हाला मतदारांनी या ठिकाणी बसविलेले आहे. आमचे कोणी वाकडे करु शकणार नाही, या भावनेतून शासनकर्त्यांनी या ठिकाणी बसू नये तर कर्तव्याच्या भावनेतून बसावे. माननीय राज्यपाल महोदयांसमोर आपण शपथ घेतलेली आहे. तेव्हा आपण कर्तव्याच्या भावनेतून काम करावे. कर्तव्याच्या भावनेतून काम केले तरच या शासनाला दुवा मिळेल. तरच या शासनाला शेतकऱ्यांचे आशीर्वाद मिळणार आहेत. मनी पॉवर आणि मसल्स पॉवरच्या भरवशावर फार काळ राज्य करता येणार नाही. सभापती महोदय, शेतकरी भोळा आहे. त्याला भोळा शंकर असे म्हटले जाते. भोळया शंकराला जसा तिसरा डोळा होता तसा या भोळया शंकराने आपला तिसरा डोळा उघडला तर मग मनी पॉवर, मसल्स पॉवर हे कुठेच शिल्लक राहणार नाही याची जाणीव ठेवण्यात

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर....

यावी. आता आम्ही चर्चेला सुरुवात केलेली आहे. या राज्यातील शेतकऱ्यांची स्थिती शासनासमोर मांडलेली आहे. या राज्यातील पिकांची स्थिती शासनासमोर मांडलेली आहे. सरासरी पिकांपैकी दोन टक्के पीक सुध्दा येणार नाही. विजेची स्थिती, महापूराची स्थिती,जमीन खरडून गेलेल्या शेतकऱ्यांची स्थिती या शासनासमोर मांडलेली आहे. आता शासनाकडून करावयाच्या घोषणेची अपेक्षा आहे. चर्चा सुरु झालेली आहे. तेव्हा सरकार काय घोषणा करणार आहे, याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागलेले आहे. म्हणून मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करणार आहे की, आपण उत्तर देताना इतर वेळेला विधानसभेमध्ये आणि विधानपरिषदेमध्ये चर्चा होते आणि त्या चर्चेचे उत्तर ज्या पध्दतीने दिले जाते त्याच पध्दतीचे उत्तर आता देऊ नये. कुठेतरी हा पायंडा बदलला पाहिजे. उत्तर देऊन वेळ मारुन नेणे असे आपण करु नये. आपण जे उत्तर द्याल ते प्रत्यक्षात उतरले पाहिजे. शेतकरी तीन वर्षापासून मदत मिळण्यासाठी रखडला आहे असे होता कामा नये. जेव्हाचे काम तेव्हाच झाले पाहिजे. घोषणा झाल्यानंतर एका महिन्याच्या आत शेतकऱ्यांच्या पदरात मदत मिळाली पाहिजे. या पध्दतीने या चर्चेला कायान्वित करुन या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यात यावा अशा प्रकारची आग्रहाची मागणी मी या ठिकाणी करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यामध्ये अवकाळी पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. आपण पाहिले तर राज्यामध्ये जो अवकाळी पाऊस झाला त्यामुळे संपूर्ण राज्यात अत्यंत हवालदिल परिस्थिती निर्माण झालेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विदर्भातील अनेक मुद्दे मांडले तसेच इतर सन्माननीय सदस्य वेगवेगळ्या भागातील मुद्दे मांडतील. परंतु या अवकाळी पावसामुळे सर्वात जास्त नुकसान झालेले जे जिल्हे आहेत त्यामध्ये उत्तर महाराष्ट्रातील नाशिक जिल्हा आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर निर्यात होणारी द्राक्षे, कांदा, टोमॅटो, डाळींब अशा पिकांचे हजारो हेक्टर क्षेत्रामध्ये नुकसान झालेले आहे. अनेक वेळा पाऊस जास्त झाला असेल किंवा पाऊस कमी झाला असेल पण या अवकाळी पावसामुळे सर्वात महत्वाची घटना जर कोणती घडली असेल तर ती म्हणजे नाशिक जिल्ह्यामध्ये अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु झालेल्या आहेत. त्याकडे मी शासनाचे गंभीरपणे लक्ष वेधू इच्छितो. जवळपास सहा सात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. लाखो शेतकरी हवालदिल परिस्थितीमध्ये आहेत. सगळ्या बागा उखडून गेलेल्या आहेत. पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. ज्या काही बागा शिल्लक आहेत किंवा जी काही पिके शिल्लक आहेत ती वाचविण्यासाठी जी फवारणी करावी लागते त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च तीन पटीने वाढलेला आहे. या सर्व गोष्टींची गांभीर्याने दखल घेण्याची शासनाची जबाबदारी आहे. आमच्याकडे चेहडीला महानगरपालिकेच्या चुकीमुळे बंधारा फुटला. त्यामुळे शेतकऱ्यांची शेतजमीन वाहून गेली. त्यामुळे नाशिक जिल्ह्यामध्ये गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. मला खात्री आहे की, माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण आणि माननीय मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखालील हे सरकार अत्यंत संवेदनशील आहे. त्यामुळे राज्यासमोर जे प्रश्न येतील त्याबाबतीत हे सरकार निश्चितपणे पुढे जाईल याबद्दल शंका नाही. आपण या अवकाळी पावसाचा विचार करीत असताना केवळ किरकोळ स्वरुपाची नुकसानभरपाई देऊन त्या शेतकऱ्यांना पुन्हा उभे करणे अत्यंत अवघड होणार आहे. याची नोंद शासनाने घ्यावी अशी मी विनंती करतो. आपण शेतकऱ्यांना मदत करताना तो पुन्हा कसा उभा राहील हे शासनाने पाहिले पाहिजे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड .....

सभापती महोदय, काही इतर पिकांचे नुकसान झालेले आहे. नुकसान झालेले पीक मार्केटमध्ये आल्यानंतर त्याला भाव मिळत नाही. पिकांचे नुकसान झाल्यामुळे शहरामध्ये पीक येत नाही आणि त्यामुळे शहरामध्ये व्यापारी मोठ्या प्रमाणावर भाव वाढवितात. त्यामुळे माल पिकविणारा आणि घेणारा दोघेही नाडले गेले आहेत अशी परिस्थिती आहे. माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, विजेचे प्रश्न असतील, शेतकऱ्यांच्या द्यावयाच्या मदतीचे प्रश्न असतील त्याबाबतीत शेतकऱ्यांना पुन्हा सन्मानाने उभे करुन आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त करण्याकरिता सरकारने ठोस उपाययोजना केली पाहिजे आणि त्यांना जास्तीत जास्त मदत उपलब्ध करुन दिली पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, राज्यामध्ये अवेळी पडलेल्या पावसामुळे 13 लाख हेक्टर शेतजमिनीवरील पिके उद्ध्वस्त झालेली आहेत. यासंदर्भात मी नियम 289 अन्वये सूचना दिलेली होती त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी पहिल्यांदा एक बाब माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, मघाशी आपण सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी बसून जे वक्तव्य केले त्याला उत्तर दिले की, वेळ प्रसंगी आपल्या बँकेतून मी शेतकऱ्यांना पैसे आणून देईन. त्याबद्दल मी आपला आभारी आहे. परंतु एक गोष्ट मला आपल्याला सांगावयास पाहिजे की, आपण जे पॅकेज द्याल ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणार आहे काय ? तसेच मृत झालेल्या शेतकऱ्यांच्या टाळूवरील लोणी खाण्याचे काम मंत्री आणि त्यांचे नातेवाईक करणार असतील तर त्यांच्या बाबतीत आपण नेमके काय करणार आहात ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

याठिकाणी माननीय मुख्यमंत्री असते तर मी त्यांना विचारले असते. त्यांनी सुरुवातीलाच सांगितले होते की, दागी मंत्र्यांना माझ्या मंत्रिमंडळामध्ये स्थान असणार नाही. आज मी एक नोटीस दिली होती. दुर्दैवाने माझी नोटीस नाकारली गेली. मला बोलण्याची परवानगी दिली नाही. त्यामुळे आज मी त्या मंत्र्यांचे नाव घेणार नाही. परंतु माहितीच्या अधिकाराखाली मी माहिती मागितलेली आहे. केंद्र सरकारने आत्महत्याग्रस्त जिल्हयासाठी जे पॅकेज जाहीर केले होते त्या पॅकेज अंतर्गत शेतक-यांना गायींचे वाटप करण्यात आले होते. त्यातील गायींचे वाटप कोणाकोणाला करण्यात आले, कोणी कोणी गायी घेतल्या त्याबाबतची माझ्याजवळ शासकीय माहिती आहे. ती माहिती मी मुद्दाम आपल्याकडे पाठविणार आहे. कोणत्या खासदारांनी, कोणत्या मंत्र्यांची मुले आहेत, कोणाची सून आहे, कोण जिल्हा परिषद सदस्य आहेत, कोणत्या आमदारांनी या गायी घेतल्या आहेत त्या सगळयांची नावे यामध्ये आहेत. मेलेल्या शेतक-यांच्या डोक्यावरील लोणी खाण्याचे काम काँग्रेसचे पुढारी करीत आहेत याची ही उदाहरणे आहेत. शासन शेतक-यांना मदत करण्यासाठी पैसे देते परंतु तो पैसा खाण्याचे काम काँग्रेसचे पुढारी करीत आहेत. माझ्याकडे असलेल्या यादीतील मंत्र्यांचे मी नाव घेणार नाही. कारण नाव घेण्यापूर्वी त्याबाबतची नोटीस द्यावी लागते, हा नियम मला माहीत आहे. परंतु मी पुन्हा उद्या नोटीस देणार आहे. ती नोटीस त्या नियमामध्ये कशी बसू शकते यासाठी मी पुन्हा प्रयत्न करणार आहे. माझ्याकडे राज्यमंत्र्यांच्या कुटुंबियांची नावे आहेत. श्रीमती सविता उत्तम देशमुख, वैशाली संजय देशमुख, पंकजा देशमुख श्रीमती अंजली संजय देशमुख, राज्यमंत्र्यांच्या पत्नीचे हे नाव आहे. अशाप्रकारे एका मंत्र्यांच्या कुटुंबियांना 8 गायींचे वाटप झालेले आहे. श्रीमती सुभद्राबाई उत्तमराव पाटील, माजी खासदार यांना 5 गायी दिलेल्या आहेत, हे सर्वजण आपल्या जवळचे लोक आहेत. श्री.प्रकाश चंद्रशेखर कासावार, या आमदारांच्या कुटुंबियांना 8 गायी दिलेल्या आहेत. राज्याच्या मंत्रिमंडळातील एक मंत्री श्री.मोघे यांच्या कुटुंबियांना 8 गायी दिलेल्या आहेत. ही सर्व नावे आपल्याकडे पाठवित आहेत. एका बाजूला शासन शेतक-यांचे तारणहार आहे असे सांगण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु दुस-या बाजूला ही वस्तुस्थिती आहे. या मंत्र्यांविरुध्द, आमदाराविरुध्द शासन काय कारवाई करणार आहे, त्याचे चित्र स्पष्ट होणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणजे शासनाची नेमकी भूमिका काय आहे ते स्पष्ट होईल.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामदास कदम....)

या यादीमध्ये मंत्र्यांची, आमदारांची तसेच खासदारांचीही नावे आहेत. जिल्हा परिषदेच्या सदस्यांची नावे देखील आहेत. ही सर्व काँग्रेसची मंडळी आहेत. काँग्रेसची मंडळी शेतक-यांसाठी दिलेले पैसे कशा पध्दतीने खातात त्याचे मी पुराव्यासहीत उदाहरण दिलेले आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये थोडा व्यत्यय आणून सांगू इच्छितो की, या ठिकाणी राज्यात झालेल्या अतिवृष्टी आणि अवकाळी पावसाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी चर्चेला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी आता कोणती माहिती द्यायला सुरुवात केली आहे हे कळत नाही. चुकीच्या पध्दतीने वाटप झाले असेल, अनियमितता झाली असेल, गैरप्रकार घडला असेल तर त्या बाबतीत योग्य ती कारवाई होईल.परंतु अमुक व्यक्तीने गाय घेतली तमुक व्यक्तीने गाय घेतली असे सांगून लोकांमध्ये गैरसमज पसरविण्याचे प्रकार बंद करावेत, हे मला सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना सांगावयाचे आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, गायी वाटप योजना ही दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी राबविलेली होती. ही योजना मंत्र्यांसाठी नाही, आमदारांसाठी नाही. या योजनेखाली काँग्रेसमधील मंत्र्यांनी आणि आमदारांनी गायी घेतलेल्या आहेत. मी माहितीच्या अधिकाराचा वापर करुन शासनाकडून ही माहिती घेऊन या ठिकाणी सादर केलेली आहे. असे असताना गायी वाटपामध्ये जो काही गैरप्रकार घडलेला आहे त्याचे सन्माननीय सदस्य एक प्रकारे समर्थनच करीत आहेत. त्यामुळे खरे तर पहिल्यांदा सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचा राजीनामा घेतला पाहिजे. ते या अनियमिततेला साथ देत आहेत. सभापती महोदय, गायी वाटपामध्ये फार मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. या काँग्रेसच्या लोकांनी गरिबांच्या तोंडचा घास काढून घेतलेला आहे. तेव्हा या गायी वाटपामध्ये, पॅकेज वाटपामध्ये ज्यानी भ्रष्टाचार केलेला आहे त्यांचे पहिल्यांदा राजीनामे घ्यावेत अशी माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांकडे मागणी आहे. काँग्रेस मधील मंत्री आणि खासदार हे दारिद्र्य रेषेखाली येतात काय ? मी विरोधी पक्षनेता असताना पॅकेजच्या संदर्भात बैलगाड्या, सतरंज्या, पाईप इत्यादी ज्या ज्या वस्तूंचे वाटप झाले ते किती निकृष्ट दर्जाचे होते आणि त्यामध्ये किती भ्रष्टाचार झालेला होता, हे मी सांगितलेले होते.शेतक-यांसाठी पॅकेज जाहीर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामदास कदम...

केले.परंतु ते शेतक-यांपर्यन्त पोहोचलेले नाही. काँग्रेसमधील मंडळींनी स्वत:च त्याचा फायदा घेतला. हे प्रकार बंद झाले पाहिजेत. गरिबांसाठी जाहीर केलेल्या पॅकेजची योग्य प्रकारे अंमलबजावणी शासनाने केली नाही. ज्या ठेकेदाराकडे गायी वाटपाचे काम दिले गेले त्या ठेकेदाराच्या घरामध्येही गायीचे वाटप झालेले आहे. या पॅकेजच्या संदर्भात कशा प्रकारे भ्रष्टाचार झालेला आहे याचे ज्वलंत उदाहरण मी दिलेले आहे.

सभापती महोदय, फयान वादळामुळे 70 हजार हेक्टर वरील पिकाचे नुकसान झाले. त्यावेळी शेतक-यांना 30 हजार कोटीची मदत केली. आताच्या नैसर्गिक आपत्तीमध्ये माझ्या माहितीप्रमाणे 15 लाख हेक्टरवरील पिकाचे नुकसान झालेले आहे. म्हणून फळबाग पिकाच्या झालेल्या नुकसानीसाठी हेक्टरी 50 हजार आणि शेतीपिकाच्या झालेल्या नुकसानीसाठी हेक्टरी 25 हजार मदत केली तरच शेतकरी आपल्या पायावर उभा राहील. सभापती महोदय, चर्चेला वेळेचे बंधन आहे याची मला कल्पना आहे. सभापती महोदय, या निमित्ताने मला आपल्याला विनंती करावयाची आहे. एका बाजूला शेतक-यांच्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत आहेत आणि दुस-या बाजूला शासन सभागृहामध्ये घोषणा करुन सभागृहाला आश्वासित करीत आहे. माझ्याकडे अर्थतज्ज्ञ श्री. नरेंद्र जाधव यांनी शासनास दिलेल्या अहवालाची प्रत आहे.

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

डॉ.नरेंद्र जाधव समितीचा अहवाल शासनाने 100 टक्के स्वीकारला आणि सभागृहामध्ये तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की, पुढील सहा महिन्यात अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करण्यात येईल. या अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणीचे काय झाले? हे माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी सभागृहाला सांगावे. परंतु ते सांगू शकणार नाहीत. सभागृहात केवळ घोषणा केल्या जातात. मात्र त्या घोषणांची अंमलबजावणी होत नाही. मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, शासनाने आश्वासन दिल्याप्रमाणे डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या अहवालातील शिफारशींची 100 टक्के अंमलबजावणी झाली असती तर विदर्भामध्ये एकाही शेतकऱ्याला आत्महत्येचा मार्ग पत्करावा लागला नसता. डॉ.नरेंद्र जाधव यांनी ज्या उपाययोजना अहवालाच्या माध्यमातून सुचविल्या त्यांची अंमलबजावणी अद्याप का झाली नाही? सहा महिन्यात अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करणार असे तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते. त्या आश्वासनाचे पुढे काय झाले? बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात. सहा महिन्यात अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करणार होतात. आजतागायत अंमलबजावणी झालेली नाही. या अहवालातील शिफारशींची आपण अंमलबजावणी कधी करणार आहात? शेतकऱ्यांना खते कशी द्यायची, गरीब शेतकऱ्यांना मोफत धान्य किती द्यायचे, मुलांच्या व मुलींच्या लग्नासाठी किती आर्थिक मदत द्यायची याबाबतच्या स्पष्ट शिफारशी अहवालामध्ये नमूद केलेल्या आहेत. शासनाने हा अहवाल स्वीकारला आहे. परंतु अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी केलेली नाही. फक्त घोषणा दिल्या गेल्या. शेतकऱ्यांचे राजे म्हणून निवडून येता. लाल दिव्याच्या गाड्या घेऊन संबंध महाराष्ट्रात फिरता. त्या गाड्यांमध्ये वापरले जाणारे इंधन हे शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशातून खरेदी केले जाते. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना 3000 कोटी रुपयांची मदत दिली जाते. आज राज्यात 20 साखर कारखाने तोट्यात गेले आहेत. अनेक कारखाने बंद पडले आहेत. तरी देखील फक्त साखर कारखानदारीला करोडो रुपयांची आर्थिक मदत दिली गेली. हे कारखाने कोणाचे आहेत? सरकारमधील मंत्र्यांचे आहेत. म्हणून या साखर कारखान्यांना कोट्यवधी रुपयांची मदत दिली गेली. शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रश्न येतो त्यावेळी तीन तीन दिवस सभागृहाचे कामकाज बंद पाडले जाते. शेतकऱ्यांच्या अडचणी काय आहेत याची शासनाला पूर्ण जाणीव आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे झालेले नाहीत का? या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

सभागृहात अनेकदा शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी चर्चा झाली. त्यातून काय निष्पन्न झाले? हे शासन धनदांडग्यांना मदत करते. साखर कारखान्यांना मदत करते. शेतकऱ्यांना मदत करण्यामध्ये कोणत्या अडचणी आहेत? सभागृहात शासनाने घोषणा केली. डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या अहवालाचे काय झाले? विदर्भामध्ये किड्या मुंग्याप्रमाणे माणसे मरत आहेत. गेल्या सहा-सात वर्षापासून शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरु आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविता येत नसतील तर तुम्ही शासन चालविण्यास लायक आहात का? हे सरकार कोणासाठी आहे? तुम्ही कोणासाठी काम करीत आहात?

सभापती महोदय, मला कल्पना आहे की, कृषी पंपाचे 5000 कोटी रुपयांचे वीज बिल थकित आहे. एका बाजूला शासन साखर कारखानदारीला व धनदांडग्यांना मोठया प्रमाणात आर्थिक मदत देत असताना शेतकऱ्यांच्या कृषी पंपाला वीज पुरवठा करण्यासाठी काही निधी देण्यास काय अडचण आहे? वीज जोडणी पूर्ववत करणार नसाल तर आत्महत्येचे सत्र सुरुच राहणार आहे. राज्यकर्ते याठिकाणी कोणासाठी बसले आहेत? कोणत्याही परिस्थितीत 100 टक्के शेती पंपाच्या वीज जोडण्या पूर्ववत झाल्या पाहिजेत.

सभापती महोदय, कोकणामध्ये जवळजवळ 2 लाख हेक्टर जमिनीमधील भाताचे पीक उद्ध्वस्त झाले आहे. नाशिक जिल्हयात मोठया प्रमाणात द्राक्ष पिकाचे नुकसान झाले. फळबागा उद्ध्वस्त झाल्या. कोकणातील भात शेतीचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. कोकणी माणूस भातशेतीवर जगतो. कोकणी माणसाचे शेतीतील ते एकमेव साधन आहे. आज ते पूर्णत: नष्ट झाले आहे. या शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी ठोस अशी मदत शासनाकडून दिली जाईल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो, धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र!

नंतर 2आय.1

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेल्या प्रस्तावावर माझे मत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतरही दरवर्षी कुठले ना कुठले संकट येतच असते. असे एकही वर्ष नाही की शेतकऱ्यावर कोणत्या ना कोणत्या प्रकारे संकट आले नाही. स्वातंत्र्यापूर्वी आसमानी-सुलतानी या दोन संकटांखाली शेतकरी भरडला जायचा. स्वातंत्र्यानंतर नैसर्गिक संकटामुळे राज्यातील शेतकरी प्रत्येक वर्षी हवालदिल झालेला आहे, त्याची ससेहोलपट चालू आहे. परवा जो परतीचा अवकाळी पाऊस आला त्याचा परिणाम असा झाला की, आमच्या बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. संकटात सापडलेला मराठवाड्यातील तसेच राज्यातील शेतकरी शासनाकडे मोठ्या अपेक्षेने पाहत आहे की हे सरकार आपलेच आहे. शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणारे सरकार आहे त्यामुळे आपल्याला या नैसर्गिक आपत्तीतून बाहेर काढल्याशिवाय राहणार नाही. सुरुवातीला या अधिवेशनाचे दोन दिवस गोंधळामुळे वाया गेले....अडथळा.....मला आपल्याकडील पाच शेतकरी दाखवा आणि 5 हजार रुपये माझ्याकडून बक्षीस मिळवा. अशी परिस्थिती असताना देखील आपण शेतकऱ्यांवर बोलता याचे मला आश्चर्य वाटते. आपल्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, पाशा पटेल, माननीय विरोधी पक्षनेते, धनंजय मुंडे हे चारच लोक शेतकरी दिसतात, पाचवा दिसतच नाही म्हणून मी बक्षीस जाहीर केले.

महोदय, या निमित्ताने माझी शासनाला अशी विनंती आहे की, शेतकऱ्यांसाठी शासनाने मुख्यमंत्री निधीसारखा कायमस्वरुपी एक फंड तयार करावा. नैसर्गिक आपत्तीने नुकसान झाले अथवा अन्य संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना या निधीतून मदत करावी अशी अपेक्षा आहे. बीड जिल्ह्यात गतिमान कडधान्य योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना तुरीच्या बियाण्याचे वाटप करण्यात आले. हे तुरीचे पीक जवळपास 8 फुटापर्यंत उंच वाढले परंतु तोपर्यंत एकही शेंग त्या पिकाला लागली नाही. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. दुर्दैवाने हे सर्व बियाणे महाराष्ट्र शासनाच्या अंगिकृत महामंडळाने दिलेले आहे. म्हणून बीड जिल्ह्यातील ज्या ज्या शेतकऱ्यांनी ही तूर पेरली असेल त्यांना हेक्टरी किमान 50 हजाराची मदत शासनाने जाहीर करावी अशी माझी आग्रहाची विनंती आहे. तेव्हा कुठे, तुरीच्या शेंगा आणि बाभळीच्या शेंगा यातला फरक ज्यांना कळत नव्हता त्यापेक्षा हे शासन बरे, असा विश्वास वाटल्याशिवाय राहणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

(अडथळा) सभापती महोदय, या ठिकाणी बसलेल्या सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांच्या समोर तुरीची शेंग आणि बाभळीची शेंग ठेवली तर त्यांना त्यातील फरक सांगता येईल काय ? यासंदर्भात मी आपल्याला एक उदाहरण देऊ इच्छितो की, एक सरकारी अधिकारी निवृत्त झाल्यावर त्याच्या गावी जातो व गावातील शेतकरी त्या निवृत्त अधिका-याला सांगतात की, साहेब तुम्ही किमान 5 एकर शेती घ्या. शेती ही आपली काळी आई आहे, शेती म्हणजे सोने आहे त्यामुळे तुम्ही किमान 5 एकर तरी शेती घ्या. गावक-यांचे सांगणे ती व्यक्ती ऐकते व पाच एकर शेती घेते. शेती घेतल्यानंतर ती व्यक्ती शेतीची मशागत करते, पेरणी करते व काही दिवसानंतर पीक सुध्दा चांगले येते परंतु साहेबाच्या दुर्दैवाने त्यावर्षी अतिवृष्टी होते व सर्व पीक वाया जाते. त्यानंतर पारावर बैठक भरते शेत विकत घेतलेली व्यक्ती गावातील शेतक-यांना म्हणते की, तुम्ही मला शेत घ्यावयास लावले त्यानुसार मी शेत घेतले, मशागत केली, पेरणी केली, पीक सुध्दा चांगले आहे परंतु अतिवृष्टीमुळे सर्व पीक वाया गेले. त्यावेळी गावातील शेतकरी त्याला सांगतात तुम्ही घाबरु नका, जमीन ही काळया आईचे देणं आहे, यावर्षी पीक आले नसले तरी पुढील वर्षी चांगले पीक येईल. त्यानुसार त्या व्यक्तीने डीसीसी बँकेतून कर्ज घेतले व दुस-यावर्षीही शेतीची मशागत केली, पेरणी केली परंतु दुष्काळ पडल्यामुळे त्याच्या शेतातील सर्व पीक जळून वाया गेले. पुन्हा पारावर बैठक भरते गावकरी सांगतात साहेब काळजी करुच नका, आपली काळी आई आपल्याला धोका देणार नाही तुम्ही परत शेती करा. गावक-यांच्या सल्ल्यानुसार ती व्यक्ती पुन्हा कर्ज काढते व पुन्हा तिस-या वर्षी शेतीची मशागत करते,पेरणी करते, पीक सुध्दा चांगले येते परंतु साहेबाच्या दुर्दैवाने तिस-या वर्षीही गारपीट होऊन सर्व पीक वाया जाते, पीक जमीनदोस्त होते. बँकेचे हप्ते न भरल्यामुळे बँकेवाले येतात आणि त्याच्या घराचे पत्रे काढतात, घरातील सामानांचा लिलाव करतात. या धक्क्यामुळे साहेब निराश होतो आणि लंगोटी लावून गावाच्या बाहेर निघून जातो. गावाच्या बाहेर निघाल्यावर त्या व्यक्तीला समोरुन नग्न नागा साधू येतांना दिसतात. साहेबाला नग्न साधू दिसल्याबरोबर साहेब ताडकन उडतात व साहेबाला असे वाटते की, अरे माझ्याकडे केवळ पाचच एकर शेती होती तरी सुध्दा मला लंगोटी लावावी लागली परंतु या समोरच्या व्यक्तीच्या अंगावर एकही कपडा नाही, यांनी किती शेती घेतली असेल ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

सभापती महोदय, मला एवढेच तात्पर्य सांगावयाचे आहे की, महाराष्ट्रातील शेतक-याची स्थिती यापेक्षा वेगळी नाही. त्यामुळे माझी सरकारला विनंती आहे की, आपण महाराष्ट्रातील शेतक-यांना भरीव मदत केली तरच महाराष्ट्रातील शेतकरी वाचू शकेल. (अडथळा) मराठवाडा ही संताची भूमी आहे. "पापाची वासन नको दावू डोळा, त्याहून आंधळा बरा मी", असे मानणारे आमचे मंत्री महोदय या ठिकाणी उपस्थित आहेत. शासनाने आपल्या डोळयावर पट्टी न बांधता महाराष्ट्रातील विशेषत: मराठवाडयातील शेतक-यांना भरीव मदत करुन महाराष्ट्रातील सरकार हे पुरोगामी सरकार आहे, शेतक-यांच्या प्रती सरकारला आस्था आहे, महाराष्ट्रातील शेतकरी सरकारचा आधारस्तंभ आहे अशा प्रकारची भावना महाराष्ट्रातील शेतक-याची झाली पाहिजे. त्यामुळे शासनाने शेतक-यांना मदत करतांना शासनाच्या मदतीची टिंगल होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. नाही तर आपण मागील वर्षी शेतक-याला 100 रुपये मदत दिली परंतु ती मदत घेतांना त्याला बँकेत खाते उघडावयास 200 रुपये लागत असल्यामुळे त्याने शासनाच्या मदतीची सर्व कागदपत्रे फाडून टाकली होती त्यामुळे मागच्या सारखा प्रकार यावेळी होणार नाही याची शासनाने काळजी घ्यावी व शासनाच्या मदतीची टवाळी होणार नाही यादृष्टीने काळजी घ्यावी व शेतक-यांना ठोस आधार द्यावा अशी विनंती करतो व आपली रजा घेतो.

यानंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती आणि अवकाळी पाऊस या संदर्भात मागील दोन दिवसांपासून सभागृहात सतत गोंधळ झाला. सुदैवाने आज याठिकाणी त्या विषयावरील चर्चेस सुरुवात झाली. सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांच्या अशा भावना आहेत की, कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना चांगल्याप्रकारे मदत मिळाली पाहिजे.

सभापती महोदय, भारत हा कृषी प्रधान देश आहे. आज सकाळच्या सत्रात एका विधेयकावर बोलताना सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले की, आज शहरीकरण फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. शहरीकरण कितीही मोठ्या प्रमाणावर झाले तरी शेती हाच आपला प्रमुख उद्योग धंदा आहे हे आपणास नाकारता येणार नाही. तेव्हा शेतीच्या चारही बाजूंना लक्ष देणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

या वर्षी मृग नक्षत्राचा पाऊस वेळेवर झाला. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळेवर पेरणी केली. कापसासारख्या महागड्या बियाणांची खरेदी करुन पेरणी केली. त्याचप्रमाणे संकरीत ज्वारी,बाजरी, धानाची पेरणी केली. जून महिन्यानंतर या पिकांची चांगली उगवण झाली. बहिणाबाई चौधरीने जमिनीचे अतिशय सुंदर वर्णन केलेले आहे ते सांगते

धरतीच्या कुशीमध्ये बीज बियाणी निजली
वर हातरली माती जशी शाल पांघरली

सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गंभीर असतील असे वाटत होते, परंतु ते का हसत आहेत ते मला कळत नाही... प्रा.सुरेश नवले हे शेतकरी आहेत या विषयी साशंक आहात काय ?.... पाऊस वेळेवर सुरु झाल्यामुळे या वर्षी दुष्काळाला सामोरे जावे लागणार नाही, पाण्याचा प्रश्न उद्भवणार नाही असे सर्वांना वाटत होते. महाराष्ट्रातील सर्व शेतकरी वर्ग आनंदात होता. दुर्दैवाने नंतर इतका पाऊस झाला की, ज्यांच्या पेरण्या राहून गेल्या होत्या त्यांना पेरण्या करता आल्या नाहीत. ज्या शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या होत्या, त्याची उगवण झाली होती त्याठिकाणी कुंडा, कुर्डू गवत, गाजर गवत इत्यादी मोठ्या प्रमाणावर वाढले. हे गवत इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढले की, पिकांची उंची कमी आणि गवताची उंची जास्त होती.बाजरीची जी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

50-100 कणसे दिसत होती त्यामध्ये गवत वाढल्यामुळे गवत चरावयास शेतात जनावर जात होती. एका शेतकऱ्याने पाऊस उगवल्यानंतर शेतीमध्ये कांदा लावला. पाऊस जास्त झाल्यामुळे कांदा सुपारी एवढा झाला. पावसामुळे कांदा इतका सडला की, त्या शेतकऱ्याने कांदा जमिनीत दाबून खत करण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, कापसास पांढरे सोने म्हटले जाते. बीड जिल्ह्यात कापूस चांगला पिकतो. बी.टी.बियाणे् आल्यापासून शेतकरी कापसाचे जास्त उत्पादन घेत आहेत. यावर्षी कापसाला 4200 ते 4500 रुपयांपर्यंत भाव मिळण्यास सुरुवात झाली. या वर्षी कापसाला बोंड आले आणि त्याचे फुलात रुपांतर होण्यास सुरुवात झाली तोच अवकाळी पावसामुळे कापूस पिकाचे अतोनात नुकसान झाले. पावसामुळे कापसावर वेगवेगळ्या प्रकारचे रोग पडण्यास सुरुवात झाली. कापसाचे बोंड शेतीमध्ये पिवळा धम्मक झाले, त्याची वाढ झाली नाही.

यानंतर श्री गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामुळे कापसाचा उतारासुध्दा कमी झाला आहे.

सभापती महोदय, यानंतर मला निच-याच्या जमिनीसंबंधीचा एक मुद्दा मांडावयाचा आहे.....

उपसभापती : ही चर्चा येथेच थांबविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे ऑन लेग राहतील. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन्हा भरेल.

(2.30 ते 3.00 मध्यंतर)

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी./मु.शी.: निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप

उप सभापती : सन्माननीय सदस्यांना याची कल्पना आहे की, या सभागृहाचे सन्माननीय 11 सदस्य येत्या 5 डिसेंबर, 2010 रोजी निवृत्त होणार आहेत. निवृत्त होणाऱ्या 11 सदस्यांना नेहमीच्या प्रथेप्रमाणे भावपूर्ण निरोप देण्याच्या दृष्टीने आज विधान भवनाच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ एकत्रित छायाचित्र काढण्याचा कार्यक्रम व विधान भवनाच्या प्रांगणात चहापानाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. सबब, खालील सन्माननीय सदस्यांना निरोप देण्यासंबंधीची बाब आता घेण्यात येत आहे :-

1. श्री. कमलकिशोर नानासाहेब कदम, वि.प.स.
2. श्री. गुरुमुख जगवानी, वि.प.स.
3. श्री. राजेंद्र जैन, वि.प.स.
4. श्री. विलासराव शिंदे, वि.प.स.
5. डॉ. एन. पी. हिराणी, वि.प.स.
6. श्री. विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.
7. श्री. विश्वनाथ उमाजी डायगव्हाणे, वि.प.स.
8. श्री. रामनाथ दादा मोते, वि.प.स.
9. प्रा. बी. टी. देशमुख, वि.प.स.
10. डॉ. सुधीर भास्कर तांबे, वि.प.स.
11. श्रीमती वंदना हेमंत चव्हाण, वि.प.स.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सभागृहामधून निवृत्त होणाऱ्या सदस्यांपैकी काही सन्माननीय सदस्य आज उपस्थित नाहीत. याबाबत विधीमंडळ सचिवालयाने त्यांना उपस्थित राहण्याबाबत कळविले होते काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांपैकी काही सन्माननीय सदस्यांचे पुनरागमन झाले आहे. त्यामुळे त्यांना निरोप देण्याची आवश्यकता नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निवृत्त होणाऱ्या सदस्यांपैकी काही सन्माननीय पुन्हा निवडून आले असून त्यांचे सभागृहात पुनरागमन झाले आहे. परंतु त्याशिवाय काही सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत ते आज सभागृहात उपस्थित नाहीत. त्यापैकी सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम उपस्थित आहेत. त्याशिवाय आणखी एक-दोन सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत.

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभापती : विधिमंडळ सचिवालयाने निवृत्त होणाऱ्या सर्व सन्माननीय सदस्यांना पत्र पाठवून कळविले आहे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, येत्या 5 डिसेंबर, 2010 पासून महाराष्ट्र विधान परिषदेचे 11 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. त्यापैकी सर्वश्री राजेंद्र जैन, विक्रम काळे, रामनाथ मोते, डॉ. सुधीर तांबे हे चार सन्माननीय सदस्य पुन्हा निवडून आले आहेत. त्याचबरोबर सर्वश्री कमलकिशोर कदम, गुरुमुख जगवानी, विलासराव शिंदे, विश्वनाथ डायगव्हाणे, प्रा. बी.टी. देशमुख व श्रीमती वंदना चव्हाण हे सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. या सन्माननीय सदस्यांनी या सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेतला व या लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरामधून जनतेची सेवा केली. सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सभागृहाच्या आत व सभागृहाच्या बाहेर हिरिरीने मांडले. अशा या 11 सन्माननीय सदस्यांना या सभागृहामध्ये जड अंत:करणाने निरोप देण्यात येत आहे.

सभापती महोदय, 11 सन्माननीय सदस्यांपैकी काही सन्माननीय सदस्यांशी माझा जवळचा परिचय होता. विशेषत: सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे हे माझ्या लोकसभा मतदारसंघामधील एक प्रभावी आमदार व अत्यंत तडफदार कार्यकर्ते होते. सभापती महोदय, आपण पाहिले आहे की, 1991 च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी आपणाबरोबर सन्माननीय सदस्यांनी देखील माझ्या प्रचारामध्ये हिरिरीने भाग घेतला होता.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

आम्ही सदैव एकत्रपणे काम करीत होतो. त्याचबरोबर दुसऱ्या सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना ताई चव्हाण या देखील आमच्या पक्षाच्या सदस्या होत्या. मात्र पुढे त्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामार्फत विधान परिषदेमध्ये निवडून आल्या. त्यांनी देखील एक निष्णात वकील आणि समाजसेविका म्हणून हिरिरीने काम केले. मात्र माझा जरी या सर्व सन्माननीय सदस्यांशी फारसा परिचय नसला तरी प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी या प्रक्रियेमध्ये काही विषय निवडून त्या-त्या विषयावरील चर्चेमध्ये प्रभावीपणे आपली भूमिका मांडलेली आहे आणि विशेषत: सभागृहाच्या बाहेर देखील जनतेचे प्रश्न सोडविण्यामध्ये फार मोठी भूमिका बजावलेली आहे. म्हणून या सर्व सन्माननीय सदस्यांना निरोप देताना मी सांगू इच्छितो की, या सभागृहातून त्यांना अंतिम निरोप देण्यात येत नाही तर पुन्हा ते सक्रीय राजकारणामध्ये सहभागी होतील आणि समाजकारणामध्ये मात्र ते शेवटच्या क्षणापर्यंत कार्यरत रहातील अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि त्यांनी केलेल्या कामाबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. त्याचबरोबर त्यांनी यापेक्षाही अधिक समाजसेवा करावी अशी अपेक्षा व्यक्त करुन मी निवृत्त होणाऱ्या सर्व सन्माननीय सदस्यांना शुभेच्छा देतो आणि रजा घेतो.

. . . .2 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी आपल्या सभागृहामध्ये काम करणारे सहकारी निवृत्त होत आहेत. त्यापैकी सन्माननीय सदस्य सर्वश्री राजेंद्र जैन, विक्रम काळे, रामनाथदादा मोते आणि डॉ.सुधीर तांबे यांची फेर निवड झालेली आहे. या सभागृहामध्ये अनेक वर्ष सोबत राहून त्यांनी काम केले आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये, या राज्याला योग्य दिशा देण्यासाठी आणि इतर विधायक कार्यासाठी या सभागृहाच्या माध्यमातून त्यांनी सातत्याने शासनाला सूचना केल्या. तसेच आपापली मते व्यक्त केली आणि एक आदर्श समाज घडविण्यासाठी शासनाच्या माध्यमातून देखील ज्या-ज्या गोष्टी करण्याची आवश्यकता आहे, त्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, या सदनातील माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदमजी हे त्यापैकी एक आहेत. ते या सदनामध्ये दोन वेळा निवडून आले आहेत म्हणजे जवळपास 12 वर्षे ते या सभागृहाचे सभासद होते. विधानसभेमध्ये सुध्दा ते 10 वर्षे सभासद होते. ते ज्यावेळी 1980 मध्ये विधानसभेमध्ये निवडून आले, त्याच वेळेला मी देखील विधानसभेमध्ये निवडून आलो होतो. तेव्हा पासून माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदमसाहेब आणि माझा परिचय झाला. ते गेली 20 वर्षे सतत कार्यरत आहेत आणि एक लोकप्रतिनिधी आपल्या कार्यातून किती मोठे काम उभे करु शकतो हे त्यांनी आपल्या कर्तृत्वातून दाखवून दिलेले आहे. त्यांनी विविध प्रकारच्या तंत्रशिक्षणाच्या संस्था उभ्या केल्या आणि ते करीत असताना संभाजीनगर येथे महात्मा गांधी मिशन हॉस्पिटलच्या माध्यमातून गोरगरिबांची सेवा करण्याचा देखील वसा घेतला होता. मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे त्यांनी शिक्षण संस्था उभ्या केल्या जेणेकरुन बहुजनांची मुले शिकली पाहिजेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

त्याच बरोबर सर्वसामान्य माणसाला जो अडलेला आहे नडलेला आहे त्याला या महात्मा गांधी मिशन हॉस्पिटलच्या माध्यमातून मदत मिळाली पाहिजे अशा पध्दतीने विविध संस्थांमध्ये त्यांनी काम केलेले आहे. ते एक बहुआयामी व्यक्तिमत्व आहे. एका बाजूला त्यांनी रचनात्मक काम केले. त्याचबरोबर सहकारामध्ये सुध्दा त्यांनी काम केलेले आहे. 1988 ते 1990 या काळात ते या शासनामध्ये शिक्षण खात्याचे मंत्री म्हणून सुध्दा राहिलेले आहेत. डॉ. कमलकिशोर कदम यांना मी गेल्या सहा-सात वर्षापासून या सभागृहात पहातो की, ते सभागृहात शेवटच्या बाकावर बसतात. नको त्या ठिकाणी बोलत नाहीत. नको त्या ठिकाणी ते आपले वक्तव्य करीत नाहीत. योग्य त्या ठिकाणी आणि योग्य पध्दतीने सर्वंकष असे आपले मत ते या ठिकाणी व्यक्त करुन जो विषय या ठिकाणी चर्चेला आला असेल त्या विषयाला योग्य तो न्याय कसा मिळेल या संबंधी त्यांचे नेहमी आग्रही प्रतिपादन असायचे. खरे म्हणजे त्यांना पुन्हा संधी मिळेल असे वाटले होते परंतु ती का मिळाली नाही हे समजू शकले नाही. कधी कधी असे म्हणतात की, राजकारणातून कदाचित ते सेवानिवृत्त होणारही नाहीत. पण राजकारणातून सेवानिवृत्त झाल्यानंतर माणसाची जी मानसिक अवस्था होते ती होऊ नये म्हणून त्यांनी आधीच पुढची व्यवस्था करुन ठेवली आहे. त्यांनी इतके काम उभे करुन ठेवले आहे की, कदाचित त्यांना त्या कामामधून वेळही मिळणार नाही पण ते सतत कामात राहून समाजाची सेवा करतील. डॉ. कमलकिशोर कदम साहेबांनी आपल्या कामाचा जो विस्तार वाढवत नेला आहे तो विस्तार अधिक वाढवून ते समाजाची सेवा करतील. मी त्यांच्या पुढील कार्याला शुभेच्छा देतो.

सन्माननीय सदस्य श्री. विलासराव भाऊराव शिंदे यांची अणि माझी भेट विधानसभेत झाली. ते एकदाच विधानसभेमध्ये निवडून आले त्यानंतर ते परत विधानसभेत गेले नाहीत. ते विधानपरिषदेवर निवडून आले. जशी काही माणसे लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असतात. तशा पध्दतीने काही माणसांना संघटनेमध्ये काम करुन लोकप्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळत असते. श्री. शिंदे साहेबांचे जीवन पाहिले तर वसंतदादा पाटलापासून राजारामबापू पाटील, यशवंतराव चव्हाण यांच्या पठडीत त्यांचे नेतृत्व तयार झाले होते. पंचायत समितीपासून खालच्या स्तरापासून काम करत करत त्यांनी संघटनेची धुरा यशस्वीपणे राबविली. पक्षाचा विस्तार किंवा संघटने विषयी असलेली त्यांची बांधिलकी त्यांनी कायम ठेवली. निश्चीतपणाने सांगली जिल्हयातील एक चागला कार्यकर्ता म्हणून त्यांचा नावलौकीक वाढलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, सेवा निवृत्त होणाऱ्या सर्व सन्माननीय सदस्यांना आपल्या कार्यालयाकडून निमंत्रणे पाठविण्यात आलेली आहेत. त्याप्रमाणे ते आज या ठिकाणी उपस्थित असते तर बरे झाले असते पण आज सेवानिवृत्त होणारे सर्व सन्माननीय सदस्य या ठिकाणी उपस्थित नाहीत.

सन्माननीय सदस्य डॉ. हिराणी हे आमच्या विदर्भातील आहेत. डॉ. हिराणी आणि माझे जुने संबंध आहेत. या सभागृहातील त्यांचे काम मी जवळून पाहिलेले आहे. ते जरी डॉक्टर असले तरी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बऱ्याचदा शासनाचे कुठे चुकते हे या ठिकाणी आवर्जून सांगत असत.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

ते कापूस पणन महासंघाचे अध्यक्ष होते. मुख्य प्रशासक म्हणून त्या ठिकाणी ते गेली अनेक वर्षे काम करीत आहेत. मी सुध्दा कापूस पणन महासंघामध्ये काम केलेले आहे. सन्माननीय सदस्य डॉ. हिराणी साहेबांची इच्छा असताना आणि शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न ते करीत असूनही सरकारच्या धोरणामुळे त्यांना काही पावले टाकता येत नाहीत. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे, शेतकऱ्यांना त्यांच्या कापसाचे योग्य पैसे मिळाले पाहिजेत अशा पध्दतीचा त्यांचा प्रयत्न असून सुध्दा आणि ते त्या पदावर असून सुध्दा काही करु शकले नाहीत. गेली अनेक वर्षे त्यांनी ज्या पध्दतीने कापूस पणन महामंघाचे काम चालविले त्यामध्ये पणन महासंघाला शेतकऱ्यांनी कापूस दिला नाही यामध्ये त्यांचा काही दोष नाही असे मला वाटते. पणन महासंघाचा भाव कमी होता त्यामुळे पणन महासंघाला कापूस मिळू शकला नाही. परंतु लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असताना पणन महासंघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांची सेवा करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांनी त्या पदाला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. पुन्हा ते या सभागृहामध्ये येतील असे वाटले होते परंतु त्यांचीही गाडी चुकली असे मला वाटते. अनेकदा पक्षामध्ये काम करीत असताना पदे येतात आणि जातात. परंतु समाजसेवेचा वसा ज्या कार्यकर्त्यांनी घेतलेला आहे ते कार्यकर्ते त्यांचा तो वसा सोडू शकत नाहीत. उद्यापासून ते या सभागृहामध्ये राहणार नाहीत. परंतु पणन महासंघाच्या माध्यमातून निश्चितपणे ते शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करील राहतील, तो वसा ते सोडणार नाहीत अशी अपेक्षा त्यांच्याकडून व्यक्त करतो. मी त्यांना शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विश्वनाथ उमाजी डायगव्हाणे हे शिक्षक आमदार म्हणून तीन वेळा या सभागृहामध्ये आले. शिक्षकांच्या प्रश्नासाठी सातत्याने संघर्षरत राहण्याची त्यांची पध्दत होती. शिक्षकांचा किंवा शिक्षण खात्याचा कोणताही प्रश्न असेल त्याबाबत ते सरकारवर तुटून पडत असत. जोपर्यंत त्या प्रश्नाला न्याय मिळत नाही तोपर्यंत तो प्रश्न ते सोडत नसत. काही प्रसंगी त्यांच्यावर रागावण्याची पाळी आपल्यावर यावयाची. काही वेळा आम्हाला असे वाटावयाचे की, हे शिक्षक प्रतिनिधी या ठिकाणी येऊन अगदी छोट्या छोट्या विषयांसाठी सभागृहाचा फार वेळ घेतात. परंतु ज्या क्षेत्रातून ते निवडून आले होते त्या क्षेत्राला न्याय देण्याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

प्रयत्न त्यांच्या माध्यमातून झाला. या वेळेला त्यांना निवडणूक लढविण्याची संधी मिळाली होती परंतु निवडणुकीमध्ये त्यांना पराभव पत्करावा लागला. त्यामुळे पुन्हा ते या सभागृहामध्ये पोहचू शकले नाहीत. श्री. विश्वनाथ डायगव्हाणे यांचा पिंड असा आहे की, पद असो किंवा नसो, संघटनेसाठी काम करण्याचा त्यांचा स्वभाव आहे. या राज्यामध्ये शिक्षणाच्या बाबतीत चाललेला गोंधळ, शिक्षकांवर वेगवेगळ्या पध्दतीने होत असलेला अन्याय ते संघटनेच्या माध्यमातून दूर करीत राहतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी त्यांना शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख हे सातत्याने 30 वर्षे या सभागृहाचे सदस्य आहेत. कोणीही सदस्य सातत्याने 30 वर्षे या सभागृहामध्ये आला असेल असे मला वाटत नाही. सातत्याने 30 वर्षे त्यांनी या सभागृहामध्ये शिक्षकांचे नेतृत्व केले. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख हे एकदा बोलण्यासाठी उभे राहिले की, त्यांची तोफ थांबत नव्हती.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

कधी कधी तुम्हाला त्यांना थांबवावे लागत होते, कधी आम्हाला त्यांना थांबवावे लागत होते. दोन वर्षापूर्वी हिवाळी अधिवेशनामध्ये एका प्रश्नावर विचार व्यक्त करीत असताना सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख एवढे संतापले होते की, बाहेर गेल्यावर त्यांना हृदयविकाराचा झटका आला होता. त्यामुळे त्यांना ताबडतोब हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे लागले होते. एखाद्या प्रश्नासाठी जीव तोडून, मनापासून संघर्ष करण्याचा त्यांचा स्वभाव होता. शिक्षण क्षेत्राचा त्यांना प्रचंड अनुभव होता, प्रचंड अभ्यास होता. त्याचा अनुभव आपणही अनेकदा घेतलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख बोलण्यासाठी उभे राहिले की, मागील 5-10 वर्षांचे तारीखवार दाखले देत असत. हायकोर्टामध्ये जे जे निर्णय झाले असतील किंवा हायकोर्टाने सरकारला जे निर्देश दिले असतील ते याठिकाणी कोट करीत असत. शिक्षण क्षेत्राचा त्यांचा एवढा प्रचंड अभ्यास होता.

सभापती महोदय, विदर्भाच्या अनुशेषाचा विषय आला त्यावेळी माननीय श्री.रणजित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय एक समिती स्थापन झाली होती. त्या समितीच्या माध्यमातून विदर्भाच्या अनुशेषाबद्दल गेल्या 10 वर्षांपासून ते या सभागृहात झगडत राहिले. राज्यपालांच्या निदेशानुसार विदर्भाला झुकते माप मिळाले पाहिजे असा त्यांचा नेहमी आग्रह असे. याठिकाणी राज्यपालांच्या निदेशांचे वाचन ते नेहमी करीत असत. राज्यपालांची भेट घेऊन विदर्भावर कसा अन्याय होतो ते त्यांनी अनेकदा सांगितलेले आहे. त्यांनी विदर्भाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न अनेकदा केलेला आहे. अनेकदा सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडले आहे. सरकारला परिपत्रक बदलण्यास भाग पाडलेले आहे. एकदा तर विनियोजन विधेयकाला सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी उपसूचना दिली होती आणि ती सभागृहात मंजूर झाल्यामुळे घटनात्मक पेच निर्माण झाला होता. त्यावेळी आम्ही या सभागृहात नवखे होतो. या सभागृहात खालच्या सभागृहातून विनियोजन विधेयक आले होते. ते विधेयक जसेच्या तसे मंजूर करण्याची नेहमीची पध्दत आहे. परंतु या सभागृहात ते विधेयक आल्यावर त्यांनी उपसूचना मांडली आणि ती मंजूर झाली होती. त्यामुळे सरकार हादरले होते. ती उपसूचना मंजूर झाल्यानंतर त्या उपसूचनेसह ते विधेयक पुन्हा खालच्या सभागृहात जाणे आवश्यक होते, परंतु त्यापूर्वीच खालचे सभागृह संस्थगित झाले होते. त्यामुळे विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवावे लागले होते. विधिमंडळाच्या

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर....

कामकाजामध्ये ते एक ऐतिहासिक उदाहरण असेल. अशापध्दतीने अनेकदा सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न त्यांच्या माध्यमातून होत होता. जे जे शिक्षण मंत्री व्हायचे त्यांचे इतर सभासदांच्या बोलण्याकडे कमी लक्ष असे, परंतु सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख काय बोलत आहेत, कोणता प्रश्न विचारत आहेत त्याकडे त्यांचे बारीक लक्ष असे. आम्ही त्यांच्याविरुध्द 5 टर्म लढलो, परंतु पाचही वेळी आम्ही जिंकू शकलो नव्हतो. 5 वेळी त्यांनी निवडणूक जिंकली होती, असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. शिक्षण क्षेत्रातील विदर्भातील एक अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून ते सर्वांच्या परिचयाचे आहेत.

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्राशी ते परिचित होते तसे यावेळी ते एका विषयामुळे चर्चेत होते. विदर्भात सोफिया नावाचा विद्युत प्रकल्प होत आहे. त्या सोफिया प्रकल्पाविरुध्द ते गेल्या दोन वर्षापासून झगडत होते. महत्प्रयासाने विदर्भात आलेला वर्धा प्रकल्प पूर्ण करुन त्या प्रकल्पातील पाणी शेतक-यांना मिळाले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. परंतु त्यांच्या मनामध्ये शंका होती की, या प्रकल्पातील पाणी सोफिया विद्युत प्रकल्पाकडे वळविले जाईल. विदर्भातील प्रदूषण वाढू नये म्हणून त्यांनी सोफिया विद्युत प्रकल्पाच्या विरोधाला सुरुवात केली. त्यासंबंधी आंदोलने केली. आम्ही तर यापूर्वीही त्यांच्या विरोधात लढलो होतो आणि आताही लढलो होतो.

यानंतर श्री.शिगम

अशुध्दीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

आमचा उमेदवार जिंकेल की नाही अशी धाकधुक आमच्या मनामध्ये होती. खरे तर प्रा.बी.टी.देशमुख यांच्या विरोधात आमचा उमेदवार नव्हताच. परंतु आम्हाला नंतर अशी माहिती मिळाली की "सोफिया"ने त्यांना हरवले. सोफियाची ताकद ही एक निगेटिव्ह व्होट म्हणून ते निवडणुकीत पराभूत होण्यास कारणीभूत ठरली. आम्ही आमच्या पध्दतीने काम केले. एक धडाडीचा कार्यकर्ता, अभ्यासू आणि आक्रमक व्यक्तिमत्व म्हणजे प्रा. बी.टी.देशमुख. विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष, सोफिया अशा महत्वाच्या विषयावर त्यांनी या सभागृहामध्ये चर्चा घडवून आणल्या. शैक्षणिक धोरणाच्या बाबतीत सरकारला योग्य दिशा देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. असे हे अभ्यासू व्यक्तिमत्व पुन्हा निवडून येऊ शकले नाही. मी त्यांना शुभेच्छा देतो.

सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते हे पुनश्च निवडून येतील असे वाटले होते आणि त्या प्रमाणे ते निवडून आलेही. प्रामाणिकपणे,इमानदारीने आणि कोणत्याही पदाची अपेक्षा न करता 30-35 वर्षे ते शिक्षक संघटनेचे काम करीत राहिले. त्यांना मागील वर्षी मिळालेले विधानपरिषद सदस्यत्व फार उशिरा मिळाले. 25-30 वर्षे संघटनेमध्ये निष्ठेने काम करुन प्रत्येक कार्यकर्त्याला न्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तसेच त्यांनी अभ्यास करुन आपल्या कामाची योग्य बैठक बसविली. ते पुन्हा निवडून आल्यामुळे आणखी सहा वर्षे आपल्या सोबत काम करणार आहेत. मी त्यांचे स्वागत करतो.

सन्माननीय सदस्य डॉ. गुरुमुख जगवानी हे देखील निवृत्त होत आहेत. सुरुवातीला असे वाटले होते की डॉ. जगवानी हे पुन्हा या ठिकाणी येतील. डॉ. गुरुमुख जगवानी हे सभागृहामध्ये ब-याचदा रहायचे तरीही मला त्यांना कधी तरी शोधावे लागायचे. त्यांचा पिंड राजकीय नसला तरी त्यांचे कुटुंब राजकारणी आहे. त्यांनी पाकिस्तानातील सिंध प्रांतातून स्थलांतर होऊन भारताचे नागरिकत्व स्वीकारले. जळगावसारख्या शहरामध्ये त्यांनी डॉक्टरी व्यवसाय सुरु केला. डॉक्टरी व्यवसायाबरोबरच समाजसेवा देखील सुरु केली. तसेच अनेक उद्योगही त्यांनी उभे केले. एक चांगला डॉक्टर आणि यशस्वी उद्योजक म्हणून त्यांनी आपला जीवनक्रम सुरु केला. मला सुरुवातीला वाटले होते की, त्यांनी डॉक्टरेट (Doctorate) ही पदवी प्राप्त केलेली आहे. परंतु नंतर समजले की, ते एम.बी.बी.एस. झालेले डॉक्टर आहेत. नावाप्रमाणे ते सतत हसतमुख

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

असतात. आमच्या भा.ज.पक्षाचे ते जिल्ह्याचे खजिनदार तसेच ऑईल मिल असोशिएशनचे प्रमुख आहेत. ते ज्या पदावर राहतात त्या पदाला ते न्याय देण्याचा प्रयत्न करतात. या सभागृहामध्ये ते आपल्या जागेवर दिसले नाहीत तर ते निश्चितपणे विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री. एकनाथराव खडसे साहेबांच्या केबिनमध्ये सापडायचे. त्यांचे ते राईट हॅण्ड आहेत. सभापती महोदय, एकदा राजकारणामध्ये आल्यानंतर ती खुर्ची सोडाविशी वाटत नाही. परंतु श्री. गुरुमुख जगवानी यांनी आधीच सांगितले की, "मै इस बार चुनाव नही लडूंगा". या सभागृहामध्ये 6 वर्षे काम केल्यानंतर मी या सभागृहामध्ये पुन्हा येणार नाही असे आधीच जाहीर करणारी डॉ. गुरुमुख जगवानी सारखी माणसे विरळच आहेत.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

परंतु मी सन्माननीय श्री.गुरुमुख जगवानी यांना सांगू इच्छितो की, या सभागृहाचे ते 6 वर्षे सदस्य होते. या सभागृहाशी असलेली नाळ तुटू देऊ नका. हे आपले कुटुंब आहे. ज्या कुटुंबामध्ये आपण सहा वर्षे राहिलात, त्या कुटुंबाशी संपर्क ठेवा. राजकारणात केव्हा काहीही घडू शकते. कदाचित पुन्हा तुम्हाला या सभागृहात यायची संधी मिळेल. आमच्या तुम्हाला पुन्हा शुभेच्छा आहेत. समाजकारण, राजकारण सुरु ठेऊन अधून मधून येत रहा म्हणजे या परिवाराशी आपला संपर्क सुरु राहील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.विक्रम काळे हे या सभागृहात पुन्हा निवडून आलेले आहेत. माननीय सदस्या ॲड.वंदना चव्हाण यांना या सभागृहाच्या सदस्या म्हणून फार कमी काळ संधी मिळाली. पोटनिवडणुकीतून त्या निवडून आल्या होत्या. पुणे शहराच्या त्या महापौर होत्या. त्यांचा जीवन परिचय वाचल्यानंतर कळले की, एखादी महिला एवढे महद्कार्य करु शकते. पुण्याच्या महापौर पदाच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी 44 हजार अशिक्षित महिलांना साक्षर केले. हे छोटे काम नाही. अनेक व्यक्ती महापौर होतात. अनेक प्रकारचे निर्णय त्यांच्याकडून घेतले जातात. परंतु ॲड.वंदना चव्हाण यांनी एक मिशन हाती घेऊन 44 हजार अशिक्षित महिलांना साक्षर करण्याचा संकल्प केला आणि तो पूर्ण केला. त्या अत्यंत अभ्यासू आहेत. पर्यावरणाबाबत त्यांचा चांगला अभ्यास आहे. या सभागृहामध्ये ज्या ज्यावेळी पर्यावरणाच्या विषयावर चर्चा व्हायची त्या त्यावेळेला त्यांचे भाषण ऐकत रहावे असे असायचे. मी सभागृहाचा अधिक वेळ घेणार नाही. परंतु सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अशा अभ्यासू व्यक्तिमत्वाला पुन्हा संधी दिली असती तर या सभागृहाच्या कामकाजात चांगली भर पडली असती. मी त्यांच्या भावी जीवनामध्ये त्यांनी असेच समाजकार्य सुरु ठेवावे अशी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे व माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन हेही पुन्हा निवडून आलेले आहेत. मी त्यांचे स्वागत करतो आणि माझे वक्तव्य संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, आज आपण या सभागृहाचे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, श्री कमलकिशोर कदम, डॉ.एन.पी.हिराणी, डॉ.गुरुमुख जगवानी, सर्वश्री विलासराव शिंदे, विक्रमजी काळे, विश्वनाथजी डायगव्हाणे, रामनाथजी मोते, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेंद्र जैन आणि ॲड.वंदना चव्हाण यांना निरोप देत आहोत.

सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री रामनाथजी मोते आणि विक्रमजी काळे हे पुन्हा या सभागृहात असणार आहेत. कारण त्यांच्या मतदारसंघातून त्यांची फेरनिवड झाली आहे. त्यामुळे त्यांचा आजचा निरोप समारंभ म्हणजे केवळ तांत्रिक बाब आहे. त्यामुळे आपल्या सर्वांच्या वतीने, माझ्या वतीने मी त्यांचे अत्यंत मनापासून स्वागतच करतो. त्यांना त्या भागातील मतदारांनी पुन्हा सहा वर्षे प्रतिनिधीत्व करण्याची संधी उपलब्ध करुन दिली. साहजिकच त्यांची यापूर्वीची टर्म उत्तमप्रकारे त्यांनी पार पाडली, म्हणूनच त्या भागातील मतदारांचा त्यांच्यावरील विश्वास वाढला आणि अटीतटीच्या लढतीमध्ये देखील या चौघांनी त्यात यश मिळविले, त्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करतो.

सभापती महोदय, तसे पाहिले तर देशातील मोजक्याच राज्यांमध्ये द्विसभागृही विधीमंडळे आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र राज्याचा समावेश आहे. विधानसभा आणि विधानपरिषद अशा दोन सभागृहांची रचना जाणीवपूर्वक केली गेली.

नंतर 2टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

समाजातील विविध क्षेत्रातील लोकांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा कायदे करीत असताना व्हावा ही त्यामागची कल्पना आहे. आपल्याला माहीत आहे की, जे लोक समाजाकरिता इतके चांगले काम करु शकतात पण निवडून येण्यासाठी मतदारांची जेवढी ताकद आवश्यक असते ती ते उभी करु शकत नाहीत अशांनाच या सभागृहात प्रतिनिधीत्व देऊन समाजकार्य करण्याची संधी मिळाली पाहिजे या संकल्पनेतून हे सभागृह अस्तित्वात आले आहे. यामध्ये अनेक दिग्गजांनी काम केलेले आहे. त्यात माननीय केंद्रीय कृषी मंत्री हे सुध्दा एके काळी या सभागृहाचे सदस्य होते. तसेच माननीय ग.प्र.प्रधान, माजी सभापती माननीय जयवंतराव टिळक, निसर्ग कवी ना.धो.महानोर या लोकांनी उच्च संसदीय मुल्यांची आणि लोकशाहीची जपणूक व शिकवणूक केल्याचे वेळोवेळी राज्यातील जनतेने पाहिलेले आहे. आपल्यातील काही सहकारी सुध्दा त्यांचे अनुकरण करतात म्हणूनच या सभागृहाला एक वेगळे स्थान आहे. या परंपरेतील एक पाईक म्हणून प्रा. बी.टी. देशमुख साहेबांचा मी उल्लेख करणार आहे. त्यांना आपण आदराने बी.टी. भाऊ म्हणून ओळखत होतो. मी गेल्या 21 वर्षांपासून विधिमंडळात काम करीत आहे. ज्यावेळेस मला राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली तेव्हा मला प्रथम या सभागृहात असलेले बी.टी. भाऊच आठवले. मला तेव्हा वाटले होते की आपण कसे काय यांना तोंड देऊ शकतो ? असाही विचार मनात येऊन गेला. अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघाचे ते प्रतिनिधीत्व करीत होते. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले ती वस्तुस्थिती खरी आहे. बी.टी. भाऊंचा पराभव होऊ शकत नाही असेच आम्हालाही वाटत होते. गेल्या 30 वर्षांपासून ते या सभागृहात अमरावती विभागाचे प्रतिनिधीत्व करीत होते. सहाव्यांदा उभे राहिले असता त्याना यश आले नाही. त्यांची कहाणी एक प्रकारे संघर्षाचीच म्हटली तरी चालेल. या विदर्भातील अनुशेष भरुन काढण्यासाठी त्यांनी अत्यंत पोटतिडिकीने आवाज उठविण्याचे काम केले. आपल्यातील काही सन्माननीय सदस्यांनी सुध्दा त्यांना साथ दिली व अतिशय उत्तम काम केले याबद्दल दूमत असण्याचे कारण नाही. या विभागाचे मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्याकडे कार्यभार असताना त्यांचे सवाल-जवाब चालत असताना मी पाहिले आहे. बी.टी. भाऊंचा आक्रमकपणा पाहिला आहे. जेव्हा माझ्याकडे या विभागाची जबाबदारी आली तेव्हा मात्र खरोखरच भीती वाटली होती परंतु सुदैवाने शासनाने सुध्दा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

या खात्याला चांगली तरतूद केली व त्यातून विदर्भाच्या बऱ्याच मागण्या गेल्या पाच वर्षात पूर्ण केल्या. परिणामी सिंचनाचा बराचसा अनुशेष या काळात दूर करण्यात यशस्वी होऊ शकलो. त्याचबरोबर मला सहकारी मंत्री डॉ. सुनील देशमुख हे होते. ते अमरावतीचेच असल्याने त्या दोघांमध्ये चांगला समन्वय साधला जात होता. प्रा. बी.टी. देशमुख हे तरुणपणापासून विविध चळवळीमध्ये काम करीत होते. हे सर्व करीत असताना विद्यादानाचे व्रत देखील त्यांनी अखंडपणे सुरु ठेवलेले आहे. तसेच नेतृत्वासाठी आवश्यक असणारे चारित्र्य असल्यामुळे आपोआपच त्यांच्याकडे नेतृत्व चालून आले. शिक्षकांचे विविध प्रश्न, विदर्भातील सिंचनाचा अनुशेष यावर बी.टी. भाऊ बोलले नाही असे कधीच झाले नाही. माझ्या विभागाशी संबंधित प्रश्न अथवा लक्षवेधी सूचना असतील तर जास्तीची तयारी करुन मी येत होतो, कारण बी.टी. भाऊ आपल्या प्रश्नाची तड लावण्यासाठी एकदम आक्रमक असतात याची मला जाण होती. आपण पाहिले तर असेही दिसून येत होते की, त्यांनी कधीही शिष्टाचार आणि वर्तनाचा तोल ढळू दिला नाही किंवा त्यांना बोलल्यानंतर कधी शब्द मागे घ्या असे सांगण्याची वेळ त्यांच्यावर आली नाही. अगदी व्यवस्थितपणे सर्व परंपरांचा मान राखत विधिमंडळाला साजेशा प्रकारचे काम केलेले आहे असे व्यक्तिमत्व पुन्हा सभागृहात यावे असेच वाटत होते. त्यांना सभागृहाचा निरोप देताना खरोखरच सर्वांच्या भावना उचंबळून येतात. पुढेही त्यांचे काम अशाच पध्दतीने चालेल अशा शुभेच्छा मी सर्वांच्या वतीने देत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

सभापती महोदय, आज आपण जसे प्रा.बी.टी.देशमुख यांना निरोप देत आहोत त्याच प्रमाणे आपण सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम यांना सुध्दा निरोप देत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम हे आय.आय.टी. पवई येथून एम.टेक. झाले होते. त्यांनी शैक्षणिक चळवळीपासून सामाजिक आणि राजकीय जीवनाला सुरुवात केली होती. ते उच्च शिक्षित असल्यामुळे त्यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री म्हणून मा. श्री. पवार साहेबांच्या मंत्री मंडळात प्रभावीपणे काम केल्याचे पाहिलेले आहे. त्यांनी शिक्षण संस्थांचे जाळे नवी मुंबई, नांदेड, औरंगाबाद या भागात करुन शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचे योगदान श्री. कदम साहेबांनी केलेले आहे. मा. पवार साहेबांनी त्यांच्या 40-50 वर्षाच्या काळात अनेक प्रकारचे जिवाभावाचे सहकारी मिळवलेले आहेत त्यातील नांदेड परिसरात काम केलेल्या मा. कदम साहेबांच्या नावाचा खास करुन उल्लेख प्राधान्याने करावा लागेल. शिक्षण क्षेत्रातल्या जाणकार व्यक्तिमत्वाला आज आपल्याला निरोप द्यावा लागतो आहे. त्यांच्या संदर्भात आम्हाला थोडीशी ॲडजस्टमेंट करावी लागली आहे. काही राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाने एकत्रितपणे लढवल्या होत्या त्यामुळे ही जागावर काँग्रेसला द्यावी लागल्यामुळे मा. कमलकिशोर कदम यांना आपल्याला थांबवावे लागले आहे, ही वस्तुस्थिती आहे व ही वस्तुस्थिती मी मान्य करतो. पुढील काळात आम्हाला त्यांचा लाख मोलाचा सल्ला आणि मार्गदर्शन मिळत राहील अशी, खात्री बाळगतो.

सभापती महोदय, डॉ. एन.पी. हिराणी यांना सुध्दा आपण भावपूर्ण निरोप देत आहोत. डॉ. एन.पी. हिराणी हे एक ज्येष्ठ व्यक्तिमत्व असून या ज्येष्ठ व्यक्तिमत्वाचा सहवास या सभागृहाला आता लाभणार नाही. माननीय मंत्री सर्वश्री भुजबळ साहेब, आर.आर.पाटील तसेच मधुकरराव पिचड यांना ते पुन्हा सभागृहात यावे असे वाटत होते परंतु डॉ. एन.पी.हिरणी यांनी पुन्हा या सभागृहात येण्याची माझी इच्छा नाही असे सांगितले. भारतीय जनता पक्षाच्या जसे डॉ. गुरुमुख जगवानी यांनी सभागृहात न येण्याची इच्छा जशी व्यक्त केली तशीच इच्छा आमच्या डॉ. एन.पी.हिराणी यांनी व्यक्त केली होती. वैद्यकीय, शेती, सहकार, शिक्षण,साहित्य,नाटय अशा विविध क्षेत्रात त्यांचा वावर होता. डॉ. एन.पी. हिराणी हे एक उत्कृष्ट नाटय अभिनेते सुध्दा आहेत.ही बाब कदाचित काहींना माहिती नसेल. परंतु त्यांच्या वर्तनामध्ये आपल्याला कधीही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

नाटकीपणा दिसून आला नाही. ब-याचदा नाटकामध्ये जे काम करतात ते प्रत्यक्षात बोलायला उठले की, असे काही हातवारे करतात की, त्यांचे ते आपल्याला नाटकच वाटते. परंतु डॉ. हिराणींच्या बाबतीत असे घडलेले मी आणि आपण सुध्दा कधी पाहिले नाही. नाही. डॉ. हिराणी यांचे आयुष्य हे समृध्द अनुभवाचा खजिना आहे. डॉ. एन.पी.हिराणी यांना स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा सहवास मिळाला होता त्यामुळे शेतक-यांच्या प्रती त्यांना अधिक जिव्हाळा वाटत असे. ते शेतक-यांच्या अधिक जवळ गेले होते. कापूस उत्पादक शेतक-यांचे ते नेहमी हित जोपासत असत. परवा मुंबईमध्ये रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त मा. पवार साहेबांची बैठक होती, त्या बैठकीमध्ये त्यांनी मा. पवार साहेबांना सांगितले की, "साहेब कापूस एक्सपोर्ट करण्याची जी तारीख आहे ती वाढवली पाहिजे. त्यावेळी मा. पवार साहेबांनी सांगितले की, देशाचा कृषी मंत्री या नात्याने मी याबाबतीत निश्चितपणे लक्ष घातलेले आहे. मा. डॉ. एन.पी. हिराणी यांच्या अनुभवाचा पुढील काळात आपल्याला निश्चित प्रकारे लाभ होईल अशी आशा बाळगतो.

सभापती महोदय, आपण ज्या जिल्हयातून आलेला आहात त्याच जिल्हयातून मा. विलासराव भाऊसाहेब शिंदे हे सुध्दा आलेले आहेत. मी लहान असतांना पुलोद सरकार अस्तित्वात आले होते. त्यावेळी मा. विलासराव शिंदे हेवाळवा मतदारसंघातून मा. एन.डी.पाटील व मा. राजाराम पाटील यांच्या विरोधात निवडून आले होते. ते मा. एन.डी.पाटील व मा. राजारामबापू पाटील यांना पाडून निवडून आले होते. परंतु मा. पवार साहेबांच्या मंत्रिमंडळात मा. विलासराव शिंदे यांची मंत्री म्हणून निवड झाली नव्हती तर मा. एन.एन.डी. पाटील व मा. राजाराम पाटील यांची मंत्रिमंडळात निवड झाली होती. निवडून आलेले आमदार हे आमदारच राहिले याचे मला त्या वेळेस आश्चर्य वाटले , माणूस निवडून आल्यावरच मंत्री होतो आणि पडल्यावर मंत्री होत नाही असे मला वाटत होते. याबाबतीत मला काही सुध्दा माहिती नव्हती. मी मा. पवार साहेबांना म्हणालो होतो की, मा. विलासराव शिंदे निवडून आलेले असतांना ते मंत्री का झाले नाही व जे निवडून आले नाहीत ते मंत्री कसे काय झाले ?

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

आपण सर्वजण या घटनेचे साक्षीदार आहात. संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणणारे स्व.यशवंतराव चव्हाण तसेच स्व.वसंतदादा पाटील, स्व.राजाराम बापू पाटील अशा दिग्गजांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी विलासराव शिंदे यांना मिळाली. श्री. शिंदे यांनी आता त्यांची तब्येत थोडी व्यवस्थित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. तसे ते रांगडे व्यक्तिमत्व आहे. त्यांचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदान सर्वांना माहीत आहे. ते आष्टा नगरपालिकेचे प्रतिनिधीत्व करतात त्याठिकाणी चांगल्या प्रकारच्या सुधारणा करण्याचे काम केलेले आहे. आधुनिक पध्दतीने शेती करण्याचा त्यांचा छंद सर्वसामान्य शेतकऱ्यांना प्रेरणादायी ठरेल असे मला वाटते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सांगली जिल्ह्याचे अध्यक्ष म्हणून ते यशस्वीपणे जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील व ग्रामविकास मंत्री श्री.जयंत पाटील काम करीत आहेत.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, शिक्षकांच्या विविध प्रश्नावर सातत्याने संघर्ष करणारे व्यक्तिमत्व. प्रा.बी.टी.देशमुख यांच्याप्रमाणे श्री.व्ही.यू.डायगव्हाणे निवडून येतील असे आम्हाला वाटत होते. शेवटी आपण लोकशाहीमध्ये मतदारांचा कौल मानतो.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांचे सभागृहातील कार्य त्यांच्या व्यक्तिमत्वाची प्रचिती देते. शिक्षकांच्या सेवा- शर्ती, वेतन, शाळांना अनुदान मिळणे इत्यादी अनेक विषयांवर त्यांनी सभागृहात विविध संसदीय आयुधांचा अतिशय चांगल्याप्रकारे वापर केलेला आहे हे आपण सर्वांनी पाहिले आहे. विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून शिक्षकांचे प्रश्न धसास लावण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. शिक्षकांबरोबर त्यांनी विद्यार्थ्यांच्या रुपात भावी पिढी घडविण्याचे काम केलेले आहे. ते कबड्डीपटू असल्यामुळे त्यांच्यातील उपजत खिलाडूवृत्ती आपण सर्वांनी पाहिली आहे. शिक्षक, विद्यार्थी आणि कबड्डीपटू यांना भविष्यात देखील त्यांचे मार्गदर्शन मिळेल अशी मला खात्री वाटते.

श्रीमती वंदना चव्हाण यांना या सभागृहात फक्त दहा महिने काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या रुपाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला एक चांगल्या भगिनी मिळाल्या. शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष यांच्या मदतीमुळे त्यांची बिनविरोध निवड झाली होती. त्यांना कमी कालावधी मिळाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

असला तरी त्यांनी मिळालेल्या कालावधीमध्ये उत्कृष्ट काम केलेले आहे. या सभागृहामध्ये त्या असाव्यात अशी आमची इच्छा होती. आतात्या निवृत्त होत असल्या तरी पुन्हा त्यांना या सभागृहात किंवा संसदेत पाठवू यासाठी सन्माननीय ज्येष्ठ मंत्री श्री.छगन भुजबळ, श्री.मधुकरराव पिचड आणि गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील आणि मी असे सर्वजण प्रयत्न करु इतका शब्द मी नक्की देतो. श्रीमती वंदना चव्हाण यांना कमी कालावधी मिळून देखील त्यांनी अतिशय प्रभावीपणे काम केले आणि त्याचा उल्लेख माननीय विरोधी पक्ष नेते यांनी देखील केलेला आहे.

श्रीमती वंदना चव्हाण यांनी ग्लोबल वॉर्मिंगच्या व पर्यावरणाच्या संदर्भात राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांना अतिशय बारकाईने माहिती देण्याचे काम केले आहे. महिला सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या श्रीमती वंदना चव्हाण यांनी पर्यावरण व शहरीकरण संदर्भात सभागृहात उल्लेखनीय मुद्दे मांडलेले आहेत. स्माईल सहेलीच्या माध्यमातून तळागाळातील महिलांना आरोग्य सेवा पुरवित असताना त्यांच्यामध्ये कायदे विषयक साक्षरता निर्माण करण्याचे काम त्यांनी केलेले आहे. त्यांचे हे काम अखंडपणे सुरु राहील. त्यांच्यावर शहराचे अध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची जबाबदारी आहे. त्याठिक्राणी सुध्दा त्या अतिशय चांगले काम करीत आहेत. विविध राजकीय पक्षातून अशा भगिनी विधिमंडळात वा संसदेत आल्या पाहिजेत या मताचे आम्ही सर्वजण आहोत. तेव्हा हा विचार नक्कीच नजिकच्या काळात केला जाईल.

श्री.गुरुमुख जगवानी यांचे आरोग्य क्षेत्रातील कार्य सर्वांनाच ज्ञात आहे. त्याचा उल्लेख माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केला. ते मितभाषी स्वभावाचे आहेत. गोरगरिबांपासून सर्वांनाच नेहमीच मदतीचा हात देणारे अशी त्यांची खानदेशात ओळख आहे. राजकारण त्यांचा पिंड नाही. त्यांनी नेहमीच समाजकारणाला प्राधान्य दिलेले आहे असे आम्हाला ऐकायला मिळाले आहे. समाजकारणा प्रमाणेच त्यांना क्रीडा क्षेत्रात चांगले काम केले आहे. ते उत्तम क्रीडा संघटक आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, ते एका टर्मवर थांबले. अनेकजण वेगवेगळ्या टर्मवर थांबतात.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

श्री.चंद्रशेखर कदम यांना तुम्ही पुन्हा उमेदवारी देत असतांनासुध्दा ते थांबले होते. अशा प्रकारची काही माणसे समाजामध्ये असू शकतात. परंतु ते खरोखर का थांबले याबाबतीत त्यांचे मनच त्यांना सांगू शकेल.

सभापती महोदय, जे सन्माननीय सदस्य निवृत्त होणार आहेत त्यांच्या संदर्भात आज आपण निरोप समारंभाच्या निमित्ताने चर्चा करीत आहोत. इतर काही सन्माननीय सदस्यांना निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांबद्दल आपल्या भावना व्यक्त करावयाच्या आहेत. या सभागृहाने तसेच वेगवेगळया राजकीय पक्षात काम करणा-या सगळयांनी एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की,ज्या पध्दतीने आमदारांकडून राज्यसभेत खासदार निवडले जातात त्यावेळी पक्षाने नेमलेल्या तेथील व्यक्तीला मत दाखवावे लागते तशाच प्रकारे विधान परिषदेमध्ये व्हावे यासाठी कायदा करण्याची गरज आहे.त्या संदर्भात मी आमचे वरिष्ठ नेते आदरणीय श्री. पवार साहेबां बरोबर बोललो आहे.ते मला म्हणाले की, "या बाबतीत दोन्ही सभागृहाने ठराव मंजूर करुन तो दिल्लीला पाठविण्यात यावा त्याचा आम्ही विचार करु." मागे अशा प्रकारचा ठराव दिल्लीला पाठविण्यात आला होता परंतु सहा राज्यातच विधान परिषदा असल्यामुळे ही बाब त्यांनी इतक्या गांभीर्याने घेतली नाही. सुदैवाने आताचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांचे माननीय पंतप्रधान यांच्या बरोबर अतिशय जवळचे संबंध आहेत. ते मुख्यमंत्री झाल्यानंतर राज्यातील अनेक महत्वाचे प्रश्न दिल्लीला मार्गी लावण्याचे काम झालेले आहे.आपल्याला सुध्दा ही बाब गांभीर्याने घेतली पाहिजे. मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, हे सभागृह कोणाकरिता आहे ? वेगवेगळया समाजातील जो दुर्लक्षित असा वर्ग आहे त्याला ख-या अर्थाने प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे.ज्या व्यक्तीला इतर ठिकाणी प्रतिनिधित्व मिळत नाही अशा व्यक्तीला प्रतिनिधित्व मिळावे . कला, क्रीडा, साहित्य, सांस्कृतिक, वैद्यक अशा वेगवेगळया क्षेत्रातील मान्यवरांना प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे यासाठी हे सभागृह आहे.सभापती महोदय, आज ज्या पध्दतीने काही ठिकाणी विधान परिषदेच्या निवडणुका झाल्या आहेत त्या पहिल्यानंतर तुमच्या आमच्या सारखा सर्व सामान्य माणूस निवडून येण्याचे दिवस आता संपले आहे असे दिसून येईल. आज सर्व गोष्टी बाजूला ठेवल्या जातात आणि त्याला सर्वच राजकीय पक्षाचे लोक जबाबदार आहेत. त्याचे कारण असे आहे की, राजकीय पक्षाचे लोक स्वत:च्या पक्षाच्या

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

सदस्यांची संख्या वाढविण्याकरिता इलेक्टीव्ह मेरिट पहात असतात. अशा प्रकारे इलेक्टीव्ह मेरिट पहात असतांना ती व्यक्ती किती खर्च करणार आहे, त्या व्यक्तीचा आवाका किती आहे हे पाहिले जाते. या निवडणुकातील खर्चाचे काही आकडे सांगितले तर ते कोणालाही पटणार नाहीत आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी राजकीय जीवनामध्ये इतकी वर्षे काम केलेले आहे हे संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे.सभापती महोदय, या ठिकाणी मी कोणाचेही नाव सांगत नाही परंतु एका विधान परिषदेच्या निवडणुकीच्या संदर्भात ज्या काही गोष्टी कानावर येतात त्यानुसार या निवडणुंकीमध्ये एवढा खर्च झालेला आहे की त्याचा आकडासुध्दा मी या ठिकाणी सांगू शकत नाही.सभापती महोदय, एकेकाळी तुम्ही ज्यावेळी राजकारणात आला होता त्यावेळी संपूर्ण राज्याच्या निवडणुकीसाठी जेवढा खर्च झाला असेल तेवढा खर्च या एका निवडणुकीसाठी झाला होता. 288 विधान सभा मतदार संघात जेवढया राजकीय पक्षांनी यापूर्वी खर्च केला होता तेवढा खर्च एका मतदारसंघात झाला आहे ही वस्तुस्थिती आहे. केवळ वेळ मारुन नेण्याकरिता किंवा आजचा दिवस पुढे ढकलण्याकरिता आपण सभागृहात आलेलो नाही. पुढच्या पिढीच्या संदर्भातील तुमची आणि माझी देखील काही जबाबदारी आहे.त्यामुळे मी सांगितलेली बाब कोणाला पटो अथवा न पटो, कोणाला कडू वाटो वा गोड वाटो परंतु गट नेते , विरोधी पक्ष नेते , इतर क्षेत्रातील मान्यवर यांनी ही बाब गांभीर्याने घेतली पाहिजे.या संदर्भात कायदा करण्याकरिता केन्द्र सरकारने जर मदत केली तर दुधात साखर पडेल. मग खूपच चांगल्या प्रकारची माणसे निवडून येऊ शकतील. अलीकडच्या काळात महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये सदस्य निवडून देत असतांना किंवा स्वीकृत सदस्य निवडून देत असतांना त्या पक्षाचे ज्या प्रमाणात नगरसेवक निवडून आलेले आहेत त्या प्रमाणात स्वीकृत सदस्यांची नावे त्यांच्या पक्षाचा गट नेता देत असतो व त्यानंतर तो सदस्य होत असतो हे आपणा सर्वांना माहीत आहेच तेव्हा अशा प्रकारे काही करता येईल काय या संदर्भात विधी व न्याय खात्याशी चर्चा करावी लागेल तसेच या क्षेत्राची माहिती असलेल्या निष्णात मान्यवरांशी चर्चा करावी लागेल. या सभागृहातील निवृत्त होणा-या 11 सन्माननीय सदस्यांच्या निरोप समारंभाच्या निमित्ताने या सभागृहाचा नेता या नात्याने जाणीवपूर्वक मी हा मुद्दा उपस्थित करतो.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

सभापती महोदय, भा.ज.प आणि शिवसेना या प्रमुख विरोधी पक्षाला मला मनापासून धन्यवाद द्यावयाचे आहे. त्यांनी यवतमाळ स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक, सातारा सांगली स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक आणि पुणे स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक बिनविरोध होण्याकरता मनाचा मोठेपणा दाखवला व सहकार्य केले .

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

तसेच इतर काही सहकारी मित्रांनी सहकार्य केल्यामुळे तीन सन्माननीय सदस्यांना पुढील सहा वर्षासाठी आपण बिनविरोध निवडून आणू शकलो. थोडेबहुत इतर बाबतीत सुध्दा याच रस्त्याने जाण्याची निश्चितपणे गरज आहे हे या निरोप समारंभाच्या निमित्ताने मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. आणि पुन्हा एकदा या सदनामधून निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना त्यांच्या भावी वाटचालीसाठी आणि त्यांच्या पुढील आयुष्यासाठी त्यांना चांगले आरोग्य लाभावे यासाठी पुन्हा एकदा शुभेच्छा देतो आणि माझे मनोगत संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी याठिकाणी अत्यंत महत्वाची सूचना केली आहे. या पूर्वी सुध्दा या सभागृहामध्ये निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप देत असतांना सन्माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी अशीच एक सूचना केली होती. त्या अनुषंगाने आम्ही या सभागृहाचे दोन ठराव दिल्लीमध्ये केंद्रीय मंत्र्यांकडे पाठविले असून त्यादृष्टीने आमच्यापरीने प्रयत्न सुरु आहेत. यापूर्वी राज्यसभेच्या निवडणुकीसाठी स्वर्गीय श्री.शंकररावजी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली होती. त्या समितीने विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने थोडासा स्पर्श केला होता, परंतु नंतरच्या काळात तो विषय प्रलंबित राहिला.

आज सुध्दा मी आपणास विनंती करतो की, आमच्यापरीने मी देखील याकरीता प्रयत्न करीत असून आपण सुध्दा याबाबत लक्ष देण्याची गरज आहे. आज राज्य सभेच्या निवडणुकीच्यावेळी संबंधित उमेदवाराला मतदान केल्यानंतर ती मतपत्रिका प्रत्येक राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीला दाखवावी लागते व त्यानंतर ती पेटीत टाकली जाते. तशाप्रकारची तरतूद विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या निमित्ताने आपल्याला करुन घेणे गरजेचे आहे, व त्यासाठी आपण पाठपुरावा करणे गरजेचे आहे. अन्यथा माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे विधानपरिषदेच्या निवडणुकीचा खर्च केवळ एका जिल्हयामध्ये जवळ जवळ 100 कोटीपर्यंत सुध्दा होतो. तशाप्रकारचे वृत्त काही वर्तमानपत्रांमध्ये किंवा अन्य माध्यमांव्दारे आपणास पहावयास मिळते. तेव्हा ही अनिष्ठ प्रथा जर आपणास रोखावयाची असेल तर त्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे, व ते लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, भविष्यात या विधिमंडळामध्ये कुणी कशाप्रकारे यावे या चर्चेच्या पार्श्वभूमीवर या सभागृहामधून निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्यासाठी मी उभा आहे. याठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार साहेबांनी फार महत्वाचे भाष्य केले आहे. त्यावर मी नंतर बोलणार आहे. आमच्या मनातील खदखद आपल्या माध्यमातून बाहेर निघाली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम हे आमच्या मराठवाडयातील असून त्यांचा व माझा गेल्या पंधरा वर्षाचा परिचय आहे. शैक्षणिक क्षेत्रामध्ये सर्वत्र बुलंद व्यक्तिमत्वे उभी राहिली. परंतु माननीय श्री. कमलबाबूंच्या रुपाने शिक्षण क्षेत्रामध्ये आमच्या मराठवाडयामध्येही एक बुलंद व्यक्तिमत्व उभे राहू शकले. या निवडणुकीपूर्वी वाढदिवसाचे निमित्त साधून मी त्यांना फोन केला होता. मी त्यांना विचारले होते की, बाबूजी तुम्ही परत येत आहात ना? परंतु मला नंतर समजले की, त्यांची जागा राष्ट्रवादी कॉंग्रेसने राष्ट्रीय कॉंग्रेसला सोडल्यामुळे त्यांच्या सारख्या ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांचे मार्गदर्शन या सदनामध्ये आम्हाला मिळणार नाही हे आता आम्हाला जाणवत आहे. सभापती महोदय, प्रवाहाविरुध्द पोहणे फार कठीण असते, परंतु प्रवाहाबरोबर कुणीही पोहू शकतो. माननीय कमलबाबू सभागृहातील सर्वच चर्चामध्ये भाग घेत नसत. परंतु ज्यावेळी ते चर्चेमध्ये भाग घेत असत त्यावेळी तुम्हा-आम्हाला अडचणींचा वाटणारा विशिष्ट मुद्दा कुणाचाही मुलाहिजा न ठेवता, कुणी नाराज होत आहे किंवा नाही याची पर्वा न करता तेवढयाच रोखठोक पध्दतीने मांडण्याची त्यांची वेगळी खासियत आम्ही अनुभवित होतो. नेहमी त्यांच्या बोलण्यातून व्यथा जाणवत असे. आम्ही आमच्या भाषणामध्ये नेहमी म्हणत असतो की, उद्ध्वस्त शेतकऱ्याचे जीवन नेहमी उद्ध्वस्त असते. परंतु पगारदाराचे जीवन अगदी व्यवस्थित असते, जगबुडी होवो, मोठा पाऊस पडो, काहीही होवो त्याला काहीही चिंता नसते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

ते सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांच्या वक्तव्यावरुन आम्हाला नेहमी जाणवत असे.आजही त्यांचा मराठवाड्यामध्ये प्रचंड कामाचा व्याप आहे. यामुळे आता निवृत्तीनंतर त्यांच्यासमोर काही काम नाही असे नाही, तर उलट आता त्यांना त्यांच्या संस्थेच्या कामकाजामध्ये अधिक जोमाने भाग घेता येईल. मी त्यांना आदरपूर्वक शुभेच्छा देत आहे.

सभापती महोदय,आम्हाला असे वाटावयाचे की, या सदनामध्ये एक पाकिस्तानी नागरीक बसतो की काय ? पण आमचे सन्माननीय सदस्य श्री.गुरुमुख जगवानी आज येथे आहेत.आता ते हिंदुस्थानी आहेत आणि ते वदविण्यासाठीच मी असे म्हणालो आहे.मी त्यांच्याबाबत जास्त काही बोलणार नाही कारण ते आता भारतीय जनता पक्षाचे सक्रीय सदस्य, खजिनदार असे सगळे काही आहेत. मात्र यावेळेस ते नक्की निवडून येतील याची मला खात्री होती. कारण गेल्या वेळेस विरोधी पक्षनेते पदाच्या शर्यतीत त्यांच्या एका मतामुळे आम्हाला खाली बसावे लागले होते.सन्माननीय सदस्य श्री.गुरुमुख जगवानी अपक्ष म्हणून उभे रहातात की नाही हे पहाण्यासाठी मी स्वत: मुद्दाम गेलो होतो.पण मला असे कळले की, सन्माननीय सदस्य श्री.गुरुमुख जगवानी हे आता पक्षाच्या म्हणजे कमळाच्या निशाणीवर निवडणूक लढविणार आहेत. मी म्हटले की, हरकत नाही. जर ते अपक्ष म्हणून उभे राहिले तर यावेळेस त्यांना वाव द्यावयाचा नाही. मी मुद्दाम पहावयास गेलो होतो. तोपर्यंत निवडणूक झाली होती, पुढे काय झाले ते मला कळले नाही.परंतु आज आम्हाला सन्माननीय सदस्य श्री.गुरुमुख जगवानी यांना निरोप द्यावा लागत आहे याचे थोडे आश्चर्य वाटत आहे. तरीही सन्माननीय सदस्यांच्या कामाचा व्याप, त्यांचा व्यवसाय आणि पक्षाचे काम प्रचंड आहे. त्यामुळे कदाचित पक्षाला असे वाटले असेल की, त्यांना विधान परिषदेमध्ये अडकविण्यापेक्षा पक्षाच्या कामामध्ये लक्ष घालावे. म्हणून पक्षाचे काम हिरिरीने करण्यासाठी मी सन्माननीय सदस्यांना पुन्हा एकदा शुभेच्छा देतो.

श्री.अजित पवार (खाली बसून) : ब्लड रिलेशन पुढे आले की, नेत्यांचे असेच होते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन हे पुन्हा सदनामध्ये आपल्या सर्वांबरोबर बसणारच आहेत. मी त्यांचे स्वागत करतो.

सभापती महोदय, श्री.विलासराव शिंदे हे सदनामध्ये फक्त शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत बोलत असत. बाकी त्यांनी कोणत्याही विषयांवरील चर्चेमध्ये भाग घेतला नाही. सभागृहाच्या बाहेर लॉबी ..

. . . .2 वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्ये बसून ते शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत भरभरुन बोलत असत. माझा त्यांच्याशी समितीच्या कामा निमित्ताने तसेच प्रवासाच्या निमित्ताने संबंध आला आणि त्यावेळी माझी वहिनींशी भेट झाली. मग मला सन्माननीय सदस्य श्री.विलासराव शिंदे यांचे सामर्थ्य कळले. पुरुषाच्या कर्तृत्वामागे एक स्त्री असते असे आपण नुसते म्हणतो, पण मी ते खऱ्या अर्थाने अनुभविले आहे.परदेशामध्ये मृत्यूशी झुंज देणाऱ्या व्यक्तीला वहिनींनी तेथून मुंबईपर्यंत आणले आणि पुन्हा एकदा त्यांना मृत्यूच्या फासातून बाहेर काढून उभे केले आणि ते परत आपल्या सदनामध्ये सन्माननीय सदस्य म्हणून आले. मघाशी याठिकाणी त्यांच्या कार्यातील लढाईचा जो उल्लेख केला, ती वेगळी पण मी त्यांच्या जीवनातील लढाई सुध्दा पाहिलेली आहे.मला सन्माननीय सदस्य श्री.विलासराव शिंदे यांच्यापेक्षा नेहमी वहिनींना भेटावयास पाहिजे असे वाटते. कारण त्यांनी जो पाठिंबा दिलेला आहे, तो मी अनुभवला, पाहिला आहे. या सदनामध्ये एक अस्सल हाडाचा शेतकरी सदस्य म्हणून काम करीत आहे याचा आम्हाला अभिमान होता. याठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी सांगितले त्या प्रमाणे ते नेहमी शेतीच्या नवीन-नवीन प्रयोगाबाबत बोलत असावयाचे. ते मला सतत पहाणीसाठी बोलवतात. पण मला जाता आले नाही. मला नेहमी वाटते की, आपण तेथे जावे. पण मघाशी असे सांगण्यात आले की, माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील आणि माननीय ग्रामविकास मंत्री श्री.जयंतराव पाटील त्यांचे नेतृत्व करीत असल्याने आता त्यांना शेतीत लक्ष घालावयास मिळते की त्यांचे नेतृत्व सांभाळावे लागते हे कळलेले नाही. याबाबतीत मला प्रश्न पडलेला आहे. मी आता पुढचे बोलत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी हे यवतमाळ मधील आहेत. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार बोलताना चांगले बोलले. मला त्यांचा परिचय आहे. ते कलाकार आहेत हे माहिती आहे. पण त्यांच्या जीवनामध्ये नाटकीपणा कधीच नव्हता म्हणजे लोकांना सांगावे लागेल की, सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी हे नाटकामध्ये काम करीत होते. पण माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार बोलताना पटकन म्हणाले की, काही लोक कायम नाटकीपणे बोलत असतात.पण सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी हे कधीही अशा प्रकारे बोलले नाहीत.माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ साहेब, तुम्ही कशासाठी हसत आहात. मी सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी यांच्याबद्दल बोलत आहे. पण माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांना अशा प्रकारे ठासून सांगावेसे का वाटले ? हे मला कळले नाही.

अशुद्धीत प्रत / मुद्रणेसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

डॉ. हिराणी यांचे अजातशत्रू असे व्यक्तिमत्व आहे. यवतमाळमध्ये डॉ. हिरांणी यांचा द्वेष कोणीही करीत नाही. डॉ. हिराणी निवडणुकीसाठी उभे राहिल्यानंतर त्यांना मत का द्यावयाचे नाही हाच प्रश्न पडतो. फक्त पक्षीय अडथळे असतात. डॉ. हिराणी मला जे भावले ते असे आहेत. पणन महामंडळाचे अध्यक्ष असताना कापूस उत्पादक शेतकऱ्याकरिता तेथे बसून न्याय देता येत नाही म्हणून ते या सभागृहात उभे राहून भांडायचे. कधी कधी असे वाटायचे की, ते पक्षद्रोह करीत आहेत की,काय? आपल्या पदाचा द्रोह करीत आहेत की काय? पण त्यांना असे जाणवत होते की, मी सत्तेमध्ये आहे मी पणन महामंडळाचा अध्यक्ष आहे तरी देखील मी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देऊ शकत नाही. श्री. हर्षवर्धन पाटील हे पणन मंत्री असताना कापूस खरेदीचे तिकडे नाटक चालायचे. डॉ. हिराणी कापूस खरेदी जाहीर करायचे, उद्यापासून कापूस खरेदी करणार असे पत्रकार परिषद घेऊन सांगायचे पण कापूस खरेदीच्या मुहुर्ताच्या वेळी फक्त एक-दोन किलो कापूस यायचा त्यानंतर कापूस येत नव्हता. एक-दोन किलोची कापूस खरेदी करणारा पणन मंडळाचा अध्यक्ष असे दोन-तीन वर्षे डॉ. हिराणींना अनुभवावे लागले. पण तरीही डॉ. हिराणी जिद्दीने शेतकऱ्यांकरिता भांडत होते आणि त्यांच्या स्वभावाप्रमाणे ते उद्याही शेतकऱ्यांकरिता भांडणार आहेत. विदर्भातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने हे फार मोलाचे आहे. डॉ. हिराणी आपण या सभागृहातून निवृत्त होत असलात तरी आमच्याकरिता तुम्ही तेथे निवृत्त नाहीत. शेतकऱ्यांच्या लढयामध्ये आमच्याबरोबर तुम्ही आहात ही आमची भावना लक्षात घ्यावी. या सभागृहातून निवृत्त होत असताना आमच्या शुभेच्छा आहेतच पण आम्हाला शेतकऱ्यांच्या लढयामध्ये आपले संपूर्ण सहकार्य लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करतो. डॉ. हिराणी, आपण खूप संस्थांमध्ये काम करत असतांना देखील या सभागृहासाठी वेळ देता हे फार मोलाचे आहे. डॉ. हिराणी काम करीत असलेल्या संस्थांच्या नावाची यादी फार मोठी आहे. डॉ. हिराणी हे पुसद नगरपालिकेचे नगराध्यक्ष होते तसेच ते राज्य मंत्री देखील होते. डॉ. हिराणी यांना मी या ठिकाणी शुभेच्छा देऊ इच्छितो. आम्हाला पुढच्या लढयासाठी आपली गरज आहे. सरकारच्या विरोधासाठी नाही तर शेतकऱ्यांसाठी आपली गरज आहे. त्यादृष्टीने आपण आम्हाला उपलब्ध व्हाल आणि आपले मार्गदर्शन आम्हाला लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे हे श्री. वसंतराव काळे यांचे चिरंजीव आहेत. ते पुन्हा या सभागृहात निवडून आल्याबद्दल आम्हाला आनंद होत आहे. ते चांगल्या मताने निवडून आलेले आहेत. ते प्रामाणिकपणे या सभागृहात प्रश्न मांडत असतात. मी त्यांचे याठिकाणी स्वागत करतो.

सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे हे निवडणूकीत पडले याचे आम्हाला आश्चर्य वाटते. ते निवडणुकीत पडणार नाहीत याची खात्री होती. प्रा. बी.टी. देशमुख आणि श्री. व्ही.यू. डायगव्हाणे यांच्या पाठीमागे नुटाचे सामर्थ्य होते. पण दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ ही म्हण सत्यात उतरली. दुर्दैवाने श्री. डायगव्हाणे यांच्या सारख्या शिक्षकांच्या सच्चा समर्थकाला आपण मुकणार आहोत. एकलव्यासारखे त्यांचे काम होते. एवढेच प्रश्न आणि एवढयाच प्रश्नावर बोलणार. बाकीच्या प्रश्नाबद्दल मला काही देणे-घेणे नाही. एकलव्यासारखे शिक्षकांचे प्रश्न सोडवून घेत होते आणि शिक्षकांना 100 टक्के दिलासा देत होते. आम्ही टीका करावयाचो, आता हे बॅग उचलून सभागृहातून निघून जातील. पण त्यांचे धोरण ठरलेले होते. टीका करा, निंदा करा, बोला, कोणी निंदा, कोणी वंदा, आमचा शिक्षकांच्या हिताचा धंदा. आम्ही येथे सांभाळणार. आम्ही त्या करिताच या सभागृहात येतो. शिक्षक आम्हाला निवडून देतात. बाकीचे काही देणे-घेणे नाही. शिक्षकांच्या हिताचे काम त्यांनी प्रामाणिकपणे केले. म्हणून त्यांचे कौतुक करावेसे वाटते. पण त्यांची उणीव कोण भरुन काढणार असा प्रश्न येथे निर्माण होऊ नये अशा पध्दतीने त्यांच्या जागेवर येणाऱ्या सन्माननीय सदस्यांने काम करावे अशा प्रकारची अपेक्षा मी या ठिकाणी व्यक्त करतो. सन्माननीय सदस्य श्री. सोनवणे आहेतच. पण सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांचे खानदेशातील विषय असायचे. सन्माननीय सदस्य श्री. सोनवणे हे इतर भागात लक्ष घालतात. सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे तीन टर्म या सभागृहात होते. चांगले काम करीत होते. त्यांच्याकडून बऱ्याच अपेक्षा होत्या त्या अपेक्षा आता इतर शिक्षक पूर्ण करतील आणि त्यांची उणीव भरुन काढतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. श्री. डायगव्हाणे हे वर्धा जिल्हा काँग्रेस कमिटीचे एकेकाळी अध्यक्ष होते. म्हणजे ते काँग्रेस पक्षाचेच होते पण या ठिकाणी लढताना ते अपक्ष म्हणून लढायचे, शिक्षकांकरिता लढायचे. श्री. डायगव्हाणे यांची या सदनामध्ये उणिव नक्कीच जाणवणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते पुन्हा एकदा या सभागृहात निवडून आलेले आहेत. ते युतीचे सदस्य आहेत अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि त्यांचे स्वागत करतो.

यानंतर श्री. बरवड.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांच्याबद्दल आपण सगळे भरभरुन बोलू शकतो. खऱ्या अर्थाने त्यांच्या बाबतीत या सभागृहामध्ये एक प्रकारची पोकळी किंवा व्हॅक्युम जाणवेल. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख हे या सभागृहातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व होते. त्यांच्याबद्दल आम्ही काही बोलावे इथपर्यंत आमचा अधिकार आहे की नाही, हे मला माहीत नाही. सातत्याने पाच टर्म ते या सभागृहामध्ये होते. ते नुसतेच या सभागृहामध्ये होते असे नाही. त्यांची बांधिलकी कोणत्याही पक्षाशी किंवा कोणत्याही विचाराशी नव्हती. विदर्भाच्या अनुशेषाच्या संदर्भात आम्ही जी सर्वपक्षीय अनुशेष समिती नेमली होती त्या समितीचे अध्यक्ष सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख होते. ते त्या समितीचे नेतृत्व एवढ्या कडवटपणे करावयाचे की, कोठे तरी आमचे एकमेकांचे राजकीय अभिनिवेश असावयाचे. सर्व पक्षांना विदर्भासाठी लढत असमाना मराठवाड्याचे काय होईल, मराठवाड्याच्या बाबतीत लढत असताना पश्चिम महाराष्ट्रतील आमच्या पक्षातील लोक काय म्हणतील, यामुळे थोडा तरी निर्बंध असावयाचा. पण सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख हे फक्त विदर्भाच्या लढ्याकरिता समर्पित भावनेने लढावयाचे. अमरावती हा सर्वात जास्त अनुशेष असलेला भाग होता. त्या भागाकरिता त्यांनी जो लढा दिला तो प्रचंड होता. विनियोजन विधेयकावर उपसूचना मांडणे आणि तांत्रिकदृष्ट्या ती मंजूर करुन घेऊन या सरकारला झुकावयास लावून विधानसभेचे अधिवेशन घ्यावयास लावणे ही जी किमया या सभागृहामध्ये झाली ती सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांच्या कौशल्याची होती हा एक इतिहास आहे. या सदनामध्ये एखादा सदस्य आपल्या कर्तृत्वावर आणि बुध्दिमत्तेवर एखादी गोष्ट कशी निर्माण करतो याची चुणूक सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख होते. ते आमच्या बरोबर अनेक विषयांवर बोलावयाचे तसेच शिक्षकांच्या विषयावर बोलावयाचे परंतु त्याचवेळेला संत गाडगेबाबा आणि संत तुकडोजी महाराज यांच्या बाबतीत ते भावनाविवश होऊन बोलावयाचे. त्यांनी आय कोट म्हणून एकदा सुरुवात केली आणि 25 मिनिटे फक्त गाडगे बाबांचे अस्खलित भाषण त्यांच्या भाषेमध्ये या ठिकाणी उदधृत केले, ते मी माझ्याकडे संदर्भ म्हणून काढून ठेवले आहे. 25 मिनिटे त्यांनी संत गाडगे बाबाचे भाषण त्यांच्याच भाषेमध्ये त्यांच्या पध्दतीने बोलून दाखविले. असे सन्माननीय सदस्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

प्रा. बी. टी. देशमुख या सभागृहामध्ये नसणार आहेत. मला आठवते की शिक्षकांच्या एका लढ्यामध्ये शासनाने मान्यता देऊन सुध्दा अधिकारी मान्यता देत नव्हते त्यामुळे त्यांनी विदर्भामध्ये मोठा लढा उभा केला होता तसेच आपल्याकडे त्यांनी फॅक्सव्दारे त्यांचा राजीनामा पाठविला होता. फॅक्सव्दारे आलेला त्यांचा राजीनामा आपण अस्वीकृत करुन त्यांच्या सदस्यत्वाचा सन्मान ठेवला त्याबद्दल मी आपले आभार मानतो. ते आमदार नसल्यामुळे एकच उणीव भासणार आहे. सोफियाच्या विरोधामध्ये त्यांचा जो तीव्र लढा चालू आहे त्यामध्ये थोडासा पांगुळपणा येईल. कारण आमदार म्हणून त्यांचे जे सामर्थ्य होते ते त्या ठिकाणी वापरत होते. सोफियाच्या विरुध्दचा लढा हा गंभीर लढा आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांचा पराभव हा सोफियाच्या सामर्थ्यामुळे झाला. एका भांडवलदाराने या सभागृहातील एका प्रामाणिक, सच्च्या सदस्याचा पराभव करणे ही चांगली बाब आहे असे मला वाटत नाही. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांचा मी मनापासून आदर करीत होतो आणि ते या ठिकाणी असो किंवा नसो मी कायम त्यांचा आदर करीत राहीन. ज्यावेळी मी तिकडे जातो तेव्हा सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांना भेटणे हे माझे नेहमीचे काम असते त्याप्रमाणे त्यांना मी अवश्य भेटत जाईन.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे या सभागृहामध्ये परत आले.त्याबद्दनल मी त्यांचे मनापासून स्वागत करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण यांची आठ दहा महिन्यांची कारकीर्द होती. आता माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, त्यांचे भविष्य फार मोठे आहे. त्यामुळे बाकीचे सदस्य विचारात पडले. त्यावेळी बाकीच्या सदस्यांचे चेहरे मी बघत होतो. माननीय उप मुख्यमंत्री म्हणाले मी एकदा त्यांना संसदेत पाठवीन आणि त्यांचा सन्मान ठेवीन. सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण ज्यावेळी महापौर झाल्या त्यावेळी मी मराठवाड्यामध्ये होतो. त्या महापौर झाल्यानंतर वृत्तपत्रात छापून आले. त्यांचे जे हसणे होते त्या हसण्यामध्यें मला प्रामाणिकपणा दिसला. महापौर म्हणून त्यांचे इतके सुंदर हसणे होते. मी त्यांना ओळखत नव्हतो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

पण त्या महापौर झाल्यानंतर फोन करुन त्यांचे अभिनंदन केले. या सभागृहात आल्यानंतर त्यांनी मला आठवण करुन दिली की, आपण माझे अभिनंदन केले होते. त्यांच्या महापालिकेच्या वतीने त्यांनी 'स्माईल' नावाची संस्था सुरु केली. 'स्माईल' म्हणजे सावित्री मार्केटिंग इन्स्टिट्यूट फॉर लेडीज एम्पॉवरमेंट. त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य म्हणजे संस्थेचे स्माईल. पुढे जाऊन त्यांनी स्माईल सहेलीचे काम केले. त्यांचे ते वैशिष्ट्य होते. पर्यावरण या विषयावर आम्ही त्यांना आग्रहाने सांगता होतो की, या विषयावर आपणच बोलावे. तो विषय त्या अभ्यासपूर्ण पध्दतीने मांडावयाच्या. आम्हाला जे माहीत नाही ते बारकावे त्या आम्हाला सांगत असत. अशी भूमिका घेणारी भगिनी या ठिकाणी असणे आम्हाला आवश्यक वाटत होते. बाकी पक्षाचा प्रश्न येत नाही. कारण त्यांना वेगळ्या विषयाचे ज्ञान होते. पण या ठिकाणी त्यांच्या बाबतीत भाष्य केले गेले असल्यामुळे मी बाकीचे भाष्य करण्याचा प्रश्न येत नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्यांच्या ज्ञानाचा, बुध्दिमत्तेचा लाभ आम्हाला अल्पकाळ लाभला आहे. मी या सर्वांना मनापासून शुभेच्छा देतो. कोणाचेही राजकीय जीवन थांबत नसते. काम करणाऱ्यांना ते कधीच थांबविता येत नाही. समाजात सक्षमपणे काम करीत असताना त्यांच्याकडे जे काही देय असेल ते देय समाजाला देत असतात.

सभापती महोदय, एका महत्वाच्या मुद्यासंबंधी आमच्या मनामध्येही सल आहे. यापुढील काळात या सदनामध्ये सामान्य माणूस येऊ शकत नाही, पैसेवालेच या सदनाचे सदस्य होतील असे आम्हाला वाटू लागले आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी बोलताना असे म्हटले की, या निवडणुकीत एका उमेदवाराने 100 कोटी रुपये खर्च केले. ही हिडीस भूमिका यावेळी बघावयास मिळाली. मागच्या वेळी आपण अशाच कार्यक्रमामध्ये बोलत असताना काही सदस्यांचा परिचय करुन दिला, परंतु स्वागताचे भाषण केले नाही. यावेळी कोल्हापूरमध्ये या निवडणुकीच्या वेळी जे काही घडले ते टी.व्ही.च्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र बघत होता. तू किती पैसे दिले, मी किती पैसे दिले, या हरामखोराने माझे खाल्ले पण मत मात्र तुला दिले, त्यामुळे तू माझा गुरु आहेस, तू माझा चेला आहेस, असे संवाद दाखविले गेले, विधानपरिषदेच्या निवडणुकीचे धिंडवडे टी.व्ही.च्या माध्यमातून सर्व लोक पहात होते. म्हणून शासनाने विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या संदर्भात काही दिवसांपूर्वी जो निर्णय घेतला आहे त्याबाबतचा ठराव सभागृहात मांडावा. त्याप्रमाणे येथे घडले पाहिजे. विधानसभेतून विधानपरिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांच्या निवडणुकीच्या वेळी जो निर्णय घेतलेला आहे त्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे मागील निवडणुकीत काय घडले ते तुम्हाला आणि आम्हाला माहीत आहे. ते करावे लागते, परंतु क्लेशदायक आहे. म्हणून तो ठराव तातडीने येथे यावा अशी अपेक्षा व्यक्त करतो. या सदनाची एक गरीमा आहे, एक सन्मान आहे. तो सन्मान येथे निवडून येत असताना त्याच्या भोवती असावा अशाप्रकारचे जे विचार माननीय उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले आहेत त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. पुन्हा एकदा सर्व सन्माननीय सदस्यांना शुभेच्छा देतो, धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, या सदनाचे 11 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. त्यांना निरोप देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी, सभागृहाच्या सन्माननीय नेत्यांनी, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

सभापती महोदय, या 11 सदस्यांपैकी सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते आणि सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे हे पुन्हा या सदनात निवडून आलेले आहेत. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. आपल्या चांगल्या कामाने या सदनाच्या लौकिकामध्ये ज्यांनी भर घातली असे सन्माननीय सदस्य या सदनातून निवृत्त होत आहेत. त्यांनी लोकशाहीत आपल्या परीने सेवा केली आहे. या सर्व सन्माननीय सदस्यांबद्दल मी कृतज्ञताही व्यक्त करतो.

सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आहेत. माननीय श्री.शरद पवार साहेब यांच्या जवळचे सहकारी आहेत. त्यांचे शिक्षण क्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील काम उभ्या महाराष्ट्राला माहीत आहे. त्यांच्या सारखे अनुभव संपन्न सदस्य पुन्हा या सदनात येऊ शकले असते तर आम्हाला आनंद झाला असता. ते पुन्हा या सदनात का येऊ शकले नाहीत त्याचा उल्लेख काही सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणातून केला आहे. काही वेळा राजकीय परिस्थिती सुध्दा एखादा निर्णय होण्यासाठी योग्य पध्दतीने यावी लागते. सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम आणि या निवडणुकीकडे पाहिले तर राज्यामध्ये जे राजकीय स्थित्यंतर झाले ते जर दोन महिन्यापूर्वी झाले असते तरीही सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम पुन्हा येऊ शकले असते किंवा ही निवडणूक जर दोन महिने उशिराने इ ाली असती तरी ते या सदनामध्ये येऊ शकले असते. अनेक वेळा कर्तृत्व असले तरी परिस्थिती यावी लागते. परंतु एकंदरित लोकशाहीतील त्यांचे काम, त्यांचा अनुभव पाहता या सदनामध्ये किंवा अन्य सदनामध्ये ते प्रतिनिधीत्व करीत राहतील याबद्दल माझ्या मनामध्ये निश्चित खात्री आहे.

सन्माननीय सदस्य श्री.गुरुमुख जगवानी आणि विधानसभेचे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.एकनाथराव खडसे यांना एकमेकापासून वेगवेगळे पाहिलेले नाही. एकाला पाहिल्यानंतर दुसरे कोठे आहेत असे विचारण्याचा कधी प्रसंग आला नाही. त्यांनी नेहमी सावलीसारखी माननीय श्री.खडसे साहेबांना साथ दिली आहे. शेवटी रक्ताची नाती श्रेष्ठ ठरतात, आपण मनाचा मोठेपणा दाखविला, अनेक वेळा लोकशाहीत अनेकांना आपण कोठे थांबायचे हेच कळत नाही.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पण आपल्याला ते अचूकपणे कळले. रक्ताची नाती महत्वपूर्ण असतात हे जे आपल्याला कळले ते लवकर कळले हे मी मानेन. तसे पाहिले तर त्या मतदारसंघातील निवडणूक पुन्हा पुन्हा लढण्यासारखी परिस्थिती नाही हेही सा-या महाराष्ट्राला माहीत आहे. त्यामुळे त्यांनी त्यांच्या जीवनात एक चांगला अनुभव घेतला. कुठूना ना कुठून त्यांनी याठिकाणी यावे अशा शुभेच्छा मी त्यांना देतो.

सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे यांच्या बाबतीत बोलत असताना मी सांगेन की राज्याच्या राजकारणामध्ये मी अशी अनेक व्यक्तिमत्वे बघितलेली आहेत की ज्यांना सहजा सहजी पदे मिळतात आणि तीही एका पाठोपाठ एक मिळतात. पण काही व्यक्तिमत्वे अशी असतात की त्यांना खूप तपश्चर्या केल्या शिवाय, खूप कष्ट केल्या शिवाय पद मिळत नाही. सांगली जिल्ह्याच्या राजकारणातील श्री. विलासराव शिंदे हे अशा स्वरुपाचे व्यक्तिमत्व आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी अचूक उल्लेख केला की त्यांनी निवडणुकीमध्ये ज्या दोघांना पराभूत केले होते ते दोघेही कॅबिनेट मंत्री होते आणि हे फक्त आमदार होते. माझे आणि त्यांचे विशेष जिव्हाळ्याचे संबंध होते. जीवनामध्ये ब्रेक देण्यासाठी कुणी तरी असावे लागते. सांगली जिल्ह्यामध्ये श्री. विलासराव शिंदे साहेबांनी अनेक कार्यकर्ते तयार केले. ज्यावेळी माझ्याकडे काहीही नव्हते त्यावेळी मोठ्या धाडसाने जिल्हा परिषदेची पहिली उमेदवारी त्यांनी मला दिली होती. आज मी येथे येण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. ही कृतज्ञता मी कधीही विसरु शकणार नाही.

सन्माननीय सदस्य डॉ. एन.पी.हिराणी हे पेशाने डॉक्टर. स्व. वसंतराव नाईक, स्व. सुधाकरराव नाईक यांच्या तालमीत तावूनसुलाखून तयार झालेले हे नेतृत्व. जातीय सलोखा सांभाळण्याच्या बाबतीत, सहकार चळवळ चालविण्याच्या बाबतीत आणि विशेषत: कापूस उत्पादक शेतक-यांसाठी त्यांनी खूप मोठे योगदान दिलेले आहे.

सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे हे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख सरांच्या बरोबर शिक्षकांच्या प्रश्नावर नेहमी जिद्दीने लढत राहिले हे सभागृहाने अनुभवले आहे. सभापती महोदय, मी आज प्रामुख्याने प्रा.बी.टी. देशमुख सरांच्या संबंधी माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी उभा आहे. मी जिल्हा परिषदेचा सदस्य असताना वर्तमानपत्रात येणारे त्यांचे नाव वारंवार वाचत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

होतो. जिल्हा परिषदेचा सदस्य असताना मुद्दाम त्यांची भाषणे ऐकण्यासाठी विधानपरिषदेच्या प्रेक्षक गॅलरीमध्ये सलग तीन दिवस मी थांबल्याचे मला आजही आठवतेय. मी मंत्री म्हणून दोन्ही सदनाचे अनुभव घेतले. शिक्षकांच्या प्रश्नावर ग्रामविकास मंत्री असताना या सदनामध्ये येताना जितका अभ्यास करुन यायला लागत होता तेवढा तो कधीही करावा लागला नाही. प्रा. बी.टी.देशमुख सर हे कोणता उपप्रश्न कधी काढतील आणि कोणत्या प्रश्नावर सरकारने कधीकाळी काय उत्तर दिले होते हे सांगून सरकारला कसे अडचणीत आणतील याचा नेम नसे. या सभागृहामध्ये कशा पध्दतीने काम करायचे हे प्रा.बी.टी.देशमुख यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. त्यांची मते परखड होती. विदर्भाच्या संदर्भात त्यांच्या भावना आणखी तीव्र होत्या. आज ते निवडून आलेले नाहीत. पराभव त्यांचा झाला, त्यांनी स्वीकारलेल्या मूल्यांचा झाला, की पराभव आपल्या व्यवस्थेचा झाला ? या प्रश्नाचा अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. मनाला चटका लावण्यासारखा त्यांचा पराभव आहे. या सदनाला त्यांची उणीव सातत्याने भासत राहील.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी जे मत व्यक्त केले तेच मत 4 वर्षापूर्वी मी या सदनामध्ये व्यक्त केले होते. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचे भाषण देखील शांतपणे ऐकले आणि वर्तमानपत्रातील काही संकलने देखील वाचली. प्रा. बी.टी.देशमुख सरांच्या पराभावाबाबत प्रसार माध्यमांनी जी अनेक कारणे सांगितली त्याला विरोधी पक्षनेत्यांनी देखील दुजोरा दिला. सोफीयाची ताकद देखील त्यांच्या विरुध्द गेल्या सारखी वाटत होती. जी शंका वर्तमानपत्रवाल्यांना आली तीच शंका या सदनाच्या माननीय विरोधी पक्षनेत्यांना येत असेल आणि जनता त्यावर विश्वास ठेवत असेल तर लोकशाहीमध्ये काम करणा-या कार्यकर्त्याने आता कुठेतरी विचार करण्याची आवश्यकता आहे की, जर पैशाच्या जोरावर कॉन्ट्रॅक्टर, उद्योगपती राजकारणासाठी आयुष्य देणा-या कार्यकर्त्याला पराभूत करु शकत असतील तर कोणती मूल्ये शिल्लक राहतील ? सभापती महोदय, मी चार वर्षापूर्वी या सदनामध्ये काही सुधारणा सुचविलेल्या होत्या. आज माननीय उप मुख्यमंत्र्यांनी पुन्हा त्याच सुधारणा मांडलेल्या आहेत. पिपल्स रिप्रेझेण्टेटिव्ह ॲक्टमध्ये दुरुस्ती करण्यासाठी, घटनात्मक बदल करण्यासाठी देशातील 1/10 राज्यांनी मान्यता दिली पाहिजे. ही गोष्ट विचारात घेतली तर मग देशातील फक्त 6 राज्यामध्ये विधानपरिषदा आहेत. त्यामुळे बाकीच्या राज्यांना याच्या झळाच बसत नाहीत. त्यामुळे पुढाकार

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आरा.पाटील...

घेऊन याबाबतीत कायदा करण्याची त्यांना आवश्यकता नाही. म्हणून देशात जितक्या राज्यामध्ये विधान परिषदा आहेत त्याच्या 1/10 राज्यांनी मागणी केली तर संसदेने त्याबाबतीत विचार केला पाहिजे आणि कुठे ना कुठे राजकारणामध्ये जात, धर्म आणि पैसा हे ह्या ज्या गोष्टी मोठ्या बनत चालल्या आहेत त्यांच्यावर नियंत्रण आणले पाहिजे.

....नंतर श्री. भोगले.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, मी ज्यांचा किस्सा सांगणार आहे त्यांना मीही ओळखतो आणि आपणही ओळखता. आज दिवसा जर बाजार मांडला जात असेल तर या सदनाचे आणि राज्यसभेचे महत्व कसे टिकणार याचाही विचार केला पाहिजे. आपल्याच परिसरातील एका नेत्याने राज्यसभेमध्ये जाण्याचे स्वप्न बघितले. सुटे सुटे सहा आमदार निवडले. त्यांना मुंबईच्या ताज हॉटेलमध्ये नेऊन ठेवले. मी विनोदाने त्यांना जे बोललो होतो ते आज मला आठवते. निवडून येण्यासाठी 27 मतांचा कोटा लागतो. कितीही घासलीस तरी 27 मतांचा कोटा मिळणार नाही, का बाजार मांडला आहेस? त्याचा हिशोब माझ्यापेक्षा परफेक्ट निघाला. त्याला माहित होते की, टोटलमधून सहा बाजूला काढले तर शेवटच्या उमेदवाराला सहा मते कमी मिळणार आहेत. त्याने सहा मते बाजूला काढली आणि ज्या उमेदवाराला कमी मते मिळत होती त्याला बाद केले.

सभापती महोदय, लोकशाहीमध्ये असा विचार मांडला जाणार असेल, एखाद्या कॉन्ट्रॅक्टरविरुध्द, कंपनीच्या विरुध्द मत व्यक्त केले तर त्याच्या विरोधात या कंपन्या निवडणुकीमध्ये उतरणार असतील तर या राज्यातील धनदांडगे लोक कोणालाही या सभागृहात येण्यापासून रोखू शकतात. जे लोक राजकारणाच्या धकाधकीमध्ये भाग घेऊ इच्छित नाहीत, ज्या लोकांची लोकशाही व्यवस्थेला गरज आहे, संसदीय पध्दतीला गरज आहे असे लोक या सदनामध्ये यावेत म्हणून या वरिष्ठ सभागृहाची रचना केलेली आहे. मला जी माहिती मिळाली ती तोंडी माहिती आहे. या संदर्भात खास कोणतेही पुरावे ठेवले जातात अशातला भाग नाही. परंतु महाराष्ट्रामध्ये कालच्या निवडणुकीमध्ये झालेल्या एका विधानपरिषदेच्या मतदारसंघातील सगळ्या उमेदवारांचा मिळून खर्च 75 कोटीचा असेल, त्याची उघडपणाने सगळीकडे चर्चा होत असेल तर उद्या कोणता सर्वसामान्य माणूस निवडणूक लढविण्यास तयार होईल? कोण तज्ज्ञ, साहित्यिक या सभागृहात येतील?

सभापती महोदय, सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेली सूचना अत्यंत चांगली आहे. या देशामध्ये कितीही चांगले कायदे करा, त्यावर मार्ग काढणारी डोकी कायदे करणाऱ्यांपेक्षा नेहमीच वरचढ ठरत आलेली आहेत. आज राज्यसभेमध्ये पक्षाने उमेदवारी द्यावी आणि पक्षाने उघडपणाने मदत करावी अशा पध्दतीची भूमिका घेतली. या देशातील एक गलेलठ्ठ उद्योगपती, कोणताही राजकीय पक्ष त्याला उघडपणाने समर्थन द्यायला तयार नव्हता. परंतु कोणत्याही राजकीय पक्षाचे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

समर्थन मिळविण्याची ताकद त्याच्याकडे होती. मार्ग काय निघाला? सगळ्या राजकीय पक्षांनी मिळून त्याला निवडून येण्यासाठी आवश्यक असलेला मताचा कोटा भरुन दिला. राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये आमदार पैसे घेतात, नगरसेवक पैसे घेतात, जिल्हा परिषदेचे सदस्य पैसे घेतात म्हणून यावर पक्षाचा आदेश देण्याचा निर्णय घेतला. यात पक्षाने पैसे घेणे उपयोगाचे नाही. आज राज्यसभेमध्ये आणि वरिष्ठ सभागृहात ही उद्योगपतींची घराणी कार्यरत झालेली आहेत आणि आज का पुढे निघाली आहेत याचा देश स्तरावर विचार केला जाण्याची आवश्यकता आहे. हा अधिकार पक्षाला देत असताना किमान ज्याला संधी दिली जाते तो दोन-तीन वर्षे तरी पक्षाचा सदस्य असला पाहिजे. आज पक्षामध्ये येतो आणि पक्ष त्याला उमेदवारी देतो आणि खुशाल तो वरिष्ठ सभागृहात जाऊन बसतो. या सदनाचे महत्व भविष्यामध्ये टिकवायचे असेल तर, खालच्या सभागृहात घाईगडीबडीने कायदे मंजूर होऊ नयेत, भावनेच्या आहारी जाऊन कायदे होऊ नयेत म्हणून समाजातील तज्ज्ञ मंडळी या सदनामध्ये यावीत.

यापूर्वी दोनदा ठराव केला आहे. केंद्र सरकार वेळेत त्याची दखल घेत नसेल तर आणखी खास विनंती आपण पार्लमेंटला करावी, केंद्र सरकारला करावी. आज या सदनामधील काही निवृत्त सदस्यांना निरोप देत असताना शेवटचा ठराव म्हणून जे दोन ठराव आपण पूर्वी केले त्याची लवकर अंमलबजावणी व्हावी असा तिसरा ठराव मंजूर करुन तो केंद्र सरकारकडे पाठवावा. हा ठराव केला आणि या व्यवस्थेमध्ये बदल झाला तर ज्यांना निरोप देत आहोत त्यांना खरा निरोप दिल्याचे समाधान आपल्याला आणि त्यांनाही मिळेल. जे निवृत्त झाले त्यांना चांगले आरोग्य लाभो, चांगले आयुष्य लाभो. ते या सदनामध्ये येऊ शकले नसले तरी वेगवेगळया क्षेत्रामध्ये त्यांना चांगले काम करण्याची संधी भविष्यात सुध्दा मिळावी अशा पध्दतीच्या भावना व्यक्त करतो. निवडणुकीच्या धकाधकीत जे पुनर्नियुक्त झाले त्यांचे मनापासून अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

नंतर 3इ.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, सभागृहाचे सन्माननीय सदस्य असलेले आणि ज्यांची टर्म संपलेले आहे त्यांच्या निरोप समारंभात माझे विचार मी व्यक्त करणार आहे. विशेषत: यातून पुनरागमन होत असलेले सन्माननीय सदस्य म्हणजे डॉ. सुधीर तांबे, प्रा. रामनाथ मोते, श्री. विक्रम काळे आणि श्री. राजेंद्र जैन यांचे मी मनापासून अभिनंदन करतो व त्यांच्या सभागृहातील तसेच समाज जीवनातील पुढील कामामध्ये त्यांना यश मिळेल अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

महोदय, पुण्याचे महापौरपद भुषविलेल्या व या सभागृहाचे केवळ 9 महिने सदस्य असलेल्या सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण, सन्माननीय सदस्य सर्वश्री कमलकिशोर कदम, डॉ. गुरुमुख जागवानी, सर्वश्री व्ही.यू. डायगव्हाणे आणि प्रा. बी.टी. देशमुख, विलासराव शिंदे, डॉ. एन.पी.हिराणी हे मात्र या सभागृहात निदान पुढील सहा वर्षे तरी आपल्याला दिसणार नाहीत, त्यापुढे मात्र सांगता येत नाही.

महोदय, जसे आताच सभागृहात सांगितले की, सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण या अत्यंत सुशिक्षीत होत्या तसेच पर्यावरणाच्या क्षेत्रात त्यांचा चांगला अभ्यास होता, पुण्याचे महापौरपदही त्यांनी भुषविलेले आहे त्यांना काही कारणाने थांबावे लागले. पण आमचे पुण्याचे सर्वेसर्वा माननीय उप मुख्यमंत्री यांनी सांगितले की, त्यांना या सभागृहात पुन्हा आणता आले नसले तरी राज्यसभेत पाठविण्याचा विचार आहे, ही चांगली गोष्ट आहे. कारण त्यांना फक्त नऊ महिनेच या सभागृहाचे सदस्यत्व मिळाले म्हणून त्यांना सभागृहाच्या संपूर्ण कामकाजाची कल्पनाही आली नसेल तेवढ्यात त्यांना जावे लागले. पुन्हा त्यांच्याबाबत विचार होण्यावर प्रकाश टाकल्यामुळे खरोखरच त्यांना पुन्हा संधी मिळेल असे मला वाटते व त्यात फरक पडेल असे मला वाटत नाही.

सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम यांनी पवई आयआयटीमधून सिव्हीलमध्ये एम.टेक. ची पदवी घेतली असून उत्तम प्रकारे भाषण करणारे, आपले मत ठामपणे मांडणारे, शिक्षण क्षेत्रात प्रचंड काम करणारे असे हे नेते सुध्दा पुढील सहा वर्षे सभागृहात दिसणार नाहीत. सभागृहात मोठी माणसे दिसली की काही घाबरतात पण सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम हे कधीही घाबरले नाहीत. शेवटपर्यंत ते लढले. कदाचित दोन महिने थोडे मागे पुढे झाली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

व ती जागा त्यांना सोडावी लागली व निवृत्त व्हावे लागले. पण पुढील काळात ते कदाचित पुन्हा येऊ शकतील अथवा लोकसभेतही जाऊ शकतील. अशा अतिशय कर्तव्यदक्ष, अतिशय विद्वान अशा व्यक्तिमत्वाला पुन्हा संधी न मिळाल्याने गेली 12 वर्षांपासून या सभागृहात काम करीत असलेल्या नेत्याला आपल्यातून निवृत्त व्हावे लागत आहे.

सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे हे शिक्षक मतदारसंघातून निवडून येत होते. ते देखील अतिशय परखड बोलणारे होते. त्यांचाही दुर्दैवाने पराभव झालेला आहे. या सर्व सन्माननीय सदस्यांना पुढील आयुष्यात त्यांचे कार्य अविरतपणे चालू राहील अशा शुभेच्छा व्यक्त करतो.

सन्माननीय सदस्य डॉ. गुरुमुख जागवानी यांचा आणि माझा तसा जास्त परिचय नाही परंतु ते आज सभागृहात उपस्थित आहेत परंतु पुढील सहा वर्षात मात्र दिसणार नाही असे समजले.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ...

या ठिकाणी ब्लड रिलेशनचा उल्लेख केला गेला. परंतु मला ते काही समजले नाही. आपल्याला थांबावे लागले तरी आपल्या चेह-यावर हास्य आहे हे विशेष. ब्लड रिलेशनमध्ये कधी कधी आपल्याला थांबावे लागते व आपण सुध्दा थांबावयास पाहिजे. परंतु एक लक्षात घ्या की, हे सभागृह आपले कर्तृत्व दाखविण्यासाठी आवश्यक असलेले सभागृह आहे असा त्याचा अर्थ होत नाही. तुमच्या अंगात कर्तुत्व असेल, धमक असेल तर तुम्ही इतर क्षेत्रात सुध्दा जनतेची आणि समाजाची सेवा करु शकता, वेगवेगळया मार्गाने तुम्ही जनतेपुढे जाऊ शकता. जरी तुम्हाला येथे संधी मिळाली नसली तरी सुध्दा तुम्ही इतर ठिकाणी नाव कमावू शकता. (अडथळा) या ठिकाणी मा. अजितदादा यांनी सांगितले आहे की, मा. वंदनाताई यांना राज्यसभेत पाठवेन परंतु मी काही मा. गुरुमुख जगवानी यांच्या बाबतीत सांगू शकणार नाही. कारण या बाजूला खूप लाईन लागली आहे, इकडे येऊन तुम्ही काय करणार आहात ?

श्री. अजित पवार : (खाली बसून) काहींना जा म्हटले तरी जात नाही.

श्री. छगन भुजबळ : त्यामुळे तुम्ही आहात त्या ठिकाणीच रहा आणि काम करत रहा. आज ना उद्या तुमचा सुध्दा दिवस जरुर येईल. (अडथळा)

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांचे कर्तुत्व आपण सर्वांनी पाहिलेलेच आहे. सभागृहात एखादा विषय लावून धरला तर मंत्र्यांना त्याचे उत्तर द्यावेच लागत असे. प्रा.बी.टी.देशमुखांना उत्तर दिल्याशिवाय कोणीच बसवू शकत नव्हते. त्यांना कोणीही बनवू शकत नव्हते. मा. देशमुख साहेबांच्या प्रश्नांना योग्य उत्तर दिल्याशिवाय ते कधीच बसत नसत. प्रा. बी.टी. देशमुख यांनी प्रश्न विचारला आणि त्या प्रश्नाला आपण उत्तर दिले आणि पुढील काही दिवसात तोच प्रश्न आला की, आपण ती माहिती विसरुन जातो परंतु त्यांनी 2-5-10 वर्षापासून कोणत्या सेशनमध्ये कोणता प्रश्न विचारला होता, त्यावेळेस मंत्र्यांनी काय उत्तर दिले होते, त्यानंतर काय कार्यवाही झाली, कार्यवाही का झाली नाही या सगळया गोष्टींचा ते पाढा वाचत असत. मा.प्रा.बी.टी.देशमुखांनी प्रश्न विचारल्यानंतर बहुतेक मंत्र्यांना निरुत्तर व्हावे लागत असे. सभागृहात कसा अभ्यास करुन यावे याचे ते एक उत्तम उदाहरण आहे. ते अतिशय कष्ट करुन अभ्यास करुन, प्रश्न विचारीत असत. प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी कधीही तडजोड केली नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ...

मा.प्रा.बी.टी.देशमुखांनी शिक्षकांच्या प्रश्नावर सुध्दा कधीही तडजोड स्वीकारली नाही. मा.प्रा.बी.टी.देशमुखांच्या हरण्यामुळे केवळ अमरावतीचेच नुकसान झाले अशातला भाग नाही तर विदर्भाचे नुकसान झाले. केवळ विदर्भाचेच नुकसान झाले असे नाही तर या सभागृहाचे सुध्दा मोठे नुकसान झालेले आहे. अशा चांगल्या माणसाला आपण सभागृहात आणू शकलो नाही याचे मला दु:ख आहे. विदर्भाच्या अनुशेषाच्या बाबतीत मा. श्री.नितीनजी गडकरी आणि मा.प्रा.बी.टी.देशमुखांनी जे कार्य केलेले आहे त्या कार्याला तोड नाही. त्यांनी केलेला अभ्यास, प्रत्यक्ष शब्दाचा अर्थ काढावयाचा आणि तोच प्रश्न करुन मंत्र्यांपुढे फेकावयाचा आणि उत्तर द्या म्हणून सांगावयाचे याला कधीही तोड होऊ शकणार नाही. खरे म्हणजे अशा लोकांकडून शिकूनच आपण मोठे होत असतो. परंतु ती शिकवण ग्राहय करण्याची शक्ती सुध्दा आपल्यामध्ये हवी असते. चांगल्या लोकांकडून आपण शिकले पाहिजे. प्रत्येक मनुष्य हा शेवटपर्यंत विद्यार्थी असतो व त्याला शिकावेच लागत असते. मा.प्रा.बी.टी.देशमुखांच्या न येण्यामुळे सभागृहाचे नुकसान झालेले आहे. मा.प्रा.बी.टी.देशमुख हे गेल्या 30 वर्षापासून या सभागृहाचे सदस्य होते. मा.प्रा.बी.टी.देशमुखांनी समाजाची सेवा करीत असतांना आपल्या तब्येतीकडे कधीही पाहिले नाही. त्यांची तब्येत मध्यंतरी खराब झाली होती त्यावेळेस आम्ही त्यांना भेटावयास गेलो होतो. परंतु तब्येत बरी नसतांना सुध्दा ते कधीही थांबले नाहीत. दुर्दैवाने मा.प्रा.बी.टी.देशमुख यावेळी निवडून येऊ शकले नाही ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनी नोंद

श्री.छगन भुजबळ.....

एकदा नागपूर अधिवेशनात प्रा.बी.टी.देशमुख आजारी पडले, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. आम्ही त्यांना पहावयास रुग्णालयात गेलो होतो.काही दिवसानंतर ते बरे होऊन घरी गेले. पण त्यानंतरही त्यांचा जोश कमी झालेला नाही. पूर्वीप्रमाणेच अभ्यास करण्याचा जोश,कष्ट करण्याची तयारी होती. दुर्दैवाने ते पुन्हा या सभागृहात निवडून येऊ शकले नाहीत.

डॉ.एन.पी.हिराणी यांची आणि माझी ओळख स्व.सुधाकरराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात झाली. त्यावेळी मी शिवसेना पक्ष सोडून काँग्रेस पक्षात आलो होतो. तेव्हापासून त्यांची आणि माझी चांगली ओळख आहे. माजी मुख्यमंत्री स्व.सुधाकरराव नाईक यांच्या ते अतिशय जवळचे आहेत. कापूस आणि पणनच्या बाबतीत महाराष्ट्रात अधिकारवाणीने ज्या काही थोड्या व्यक्ती बोलू शकतात त्यामध्ये डॉ.एन.पी.हिराणी यांचा नंबर येतो. त्यांनी सुध्दा आता थांबण्याचा निर्णय घेतला. त्यांनी अनेक देशांचा दौरा केलेला आहे. देशामध्ये आयोजित केलेल्या अनेक युवक महोत्सवामध्ये त्यांनी विद्यापीठांचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार व सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे ते अतिशय उत्कृष्ट नट आहेत. त्यांना अभिनयामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. अभिनय करणे ही साधी गोष्ट नाही. अभिनय करणे येऱ्या गबाळ्याचे काम नाही. ती अभिजात कला आहे. देशात झालेल्या अभिनय स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळणे ही मोठी बाब आहे. नाट्य आणि नाटकीपणा यामध्ये फरक आहे. एखाद्याच्या बोलण्यामध्ये नाटय असणे वेगळे आणि बोलताना नाटकीपणा करणे हे वेगळे. नाटय व नाटकीपणा यातील फरक समजला पाहिजे. अतिशय जोरात सांगितले म्हणजे.. (अडथळा) मी शिवसेना पक्षात 25 वर्षे नेता होतो. याच नाट्यामुळे आपण काय काय गोष्टी केल्या त्या विसरलात काय ? याच नाट्यामुळे मी विरोधी पक्षात बसत होतो.... आपण बिळात जाऊन बसला होता. याच नाट्यामुळे सरकार खाली खेचण्याची किमया आम्ही पार पाडली. त्यामुळे आपण या प्रकारात जाऊ नका. आपणाला ते जमणार नाही. जे मला जमते ते सर्वांनाच जमते अशातला भाग नाही. (अडथळा)..डॉ.एन.पी.हिराणी यांच्या अभिनयाबद्दल बोलले गेले त्याबद्दल माझे भाष्य आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.....

डॉ.एन.पी.हिराणी यांना मी सांगू इच्छितो की, बाहेर मोठे विश्व आहे. केवळ हे सभागृह किंवा राजकारण या एकाच क्षेत्रात आपण नावलौकिक मिळवू शकता असे नाही. या क्षेत्रा व्यतिरिक्त इतर अनेक क्षेत्रामध्ये आपण काम करु शकता, पुढे जाऊ शकता. हे खरे आहे की, या व्यासपीठावर मांडलेल्या जनतेच्या व्यथा संपूर्ण हिंदुस्थानात पोहोचतात असे हे व्यासपीठ आहे. यासाठीच येथे संधी मिळण्यासाठी अनेकजण प्रयत्न करीत असतात.

याठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार व गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले की, यापुढे या व्यासपीठाचे काय होणार आहे ? या व्यासपीठावर येण्यासाठी फक्त विकत घेण्याचे प्रकार होणार आहेत काय ? या व्यासपीठावर विद्वान, विद्वत्ताप्रचूर, तळागाळातील जनतेची तळमळीने सेवा करणारे लोक येऊ शकणार नाहीत काय ?

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ..

सभापती महोदय, विधान परिषदेचे व्यासपीठ कशासाठी निर्माण झाले आहे ? क्रीडा, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती सार्वजनिक निवडणुकीतून निवडून येऊ शकत नाही. त्यांच्या ज्ञानाचा , विद्वत्तेचा व सेवेचा फायदा सर्वसामान्य जनतेला झाला पाहिजे यासाठी विधान परिषदेचे व्यासपीठ तयार करण्यात आले आहे.या व्यासपीठापासून सरस्वती पुत्र लांब रहावयास लागले , ते निवडणूक हरावयास लागले आणि फक्त लक्ष्मीपुत्रच निवडून यावयास लागले तर या व्यासपीठाची किंमत राहणार नाही. या व्यासपीठाची किंमत शून्य होईल. या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी किंवा माननीय गृहमंत्री श्री आर. आर. पाटील यांनी जे सांगितले ते अगदी बरोबर आहे. तज्ज्ञ व्यक्ती सभागृहात निवडून येण्यासाठी जरुर तर नियमामध्ये बदल करावयालाच पाहिजे. आज कोटयावधी रुपये निवडणुकीत खर्च करावे लागतात असे आम्ही सुध्दा ऐकत असतो. हे काय चालले आहे ?. सर्वसामान्य माणसाच्या हातामध्ये ही निवडणूक राहणार आहे किंवा नाही ? महात्मा गांधीनी स्वातंत्र्य मिळवले आणि जे स्वराज्य आपण उपभोगत आहोत ते स्वराज्य फक्त लक्ष्मी पुत्रांसाठीच राहणार आहे काय ? विधान परिषद असो वा राज्यसभा असो त्या ठिकाणी होणा-या निवडणुकीत निवडून येण्याकरता जे काही वेगवेगळे प्रयोग आज सुरु झालेले आहेत त्या प्रयोगाकडे या राज्यातील तसेच देशातील धुरीणांनी अतिशय गांभीर्याने पाहणे अतिशय गरजेचे आहे. तसे झाले तरच ज्यासाठी ही यंत्रणा निर्माण केली आहे आणि हे व्यासपीठ निर्माण केले आहे त्याचे पावित्र्य वाचणार आहे अन्यथा हे पावित्र्य संपणार आहे. या निमित्ताने त्यांनी जी मागणी केलेली आहे त्याला मी पाठिबा देतो. विधान परिषदेच्या निवडणुकीत जे सन्माननीय सदस्य पुन्हा निवडून आले आहेत त्याचे मी अभिनंदन करतो आणि जे पुन्हा निवडून येऊ शकले नाहीत त्यांना बाहेरच्या जगतात , राजकीय क्षेत्रात सुयश मिळावे अशा प्रकारच्या शुभेच्छा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील(मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, निवृत्त होणा-या सदस्यांना शुभेच्छा देण्यासाठी मी उभा आहे. या सभागृहात जे पुन्हा निवडून आले ते माझे मित्र सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामनाथ मोते, विक्रम काळे आणि अन्य सन्माननीय सदस्य यांचे मी मन:पूर्वक स्वागत करतो. सभापती महोदय, ज्या निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना आपण निरोप देणार आहोत त्यातील सन्माननीय सदस्य श्री.गुरुमख जगवानी या ठिकाणी उपस्थित आहेत.या सभागृहात आल्यानंतर त्यांचा आणि माझा परिचय झाला होता आणि त्यानंतर त्यांच्याशी माझी मैत्री देखील झाली होती.या माणसाचे व्यक्तिमत्व पाहिल्यानंतर त्यांना एवढया लवकर पुन्हा निर्वासित व्हावे लागेल याची मी कल्पना केली नव्हती. पाकिस्तानातून ते इकडे आले होते. काही सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, श्री गुरुमुख जगवानी यांचा पिंड राजकीय नाही. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, अगदी अलीकडच्या काळापर्यंत त्यांचे वडील पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील मंत्री होते आणि भुत्तो यांच्या पाकिस्तान पिपल्स पार्टीचे ते नेते देखील आहेत. त्यांचे चिरंजीव महाराष्ट्रात आले आणि भारतीय जनता पक्षात सामील झाले आहेत हा योगायोग मला मुद्दाम नमूद करावयाचा आहे. अनेक सन्माननीय सदस्यांना असे वाटते की सन्माननीय सदस्य श्री गुरुमुख जगवानी यांना राजकीय पार्श्वभूमी अजिबातच नाही परंतु वडील पाकिस्तानमधील सिंध प्रांताचे मंत्री आणि ते स्वत: महाराष्ट्रात विधान परिषदेत सदस्य असे उदाहरण कोठेही आढळून येणार नाही म्हणून मला नेहमीच त्यांचे कौतुक वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी देखील निवृत्त होत आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रेमळ असून त्यांचा सहवास या सभागृहात पुन्हा मला मिळणार नाही म्हणून मी अशी अपेक्षा व्यक्त करतो की ते पुन्हा या सभागृहात निवडून यावेत किंवा राज्यसभेत तरी निवडून जावेत.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम हे देखील निवृत्त होत आहेत ते जेव्हा शिक्षण मंत्री होते आणि मी जेव्हा विद्यार्थ्यांच्या चळवळीमध्ये होतो तेव्हापासूनचा त्यांचा व माझा परिचय आहे.महात्मा फुले यांना महात्मा ही पदवी देण्यात आली होती त्याच्या शताब्दी समारंभासाठी मी सन्माननीय सदस्य श्री कमलकिशोर कदम यांना बोलविण्यासाठी गेलो होतो त्यावेळी या कार्यक्रमासाठी सन्माननीय सदस्य श्री कमलकिशोर कदम फक्त आलेच नाही तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी त्यांनी स्वीकारली व तो कार्यक्रम त्यांनी अत्यंत यशस्वीपणे पार पाडला.मुंबईच्या ज्या सभागृहामध्ये महात्मा फुले यांना लोकांकडून महात्मा ही पदवी देण्यात आली होती तोच दिवस पुन्हा आम्ही उजळून काढला होता त्याची मला आवर्जून आठवण होत आहे.शिक्षण क्षेत्रामध्ये सन्माननीय सदस्य श्री कमलकिशोर कदम यांनी जे काम केले आहे ते अव्दितीय आहे.त्याच्या कामाची नोंद त्यांचा पक्ष पुढच्या काळात देखील घेईल असा मला विश्वास आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.वंदना चव्हाण यांना खूपच कमी कालावधी मिळाला आहे.सन्माननीय सदस्य श्री व्ही.यू.डायगव्हाणे यांना तीन टर्म मिळाल्या होत्या त्यांनी केलेल्या कामाचे योगदान पुढच्या काळातसुध्दा आम्हाला सतत आठवत राहील. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख या सभागृहात पुन्हा निवडून आलेले नाही याचे वैषम्य, त्याची हळहळ गेले तीन दिवस या सभागृहात मी सातत्याने ऐकत आहे.

(सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख सभागृहात प्रवेश करतात)

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख सभागृहाची शान होते इतकेच नव्हे तर विदर्भाची तळपती तलवारसुध्दा होते.....

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

या सभागृहामध्ये केवळ विदर्भाच्या प्रश्नावर नाहीतर या राज्यातील सर्व मागासलेल्या भागांच्या प्रश्नांवर वन मॅन आर्मी म्हणून जर कुणी काम केले असेल तर ते फक्त माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी केले आहे, हे मी गेली चार वर्षे प्रत्यक्ष अनुभविले. त्यापूर्वी गेली 15 वर्षे वार्ताहर गॅलरीमध्ये बसून मी त्यांचे सभागृहातील कामकाज पहात होतो आणि अनुभव घेत होतो. अशाप्रकारे या सभागृहामध्ये गेल्या 20 वर्षामध्ये असे लढणे इतर कोणाकडून मी कधीही पाहिलेले नाही. माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेबांच्या प्रश्नाला तोंड फोडले त्या प्रश्नाकडे मला आपले लक्ष वेधावयाचे आहे. या सभागृहाच्या नेत्यांनी, आदरणीय दादांनी एका महत्वाच्या मुद्याला हात घातल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सोफियाच्या संदर्भातील कारण याठिकाणी सांगितले त्यामुळे माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख साहेब या सभागृहामध्ये पुन्हा निवडून येऊ शकले नाहीत. या सभागृहाबाहेरील शक्ती, राजकारणाबाहेरील शक्ती संसदेमध्ये काय होणार हे आता ठरवावयास लागली आहे. पूर्वीच्या काळात कोणते कायदे करावयाचे, कुणाच्या बाजूने करावयाचे याचा निर्णय ही शक्ती घेत होती. परंतु आता सभागृहामध्ये कुणाला पाठवावयाचे, कुणाला पाठवावयाचे नाही याचाही निर्णय ही शक्ती घेऊ लागली आहे याचे दु:ख वाटते. अशावेळी सत्ताधारी राजकीय पक्ष तटस्थ भूमिका घेतो, त्यावेळी अशाप्रकारच्या बाह्य शक्तींची शक्ती नेहमी वाढत रहाते. आणि म्हणून याकरिता सभागृहामध्ये बसलेल्या सर्व राजकीय शक्तींनी आम्ही कुणाच्या बाजूने उभे रहाणार आहोत या संदर्भात निर्णय घेतला पाहिजे. केवळ तटस्थ भूमिका घेतली तर नको त्या शक्ती फोफावतात. याकडे मला या सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. सभापती महोदय, या विधानपरिषदेच्या निवडणुकीमध्ये निवडून येण्यासाठी पैशांनी मते विकत घेतली जातात हा विषय उपस्थित करुन माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाला हात घातला आणि त्याबाबत त्यांनी सांगितलेले खर्चाचे आकडे पाहिल्यानंतर आपण अचंबित होतो.

सभापती महोदय, मी यानिमित्ताने अथेन्स नगरीची आठवण करुन देतो. 3 हजार वर्षापूर्वी अथेन्समध्ये लोकशाहीचा जन्म झाला. तिथे सुध्दा दादा तुम्ही विचारलेला प्रश्न विचारला गेला होता.

(माननीय सभापती वेळ संपल्याची घंटा वाजवितात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

श्री. कपिल पाटील...

सभापती महोदय, हा निरोप समारंभ राहिलेला नाही तर एका महत्वाच्या प्रश्नावर आपण चर्चा करीत आहोत. म्हणून मी आदरपूर्वक आपणास विनंती करतो की, आपण मला थोडा अधिक वेळ देऊन माझे म्हणणे ऐकून घ्यावे. अथेन्सच्या नगरीमध्ये पेरीक्युलेस निवडून आला होता. त्यावळी पेरीक्युलसने निवडून येण्यासाठी लोकांना पैसे वाटले असा त्याच्यावर आरोप केला गेला होता. पैसे वाटून तरुणांना विविध पध्दतीने लोभ दाखवून त्यांची मते विकत घेतली तर त्यामुळे लोकशाही बुडेल असे सर्व लोक म्हणत होते. पेरिक्युलेसने त्यांना उत्तर दिले की, मी जर या मुलांना पैसे दिले नाहीतर ती नको त्या धंद्याला लागतील म्हणून मी त्यांचे पुनर्वसन करीत आहे व निवडून येत आहे. पेरीक्युलेस अतिशय पराक्रमी होता, त्याने अथेन्स नगरी जिंकली. परंतु त्याच पेरीक्युलेसच्या वागण्यामुळे अथेन्सची धूळधाण झाली नंतर पार्टाने त्याचा पराभव केला. ज्या पध्दतीने अथेन्स धूळधाणीला लागले ती गोष्ट आपण आवरली नाही तर उद्याच्या संसदीय लोकशाहीला नख लागल्याशिवाय रहाणार नाही, हा इशारा मला यानिमित्ताने द्यावासा वाटतो.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी एक महत्वाची सूचना केली असली तरी त्या सूचनेशी मी सहमत नाही हे मी याठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो. राज्यसभेच्या निवडणुकीमध्ये आपण निवडून आणणाऱ्या उमेदवाराला किंवा संबंधित राजकीय पक्षाच्या नेत्याला आपले मत दाखवावे लागते. अशाप्रकारे मत दाखविणे हा केवळ त्याच्यावरील अविश्वास नसतो तर त्याला निवडून देणाऱ्या जनतेवरील अविश्वास असतो. एका अर्थाने ही एक अशोभनीय अशी प्रथा असून आपण ती अपधाताने स्वीकारली आहे. ज्यावेळी संसदेमध्ये सत्तांतरांच्या संदर्भात, पक्षांतराच्या संदर्भात विधेयक आले होते त्यावेळी कै. मधू लिमये यांनी आपण अशाप्रकारे लोकशाहीला नख लावीत आहोत असा प्रश्न उपस्थित केला होता. सभापती महोदय, आपण उपस्थित केलेला प्रश्न अतिशय बरोबर आहे. विधानपरिषदेची ही रचना करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रस्ताव मांडला त्यावेळी वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता कां आहे ? याचे विश्लेषण करुन डॉ. पंजाबराव देशमुखांनी त्याचे समर्थन केले होते. त्यासंबधी माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेब, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. छगन भुजबळ साहेब व माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार साहेबांनी त्याचा उल्लेख केला असल्यामुळे मी त्याची पुनरुक्ती करीत नाही. परंतु ते असे म्हणाले होते की, या सभागृहामध्ये जाणकार मंडळी आली पाहिजेत. कारण ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

श्री. कपिल पाटील...

विधानसभेमध्ये जाऊ शकत नाहीत. ही मंडळी या सभागृहामध्ये यावयाची असतील तर त्यांना निवडून देण्याचा अधिकार जाणकार व्यक्तिच्या हाती असावयास पाहिजे आणि म्हणून त्याकरिता विधानसभा मतदार संघ, स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघ, पदवीधर मतदारसंघ, शिक्षक मतदारसंघ व राज्यपाल नियुक्त असे पाच गट निर्माण करण्यात आले. परंतु शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या संदर्भात विरप्पा मोईली समितीने भलतीच शिफारस केली आहे. मागील नागपूर अधिवेशनामध्ये या संदर्भात मी आपले लक्ष वेधले होते, परंतु त्यावेळी त्याची फारशी दखल घेतली गेली नाही. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी हा प्रश्न पुन्हा उपस्थित केल्यानंतर आपण सुध्दा पुन्हा एकदा त्याबाबत आपली सहमती व्यक्त केली आणि म्हणून मी या निमित्ताने एक सूचना करु इच्छितो की, स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा मतदारसंघ या दोन मतदारसंघामधून विधानपरिषदेमध्ये जे सदस्य अप्रत्यक्षरित्या निवडून येतात त्यांची निवड लोकप्रतिनिधींच्या हातामध्ये न ठेवता विधानसभेमध्ये ज्या राजकीय पक्षाला निवडणुकीमध्ये जितकी मते मिळाली असतील त्या मतांच्या टक्केवारीमध्ये त्या पक्षाला तितक्या जागा विधानपरिषदेमध्ये दिल्या पाहिजेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि त्याठिकाणी कोणाला पाठविण्यात यावे याबाबत त्या-त्या पक्षाने निर्णय घ्यावा. जेणेकरुन तेथे चांगली माणसे पाठविता येतील. यासाठी त्या पक्षाच्या नेत्यांना आणि कार्यकारिणीला अधिकार राहील. ज्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये गटनेता देतो, त्या पध्दतीने ती व्यक्ती येथे सूचना करु शकेल. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सुध्दा त्या निवडणुकीमध्ये स्थानिक जनतेने जो कौल दिलेला असेल व राज्यातील एकूण टक्केवारीच्या संदर्भात ज्या पक्षाला जेवढी मते मिळाली असतील, त्या प्रमाणामध्ये सभागृहामध्ये जर प्रतिनिधीत्व मिळाले तर ते अधिक चांगल्या प्रकारे काम करु शकतील. कारण विधान सभेमध्ये किंवा लोकसभेमध्ये केवळ एका मताने निवडून आला ....

(माननीय सभापती बेल वाजवितात.)

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी माझे वक्तव्य थांबविणार आहे. पण तुम्ही पुन्हा-पुन्हा बेल वाजविली तरी मी थांबणार नाही. मी दोन मिनिटांमध्ये माझे बोलणे संपविणार आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांना आपले भाषण थांबवावे लागेल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी दोन मिनिटांमध्ये माझे भाषण थांबविणार आहे.

सभापती सन्माननीय सदस्यांना आपले भाषण थांबवावे लागेलच.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी माझे भाषण थांबविणार आहे, पण आपण मला केवळ दोन मिनिटे द्यावी.याठिकाणी महत्वाची चर्चा झाली म्हणून मी बोलण्यासाठी उभा आहे. अन्यथा माझे भाषण दोन मिनिटांमध्ये संपले असते. कारण मला माझा तो मुद्दा पुढे मांडण्यासाठी दोन मिनिटे वाया जातात.लोकसभेमध्ये किंवा विधानसभेमध्ये केवळ एकामताने निवडून आल्यानंतर ती व्यक्ती निवडली जाते आणि सायजेबल मते मिळूनही काही कारणांमुळे, अपघातामुळे उमेदवार निवडून आलेला नाही, त्याला प्रतिनिधीत्व मिळत नाही.म्हणून मतांच्या टक्केवारीमध्ये किमान वरच्या सभागृहामध्ये तरी प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे. त्यामुळे आपण या दोन मतदार संघाच्या बाबत अशा प्रकारचा बदल घडवावा. मागील जे ठराव आहेत, ते अपूरे आहेत. याबाबतीत सभागृहाच्या नेत्यांनी जर नव्याने ठराव आणला तर या सभागृहाने तो संसदेमध्ये पाठवावा आणि ज्या प्रमाणे संसदेमध्ये श्री.विरप्पा मोईली यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली गेली, त्याप्रमाणे सर्व राज्यांमधील वरिष्ठ सभागृहांच्या संदर्भात सरकारने नव्याने एखादी समिती नेमली तर मग डॉ.बाबासाहेब आंबेडकर ...

. . . .3 जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील . . . .

आणि डॉ.पंजाबराव देशमुख यांनी जो उद्देश ठेवला होता, त्याच्या पूर्तीबाबत आपण खऱ्या अर्थाने न्याय देऊ शकतो असे मला वाटते. एवढे बोलून मी आपली रजा घेतो. धन्यवाद.

. . . .3 जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, ...

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कमीतकमी वेळेत आपले भाषण पूर्ण करावे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, मला जाणीव आहे आणि माझ्या लक्षात देखील आले आहे. आज याठिकाणी आपल्या सभागृहाचे 11 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत. त्यापैकी 4 सन्माननीय सदस्य पुन्हा सदनामध्ये निवडून आलेले आहेत. यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, राजेंद्र जैन, डॉ.सुधीर तांबे आणि सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांचे पुन्हा सदनामध्ये आगमन झालेले आहे, त्यांचे मी प्रथम स्वागत करतो. पण जे सन्माननीय सदस्य आता निवृत्त होत आहेत, त्यांच्याबाबत याठिकाणी सर्वांनीच आपल्या भावना विस्तृतपणे व्यक्त केल्या आहेत. एकूण लोकशाहीच्या या प्रक्रियेचे एक उत्तम असे विचारमंथन या सभागृहाच्या माध्यमातून सर्वदूर लोकांपर्यंत आणि केंद्र सरकारपर्यंत पोहोचविण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, विशेषत: सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्याबद्दल सर्वच जणांनी विचार मांडलेले आहेत आणि आता त्यांचे या सदनामध्ये आगमन देखील झालेले आहे. त्यांच्याबद्दल दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या मनातील भावना अशी आहे की, त्यांचा पराभव हा सर्वांना चटका लावून गेलेला आहे. म्हणून आता ते या सदनामधून निवृत्त होत असताना, त्यांना निरोप देत असताना त्यांच्या कर्तृत्वाचे, त्यांच्या योगदानाचे केवळ प्राध्यापक म्हणून मूल्यमापन करु नये तर प्राध्यापक, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि समाजातील एक आदर्श जागरुक लोकप्रतिनिधी कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आहेत. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना मी अनेक वर्षापासून म्हणजे माझ्या युवक काँग्रेस चळवळीपासून ओळखत आहे. अर्थात ते माझ्यापेक्षा मोठे आहेत. परंतु मी युवक काँग्रेसच्या चळवळीमध्ये काम करीत असताना विदर्भामध्ये खूप ठिकाणी फिरलो आहे आणि त्यावेळी मला सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना एकतर त्यांच्या महाविद्यालयीन जीवनामधील पत्रकार म्हणून आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे बिनीचे शिलेदार म्हणून भेटण्याची अनेक वेळा संधी मिळाली. आज योगायोगाने महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना संयुक्त महाराष्ट्राच्या, अखंड महाराष्ट्राच्या तीव्र भावना लक्षात घेऊन त्याबाजूने उभे रहाणारे, परंतु विदर्भातील सर्व प्रश्नांच्या बाबतीत इतरांच्या पेक्षाही दोन पावले पुढे जाऊन विदर्भातील सर्व बाबतीतील अनुशेषाचा प्रश्न पोटतिडकीने,अभ्यासपूर्ण मांडणारे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख

. . . .3 जे-4

श्री.उल्हास पवार .. . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशी त्यांची दोन व्यक्तिमत्वे आहेत. म्हणजेच एका बाजूला विदर्भातील प्रश्न तेवढया पोटतिडीकीने मांडणार, परंतु त्या वेळी कोणत्याही अभिनिवेषामध्ये टोकाला न जाता पुन्हा अखंड मराठी राज्याची जी संकल्पना आहे, त्याची जपणूक करणारे आणि त्याकरता आपले पद पणाला लावणारे असे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना मी जवळून पाहिलेले आहे. एकदा सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख मला काही आठवणी सांगताना म्हणाले की, ऐन तारुण्यामध्ये वयाच्या 18-19-20 व्या वर्षी मी विद्यार्थीही होतो आणि पत्रकारही होतो. संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ही त्यांची आराध्य दैवते आहेत.तसेच यामध्ये डॉ.पंजाबराव देशमुख, आबासाहेब खेडकर अशी विदर्भ आणि अमरावतीच्या मातीतील किती तरी नावे येथे घ्यावी लागतील की, ज्यांचा आदर्श डोळयासमोर ठेऊन माननीय प्रा.बी.टी.देशमुख यांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय कार्यामध्ये उडी घेतलेली आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KTG/ D/ KGS/ प्रथम सौ. रणदिवे.... 17:00

श्री. उल्हास पवार ....

सभापती महोदय, वयाच्या 18 व्या किंवा 21 व्या वर्षी पत्रकारिता करीत असताना संत गाडगे महाराजांचे निधन झाल्या नंतर त्या प्रसंगाचे वर्णन एक पत्रकार म्हणून एक श्रोता म्हणून प्रा. बी.टी. देशमुख यांनी केले त्यावेळी त्यांचा लिहून घेतलेला शब्द आणि शब्द मला आजही आठवतो. संत गाडगे बाबांचा अंत्यविधी कुठे करायचा? अमरावतीमध्ये करायचा की, त्यांच्या आवडत्या गावी करायचा की, पंढरपूरमध्ये करायचा याबाबतीत हजारो भक्तगणांचा संघर्ष चालू असताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज तातडीने प्रवासातून त्या ठिकाणी पोहचले. संत तुकाराम महाराजांनी प्रवासामध्ये गाडगे महाराजांवर जे गीत लिहिले होते ते संपूर्ण गीत त्यांनी मला वाचून दाखविले. ते गीत संत तुकडोजी महाराजांनी सांगितल्या बरोबर हजारोंचा जनसमुदाय शांत झाला. भजन संपल्यानंतर संत तुकडोजी महाराजांनी असे सांगितले की, गाडगे बाबांचा अत्यंविधी येथेच होईल. त्यानंतर कोणी अवाक्षर उच्चारले नाही. असा वृत्तांत 1956 साली एक विद्यार्थी म्हणून त्या वेळच्या वर्तमानपत्रात प्रा. बी. टी. देशमुख यांनी लिहिला होता असे प्रा. बी.टी. देशमुख आहेत. विद्यार्थीदशे पासून शिक्षकपेशा पासून प्राध्यापकापासून एक आदर्श प्राध्यापक, आदर्श शिक्षक आणि त्याचबरोबर केवळ शिक्षकांकरिता केवळ प्राध्यापकांकरिता किंवा केवळ शिक्षणाची बाजू ते या सभागृहात मांडत बसले नाहीत तर विदर्भाचा अनुशेष पोटतिडीकेने, घटनेच्या कलमांचा संदर्भ देऊन, त्यावेळच्या भाषणांचा संदर्भ देऊन प्रसंगी ॲडव्होकेट जनरलला आपले मत व्यक्त करण्याकरिता सभागृहासमोर बोलावण्याचे सामर्थ्य कसे असू शकते हे त्या वेळच्या प्रा.बी.टी.देशमुख यांनी केलेल्या भाषणातून या सभागृहात व्यक्त केलेल्या तीव्र भावना आजही आपल्या सर्वांच्या लक्षात आहेत. शेतीचे प्रश्न असतील, कापसाचे प्रश्न असतील, धानाचे प्रश्न असतील, संत्र्याचे प्रश्न असतील, अवकाळी पावसाचे प्रश्न असतील या सगळया दुष्काळी किंवा अवकाळी पावसामुळे जी परिस्थिती निर्माण झाली त्या परिस्थितीचे अत्यंत विदारक असे चित्र या सभागृहामध्ये कसे मांडावे आणि प्रश्न कसे सोडवून घ्यावेत याचे आमच्या सारख्या सगळयाच नवीन आलेल्या सन्माननीय सदस्यांनी, लोकप्रतिनिधी म्हणून कसे काम करावे याचा प्रा. बी.टी. देशमुख यांच्याकडून आदर्श घ्यावा असे प्रा. बी. टी. देशमुख यांचे व्यक्तिमत्व आहे. या सभागृहात त्यांना निरोप देत असताना आम्हा सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना दाटून आलेल्या आहेत. पण शेवटी सर्व सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी विवेचन केल्याप्रमाणे राज्यसभेमध्ये किंवा विधानपरिषदेमध्ये

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार.....

सदस्य म्हणून निवडून येण्याची लोकशाहीची जी प्रक्रिया आहे, त्या प्रक्रियेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था असोत किंवा नगरपालिकेतील को-आप्ट होणारे सदस्य असोत, जिल्हा परिषदेचा सदस्य किंवा सभापती होताना आणि या सभागृहामध्ये येताना भांडवलशाहीचे, पैशाच्या जीवावर लोकप्रतिनिधीसुध्दा विकत घेतला जाऊ शकतो याचे एक अत्यंत विदारक चित्र तुम्हाला-आम्हाला पहावयास मिळते आणि त्यामुळे या ठिकाणी बसलेल्या अनेक चांगल्या सन्माननीय सदस्यांकडे लोकांचा पहाण्याचा दृष्टिकोण हा अत्यंत भयानक झालेला आहे. आपल्याला देखील लोकांपुढे जात असताना शरमेने मान खाली घालावी लागते अशी अवस्था निर्माण झालेली आहे. मागच्यावेळी माननीय श्री. अजित पवार, माननीय श्री. छगन भुजबळ, माननीय आर.आर.पाटील, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आणि मी देखील त्यावेळी असे सांगितले होते की, राज्यसभेची जी पध्दत आहे किंबहुना दहा राज्यांमध्ये, सहा राज्यांमध्ये विधान परिषदेचे अस्तित्व असेल तर त्यासाठी काही तरी क्लॉज असला पाहिजे. तेव्हा ही बाब केंद्र सरकारच्या लक्षात आणून तो क्लॉज त्वरित कसा होईल हे सर्वांनी पाहिले पाहिजे. प्रा. बी.टी. देशमुख यांच्या सारख्या आदर्श नेतृत्वाचा जेव्हा पराभव होतो तेव्हा त्यासंबंधीचे चिंतन आपण अधिक आंतर्मुख होऊन केले पाहिजे असे मला वाटते.

सन्माननीय सदस्य डॉ. हिराणी यांचा आणि माझा परिचय खूप जुना आहे. ते या सदनामध्ये नव्हते, लोकप्रतिनिधी नव्हते परंतु युवक काँग्रेसच्या चळवळीत मी जेव्हा पुसदला अनेक वेळा गेलो तेव्हा डॉ. हिराणी कोण आहेत हे त्यांच्या आडनावावरुन माझ्या लक्षात येत नव्हते. पण जेव्हा त्यांचे पूर्ण नाव वाचले तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, हे तर मुस्लीम समाजाचे आहेत. पण नंतर असे लक्षात आले की, ते माझ्यापेक्षाही चांगले आणि पुण्यातील सदाशिवपेठेतील ब्राम्हणी मराठी बोलतात. मला माफ करा. पण ते अतिशय उत्तम मराठी बोलतात. अनेक नाटकांमध्ये त्यांनी उत्तम अभिनय केलेला आहे. अमलदार, तुझे आहे तुझपाशी, लग्नाची बेडी या सगळया नाटकांमध्ये राज्य पातळीवर, आंतर महाविद्यालयीन पातळीवर, इंटर युनिव्हर्सिटी पातळीवर आणि राष्ट्रीय पातळीवर त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत असे डॉ. हिराणी आहेत. उत्तम अभिनय, उत्तम मराठी भाषा, मराठी साहित्यावर, संस्कृतीवर, कलेवर प्रेम करणारा हा माणूस आहे. स्व. ग.दि.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार....

माडगूळकर हे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले आणि पुसदला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले त्यावेळी स्व. सुधाकरराव नाईक साहेब हे त्याचे स्वागताघ्यक्ष होते आणि त्याचे प्रमुख कार्यवाह किंवा कार्याध्यक्ष म्हणून मला वाटते डॉ. हिराणी यांनी काम केलेले आहे. स्व. ग. दि. माडगूळकरांनी आपल्या समारोपाच्या भाषणात ज्यांचा गौरव केला त्यामध्ये स्व.श्री. सुधाकरराव नाईक आणि डॉ. हिराणी यांच्या नावाचा उल्लेख केला. मला ज्या ज्यावेळी स्व. ग. दि. माडगूळकर यांना भेटायची संधी मिळायची त्या त्यावेळी पुसदला पुष्पावती नदीच्या काठावर झालेल्या साहित्य संमलेनच्या आठवणी त्यांनी जागविल्या आहेत.

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ....

त्यामुळे केवळ वैद्यकीय पेशा किंवा केवळ कला नव्हे तर कापूस एकाधिकार योजनेवर देखील प्रामाणिकपणे काम करुन त्यांची जी सूतगिरणी आहे त्याचे चेअरमनपद सोडताना 16 कोटी रुपयांचा नफा शिल्लक ठेऊन ते बाहेर आले. आजच्या काळामध्ये कोणत्याही सहकारी संस्थेमध्ये अशा प्रकारे नफा शिल्लक ठेऊन बाहेर येणे अवघड झालेले आहे. पण ही किमया सन्माननीय सदस्य डॉ. हिराणी यांनी करुन दाखविलेली आहे. त्यांच्यासारख्या एका अभ्यासू सदस्याला, समाजातील चांगल्या लोकप्रतिनिधीला आपण निरोप देत आहोत. त्यांना भावी आयुष्यामध्ये उत्तम यश मिळावे आणि त्यांना चांगले आरोग्य लाभावे अशी मी या ठिकाणी प्रार्थना करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे हे आपल्या जिल्ह्यातील आहेत हे आपल्याला माहीत आहे. ते जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते तेव्हापासून मी त्यांना ओळखतो. एवढेच नव्हे तर आपलाही त्यांच्याशी अतिशय जवळचा संबंध आहे. कै. यशवंतराव चव्हाण साहेब यांचे त्यांच्याशी नाते आहे. त्यांची बहीण ही कै. यशवंतराव चव्हाण यांची सून होती. त्यांचे पुतणे हे माझे फार जवळचे मित्र आहेत. ज्यावेळी सांगलीला निवडणुकीची जाहीर सभा झाली त्यावेळी दादा तसेच स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण आणि माझे अगोदर भाषण झाले होते. आम्ही त्यावेळी 11 किलोमीटर आष्टी येथे सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे यांच्या घरी जेवणासाठी आलो होतो. जिल्हा मध्यवर्ती बँक असेल, जिल्हा काँग्रेस कमिटी असेल, जिल्हा परिषद असेल या सर्व क्षेत्रामध्ये अतिशय उत्तम असे काम केलेल्या माननीय श्री. विलासराव शिंदे यांची आठवण होते. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आता आठवण करुन दिली की, ज्या दोघांचा त्यांनी पराभव केला ते मंत्री झाले. त्यानंतर त्यांना असेच कसे ठेवावयाचे म्हणून पार्लमेंटरी सेक्रेटरी करावयाचे की काय असा रात्रीपर्यंत निर्णय होऊन ते पार्लमेंटरी सेक्रेटरी होणार आणि तो निर्णय उद्या जाहीर होणार, त्यांना आयुष्यात निदान तेवढे तरी करावे असे ठरले होते पण तोही नर्णय तसाच थांबला आणि ते पार्लमेंटरी सक्रेटरी सुध्दा होऊ शकले नाहीत. याचा मी साक्षीदार आहे. म्हणून या सदनामध्ये मी आपल्या माहितीसाठी त्याचा उल्लेख करीत आहे. त्यांच्यासारखे सदस्य या सदनातून निवृत्त होत आहेत. त्यांना निरोप देताना मला सर्व आठवणींची उजळणी करावीशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ....

वाटली पण ते शक्य नाही. कारण माननीय सभापती महोदयांचा बेलवर हात गेलेला आहे. त्या अगोदरच मी माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम हे नांदेड जिल्हा युवक काँग्रेसमध्ये उपाध्यक्ष होते. एम.टेक. झालेले श्री. कमलकिशोर कदम हे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्षही होते. मी जेव्हा माझ्या पदाधिकाऱ्यांची ओळख करुन देत असे त्यावेळी दोन दोन वेळा त्यांच्या पदव्या सांगत होतो. श्री. कमलबाबू कदम हे कलकत्ता विद्यापीठातून एम.टेक. झालेले आहेत अशी मी सगळी उजळणी करीत असे आणि त्यांचे प्रतिनिधित्व सांगत असे. शिक्षण मंत्री म्हणून, उपाध्यक्ष म्हणून तसेच विविध खात्याचे मंत्री म्हणून त्यांना काम करण्याची संधी मिळाली. उपाध्यक्ष म्हणून त्यांनी अतिशय उत्तम काम केलेले आहे. मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी अतिशय उत्तम काम केले आहे. अत्यंत कमी बोलणारे पण जे बोलावयाचे ते अत्यंत अभ्यासपूर्ण बोलत असत. अभ्यासपूर्ण नेमका प्रश्न मांडणारे आणि समजा सगळ्या सभागृहाचे एक मत असेल परंतु माझे हे मत आहे असे प्रामाणिकपणे मांडणारे सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम यांनाही आपण निरोप देत आहोत. त्यांच्या भावी आयुष्यामध्ये त्यांना उत्तम यश मिळावे अशी मी प्रार्थना करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. जगवानी हे निवृत्त होत आहेत. त्यांच्या बाबतीत आताच सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी एक वेगळाच मुद्दा सांगितला. आम्ही राष्ट्रीय ऐक्याची गोष्ट करीत होतो पण त्यांच्या मुद्दयामुळे आम्हाला जागतिक ऐक्याची गोष्ट समजली. त्यांचे वडील हे पाकिस्तानच्या सिंध प्रांतामध्ये मंत्री राहू शकतात आणि आज आपल्या भारतामध्ये सन्माननीय सदस्य डॉ. जगवानी या ठिकाणी येऊन एका पक्षाचे प्रतिनिधी म्हणून या सदनामध्ये बसू शकतात. श्रीमती निर्मलाताई देशपांडे जेव्हा पाकिस्तानमध्ये गेल्या होत्या तेव्हा त्यांनी त्या ठिकाणी भाषण केले होते आणि त्या भाषण संपविताना 'जय जगत' असे म्हणाल्या. 'जय जगत' म्हटल्याबरोबर दुसऱ्या दिवशी पाकिस्तानच्या वर्तमानपत्रामध्ये आठ रकान्याची हेडलाईन आली होती की, गांधीजींची शिष्या जगाचा विजय होवो अशी प्रार्थना पाकिस्तानमध्ये येऊन करते याचे आम्हाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

आश्चर्य वाटले आणि आम्ही नतमस्तक आहोत. जणूकाही तो नारा आपण या ठिकाणी सिध्द केलेला आहे. वडील तिकडे आणि आपण इकडे. गांधीजींचा एवढा तरी संदेश जगामध्ये पोहोचलेला आहे. आपल्याला निरोप देत असताना आपले आरोग्य क्षेत्रातील जे काम आहे त्याचे वर्णन अनेक सन्माननीय सदस्यांनी केलेले आहे. आपल्याकडून पुढच्या आयुष्यामध्ये उत्तम असे सामाजिक आणि आरोग्य क्षेत्रामध्ये काम व्हावे अशी मी या ठिकाणी प्रार्थना करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांनाही आज निरोप देत आहोत. ते खऱ्या अर्थाने सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांचे पाठीराखे होते. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख पुढे बसावयाचे आणि श्री. डायगव्हाणे त्यांच्या मागे बसलेले असावयाचे. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख जेव्हा प्रश्नावर बोलत असतील तोपर्यंत सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांनी मान हलवून हात वर केलेला असावयाचा आणि पाठोपाठ उठून ते बोलावयाचे. ते चित्र जणूकाही चलचित्राप्रमाणे आमच्या डोळ्यासमोर उभे राहते. त्यांनाही आम्ही निरोप देत आहोत. या निवृत्त होणाऱ्या सर्व सदस्याच्या बाबतीत मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो की, त्यांना उदंड आयुष्य आणि आरोग्य लाभावे आणि त्यांचे जीवन यशस्वी आणि कीर्तीमान व्हावे अशा शुभेच्छा देतो.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनातील जे 11 सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्यापैकी डॉ. सुधीर तांबे, श्री. राजेंद्र जैन, श्री. विक्रम काळे आणि श्री. रामनाथ मोते हे चार सन्माननीय सदस्य पुन्हा या सभागृहाचे सदस्य झालेले आहेत. या चारही सन्माननीय सदस्यांचे मी स्वागत करतो. पहिल्या टर्ममधील आपला सहभाग आम्ही बघितलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

आपण सभागृहात असल्याने सभागृहातील चर्चेमधून आणि विधायक सूचनांमध्ये मोलाची भर पडेल अशीही अपेक्षा आपले स्वागत करीत असताना मी व्यक्त करतो. या सभागृहाची वेगळी खासियत आहे असे म्हटले जाते. हे चिरंतन चालू राहणारे सभागृह आहे. या सभागृहात सदस्य येतात आणि जातात. त्यामुळे निरोप समारंभासारखा कार्यक्रम केवळ याच सभागृहात होऊ शकतो. आपण सर्वांनी या कार्यक्रमाला सुरुवात केली त्यावेळी बोलत असताना सगळयांचे लक्ष त्या रिकाम्या खुर्चीकडे जात होते. त्या खुर्चीने या सभागृहाला जे काही दिले त्याबद्दलचे वर्णन केले जात होते. जेव्हा साक्षात सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख हे त्या खुर्चीत स्थानापन्न झाले, त्यावेळी खरोखर मन भरुन यावे अशा भावना सर्वांच्या मनामध्ये निर्माण झाल्या होत्या.

सभापती महोदय, निवृत्त होणा-या प्रत्येक सन्माननीय सदस्यांबद्दल बोलताना प्रत्येकाच्या मागे कोणी तरी एक मोठा माणूस होता असे सांगण्यात आले. सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी आणि स्व.सुधाकरराव नाईक यांच्या घराण्याबद्दल सांगितले गेले. सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम आणि सन्माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरदराव पवार यांच्या संबंधाबद्दल सांगितले गेले. सन्माननीय सदस्य श्री.विलासराव शिंदे आणि स्व.वसंतदादा पाटील यांच्या संबंधाबद्दल सांगितले गेले. या सगळयांपेक्षा एक वेगळया प्रवृत्तीचा माणूस गेली 30 वर्षे फकीरी वृत्तीने काम करीत होता, त्याच्या मागे कोणी नव्हते, असलेच तर संत गाडगेबाबा नक्की होते. अशा प्रकारचा माणूस या सभागृहात होता. त्यामुळे या सभागृहात होणारे कामकाज एका वेगळया दर्जापर्यंत जाऊन पोहोचते हे आपण सगळयांनी अनुभवले आहे. हा निसर्गाचा खेळ आहे. कोण किती काळ आपले सहप्रवासी म्हणून राहणार आहेत हे सांगता येत नाही. अगदी एक वर्षापेक्षा कमी कालावधी लाभलेल्या सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण असतील आणि 30 वर्षांची प्रदीर्घ सेवा करणारे आमचे बी.टी.भाऊ असतील. हा काळाचा महिमा आहे. सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम हे एम.टेक.झालेले आहेत. या सर्व निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांमध्ये पदवीधर, द्विपदवीधर आहेत, आपापल्या क्षेत्रात काम करणारे, सामाजिक जाण असणारे, बहुआयामी व्यक्तिमत्व धारण करणारे, केवळ विधानपरिषद हे क्षेत्र न मानणारे, जेथे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

असतील, ज्या क्षेत्रात काम करीत असतील त्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे, आपल्या कर्तृत्वाची पाऊलवाट तयार करणारे अशी ही सर्व माणसे या सभागृहात येतात. मला तर राहून राहून वाटते की, आम्ही तर पहिल्या टर्मचे सहप्रवासी आपल्याबरोबर आहोत. परंतु ज्यावेळेला या सदनाचे माजी सन्माननीय सदस्य स्व.ग.दि.माडगूळकर यांना या सभागृहातून निवृत्त होताना निरोप दिला गेला असेल, माजी सन्माननीय सदस्य श्री.ना.धों.महानोर यांना निरोप दिला गेला असेल त्यावेळी काय भावना व्यक्त झाल्या असतील याची कल्पना करणे अवघड आहे. कारण या माणसांनी सुध्दा साहित्य, कला व वेगवेगळया क्षेत्रात खूप मोठे काम केलेले आहे. अत्यंत उत्त्युंग व्यक्तिमत्व म्हणून समाजामध्ये त्यांचे स्थान आहे. सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांचे शिक्षण क्षेत्र असेल, सन्माननीय सदस्य श्री.गुरुमुख जगवानी यांचे आरोग्य क्षेत्र असेल. या सर्वांनीच आपल्या क्षेत्रातील कामे अतिशय प्रामाणिकपणे, अतिशय पारदर्शकपणे व समाजाच्या हितासाठी प्रसंगी संघर्षाची भूमिका घेऊन या सभागृहात काम केले व बाहेरही त्यांची दैदिप्यमान कारकीर्द या आमच्या सहका-यांची आम्हाला बघावयास मिळाली. हे आम्ही आमचे भाग्य समजतो. ते यापुढील काळात जे कार्य करणार असतील त्या सगळया कार्यात आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटवतील अशा प्रकारच्या भावना मी यानिमित्ताने व्यक्त करतो. ही जी भावना आहे ती निरोपाची नाही तर कृतज्ञतेची आहे. आपल्यामुळे आम्ही खूप संपन्न झालो, थोडेसे सुसंस्कृतही झालो. हे सांगायला अजिबात खेद वाटत नाही, आपल्या सगळयांना मन:पूर्वक शुभेच्छा देऊन मी माझे दोन शब्द संपवितो.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहातून निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना निरोप दिला जात आहे. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम आणि अन्य सदस्य आहेत. यापैकी काही सन्माननीय सदस्यांचा आणि माझा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संबंध आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम हे आमच्या मराठवाडयाचे भूमिपुत्र आहेत. नांदेडमध्ये कबड्डीच्या स्पर्धा होत असताना मी त्या काळात एक खेळाडू म्हणून तेथे हजर होतो.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि उद्घाटक म्हणून सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम यांचे भाषण ऐकण्याची संधी मला त्या काळी मिळाली. त्यावेळी मराठवाड्यातील भूमिपुत्र श्री.कमलकिशोर कदम हे उत्तम वक्ते आहेत असे वाटले. त्यानंतर मी या सभागृहामध्ये आल्यानंतर त्यांची काही मोजकीच भाषणे मला ऐकायला मिळाली. उत्तम प्रकारे विवेचन करण्याची शैली, मुद्देसूद मांडणी यामुळे माझ्या सारखा नवीन सदस्य त्यांच्या भाषणाने प्रभावित झाल्या शिवाय राहिला नाही. सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांच्या उर्वरित आयुष्यासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी मी मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, मी राज्यमंत्री असताना सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांचा आणि माझा संबंध आला. मला आठवते की, वैद्यकीय खात्यासंबंधीच्या एका प्रश्नावर या सभागृहामध्ये 30-35 मिनिटे चर्चा झाली होती. खरे तर त्या प्रश्नाच्या वेळी आणि प्रा. बी.टी.देशमुख सरांच्या प्रश्नांना उत्तरे देताना माझ्या अंगाला घाम फुटला होता. प्रा. बी.टी.सरांच्या प्रश्नांना उत्तर देणे हे अवघड काम होते. रात्री 2-2 वाजेपर्यन्त अभ्यास करुन प्रश्नाची समर्पक उत्तरे जातील की नाही याबाबत साशंकता होती. शेवटी एक अनुभवी आणि ज्येष्ठ सदस्य या नात्याने त्यांनी मला सांभाळून घेण्याचे काम केले. मध्यंतरी मी प्रा. बी.टी.देशमुख सरांना आर्थिक आणि भौतिक अनुशेष यामधील फरक समजावून सांगण्याची विनंती केली. त्यावेळी त्यांनी सभागृहाच्या लॉबीमध्ये जवळ जवळ 30 मिनिटे मला भौतिक आणि आर्थिक अनुशेष समजावून सांगितला. एखाद्या नवख्या सदस्याला सांभाळून घेण्याची अंगभूत वृत्ती प्रा. बी.टी.देशमुख सरांच्या अंगी आहे. मी त्यांना मनापासून शुभेच्छा देतो.

सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी अनेक मुद्यांवर या सभागृहामध्ये विस्तृतपणे विवेचन केलेले आहे. शैक्षणिक क्षेत्रात काम करीत असताना कायम विनाअनुदानित शाळांच्या बाबतीत "कायम" हा शब्द काढण्यासाठी ते सतत आग्रही राहिले. कै. वसंतराव काळे ही शिक्षण क्षेत्रातील नावलौकिक संपादन केलेली व्यक्ती. त्यांच्यानंतर त्यांची गादी उत्तम प्रकारे कोण चालवू शकेल याबाबतीत साशंकता होती. परंतु बापसे बेटा सवाई याप्रमाणे श्री. विक्रम काळे यांनी आपल्या वडिलांची गादी उत्तम प्रकारे सांभाळली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण यांचा या विधानपरिषदेतील कालावधी आठ-नऊ महिन्यांचा. पर्यावरणातील प्रदूषण आणि भविष्यात उद्भवणारे प्रश्न यावर त्यांनी या सभागृहामध्ये अभ्यासपूर्ण विवेचन केलेले आहे. त्यांची भाषाशैली उत्तम आहे. त्या जर या सभागृहामध्ये पुन्हा आल्या असत्या तर माझ्या सारख्या नवख्या सदस्याला बरे वाटले असते.त्यांच्या बाबतीत या सभागृहाचे नेते आणि माझे नेते यांनी व्यक्त केलेल्या भावना वाखाणण्यासारख्या आहेत. भविष्यामध्ये त्यांचा पक्ष त्यांना पुन्हा येथे येण्याची संधी दिल्या शिवाय राहाणार नाहीत अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सन्माननीय डॉ. गुरुमुख जगवानी, सन्मानीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी हे देखील निवृत्त होत आहेत. डॉ. एन.पी.हिराणी यांनी अनेक नाटकांतून उत्तम प्रकारे अभिनय केलेला असून त्यांच्या अभिनय कौशल्याचे उत्तम प्रकारे विवेचन या ठिकाणी केले गेले आहे. त्यांना या निमित्ताने माझी नम्र विनंती आहे की, त्यांनी अभिनयासहीत एक उत्तम प्रकारचा डायलॉग आपल्या भाषणातून बोलून दाखवला तर माझ्यासारख्याला आनंद झाल्या शिवाय राहाणार नाही. या सभागृहातून जे जे सदस्य निवृत्त होत आहेत त्या सर्वांना मी मनापासून शुभेच्छा देतो आणि या सभागृहामध्ये येणा-या सदस्यांसाठी आणि त्याच्या उर्वरित काळासाठी मनापासून शुभेच्छा देऊन मी रजा घेतो.

....नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनावणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, अतिशय जड अंत:करणाने निवृत्त होणाऱ्या माननीय सदस्यांना निरोप देत असताना माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, 11 सदस्यांपैकी चार सदस्य याठिकाणी पुन्हा निवडून आलेले आहेत. आदरणीय श्री.रामनाथ मोते, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेंद्र जैन आणि श्री.विक्रम काळे यांना मी मनापासून शुभेच्छा देतो आणि त्यांचे स्वागतही करतो. या 11 सदस्यांपैकी माझा निकटचा संबंध असणाऱ्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील पाच जागा रिक्त झाल्या आहेत. आमचे ज्येष्ठ सहकारी माननीय प्रा.बी.टी.देशमुख म्हणजे आमचे हेडमास्तर. खऱ्या अर्थाने या सभागृहातील आमचे ते नेते आहेत. या सभागृहात कसे बोलावे, कशा पध्दतीने आपले प्रश्न मांडावेत याचे मार्गदर्शन गेली चार वर्षे त्यांच्याकडून निश्चितपणे आम्हाला लाभले आहे. शिक्षण क्षेत्रातील आणि शिक्षकांचे प्रश्न मांडण्याची त्यांची पध्दत वाखाणण्याजोगी होती. विदर्भाचा अनुशेष, विदर्भाचे प्रश्न असतील ते कशा पध्दतीने मांडावेत हे आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख यांच्याकडून आम्ही शिकलो. गेली तीस वर्षे त्यांचा या सभागृहातील अनुभव आम्हाला मागील चार वर्षे पहावयास मिळाला. या अनुभवाला माझ्या जीवनात एक वेगळे स्थान निर्माण झाले आहे. प्रश्न मांडण्याच्या आत उत्तर काय द्यावे लागेल अशा प्रकारची जरब त्यांच्या प्रश्नामध्ये दिसून येत होती.

सभापती महोदय, माझ्या शेजारी बसणारे माननीय सदस्य श्री.विश्वनाथ डायगव्हाणे हे शिक्षकांचे प्रश्न अतिशय पोटतिडकीने मांडत असत. त्याचे मार्गदर्शन यापुढे मिळणार नाही. त्यांचा आदर्श आमच्यापुढे कायम राहणार आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांचे शैक्षणिक क्षेत्रातील काम मला ज्ञात आहे. ते राष्ट्रवादी पक्षाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. ते या सभागृहातून निवृत्त होत आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी यांचे कॉटन फेडरेशन व शैक्षणिक क्षेत्रातील काम मी पाहिले आहे. माननीय सदस्य श्री.विलासराव शिंदे यांचे संघटन कौशल्य अतिशय उत्तम आहे. त्यांच्या घरी जाण्याचा मला योग आला. त्यांच्याकडून मला चांगल्या प्रकारचा अनुभव मिळाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनावणे.....

सभापती महोदय,माननीय सदस्या ॲड.वंदना चव्हाण यांचे काम मी पाहिले आहे. समाजसेविका म्हणून त्यांनी केलेले समाजकार्य व पर्यावरणविषयक अभ्यासाचा अनुभव मिळाला. माननीय सदस्य श्री.गुरुमुख जगवानी यांनी माझ्या जळगाव जिल्हयाचे प्रतिनिधीत्व केले. जळगाव जिल्हयामधून येत असताना या सभागृहात खानदेशाचे प्रश्न मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या सभागृहाबाहेर रेल्वे प्रवासामध्ये आमची काळजी घेण्याचे काम ते करीत असत. यापुढे आमची रेल्वे प्रवासात कोण काळजी घेणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. यापुढेही सामाजिक काम त्यांच्याकडून होत राहो अशी मी सदिच्छा व्यक्त करतो. जे सदस्य निवृत्त होत आहेत त्यांना मनापासून शुभेच्छा देतो, त्यांना चांगले आरोग्य लाभो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो. जे चार सदस्य पुन्हा निवडून आले आहेत त्यांना शुभेच्छा देऊन माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आज आपण निवृत्त होणाऱ्या 11 सदस्यांना निरोप देत आहोत. त्यापैकी चार सदस्य पुन्हा निवडून आले आहेत, त्यांचे स्वागत करीत आहोत.

सभापती महोदय, योगायोगाने या सभागृहाला 11 प्रवेशद्वारे आहेत. चार सदस्य पुन्हा निवडून आले आहेत. 7 सदस्य सभागृहातून बाहेर गेलेले आहेत. त्यांना पुन्हा सभागृहात येण्यासाठी 7 प्रवेशद्वारे खुली आहेत. याठिकाणी पूर्वीच्या वक्त्यांनी जे मुद्दे मांडले त्यांची पुनरावृत्ती न करता एक-एक मुद्दा मांडून माझे भाषण पूर्ण करणार आहे.

सभापती महोदय, आदरणीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्याबद्दल एवढेच म्हणेन की, राज्यशास्त्राचा अभ्यास करणारे, समाजशास्त्राचा अभ्यास करणारे, अनेक पीएच.डी करणारे विद्यार्थी यांच्या दृष्टीने प्रा.बी.टी.देशमुख यांनी खूप काम करुन ठेवले आहे. राजकारणामध्ये कमी जास्त होऊ शकते. परंतु इतिहासाला त्यांची नक्की दखल घ्यावी लागेल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.विलासराव शिंदे यांना सहा वर्षे या सभागृहात काम करण्याची संधी मिळाली. ते माझ्या सांगली जिल्हयातील आहेत. सहकार क्षेत्रात, नगरपालिकेत आणि जिल्हा परिषदेत त्यांनी केलेले काम आम्ही सर्वांनी अतिशय जवळून पाहिले आहे. त्यांचे सर्वसमावेशक काम आणि अनन्यसाधारण संघटन कौशल्य आम्ही अनुभवले आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.गुरुमुख जगवानी यांच्याबद्दल अनेकजणांनी विचार मांडले आहेत. परंतु एक महत्वाची घटना मी सांगणार आहे. उल्हासनगर येथील 855 घरकुले नियमित करण्याचा विषय त्यांनी सभागृहात मांडला आणि सभागृहाच्या माध्यमातून ती घरकुले नियमित करुन दिली. त्यामुळे संपूर्ण सिंधी समाजावर असलेली टांगली तलवार दूर करुन त्या समाजातील लोकांना त्यांनी निश्चिंतता प्राप्त करुन दिली.

सभापती महोदय, माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांच्याबद्दल मला एवढेच म्हणावयाचे आहे की, त्यांच्या अंगी असलेले गुण म्हणजे त्यांचा करारीपणा आणि प्रत्येक प्रश्नाला सामोरे जाण्याचा धीरोदात्तपणा अतिशय महत्वाचा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.विश्वनाथ डायगव्हाणे हे माझ्यापेक्षा ज्येष्ठ आहेत. सभागृहात त्यांनी जी कारकीर्द करुन ठेवली आहे ती माझ्यासारख्या शिक्षक आमदाराला मार्गदर्शक ठरणारी आहे.

नंतर 3पी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे .....

सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण यांना अजून बरेच भवितव्य आहे त्यांनाही मी शुभेच्छा देतो. सन्माननीय सदस्य डॉ. एन.पी.हिराणी हे सभागृहात बसलेले असायचे पण त्यांच्याबद्दल मी फारसे ऐकले नव्हते परंतु आज मात्र अनन्यसाधारण असे त्यांचे काम असल्याचे ऐकायला मिळाले हेही लक्षात घ्यावे लागेल. या सर्व एकूण 11 सन्माननीय सदस्यांपैकी 4 सन्माननीय सदस्यांचे पुन्हा आगमन झालेले असल्याने त्यांना मी शुभेच्छा देतो. तसेच उर्वरित 7 सन्माननीय सदस्यांना त्यांची पुढील कारकीर्द व आयुष्य तसेच आरोग्य चांगले राहील अशी शुभेच्छाही देतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी प्रथम आपणाबद्दल तसेच या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांबद्दल, ज्यांनी सदनात भावना व्यक्त केल्या त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

महोदय, सध्या प्रामुख्याने निवडणुकीत जे बीभत्स स्वरुप आलेले आहे त्यावर निर्बंध आणावेत यासंबंधी काही सन्माननीय सदस्यांनी जे विचार प्रकट केले त्यांच्याशी मी सहमत आहे. सभागृहाने याबाबतीत निश्चितपणे काही निर्णय घेणे आवश्यक आहे. यासोबतच एक कार्यकर्ता म्हणून माझ्या मनात काही विचार आहेत. केवळ कार्यकर्ता म्हणून राजकारणात वर येणे अतिशय अवघड आहे. राजकारणात अशी अनेक बेटं निर्माण झाली आहेत. लोकशाही ही लोकशाही राहिली नाही तर ती एका अर्थाने कुटुंबशाही झालेली आहे. एकाच कुटुंबामध्ये सर्व सत्ता असते आणि कार्यकर्ता जन्मभर कार्यकर्ताच राहतो म्हणून हे कुठेतरी बदलले पाहिजे, याचा विचार पक्षाच्या नेतृत्वाने मनापासून करावा अशी माझी मागणी आहे. हा प्रश्न केवळ एखाद्या पक्षापुरता मर्यादित राहिलेला नाही तर सदनात जेवढे पक्ष आहेत त्या सर्वच पक्षानी याबाबत चिंतन करणे आवश्यक आहे. काही सन्माननीय सदस्य निवृत्त होत असल्यामुळे परखड बोलले तर वावगे होणार नाही ते या निमित्ताने मला बोललेच पाहिजे. दुसरी महत्वाची बाब म्हणजे सत्तेवर काही बंधनेही घातली पाहिजे. अमेरिका हा देश संपूर्ण जगावर राज्य करतो तरी त्या देशाच्या सर्वोच्च पदाची मुदत केवळ आठच वर्षे आहेत म्हणजेच दोनच टर्म. मग आपल्याला मर्यादा का नकोत ? तहहयात सत्तेत राहणार काय ? याचाही विचार झाला पाहिजे. या सभागृहात सुध्दा 15 वर्षाच्या वर कालखंड एका सदस्याला असू नये असे बंधन घालणे आवश्यक आहे. कारण सत्ता, सत्तेतून पैसा आणि पुन्हा कुटुंबाची सत्ता अशा प्रकारे तहहयात सत्तेत तेच तेच राहिले तर या लोकशाहीत सामान्य कार्यकर्त्याला काही किंमत राहणार नाही ही वस्तुस्थिती आहे. लोकशाही टिकवावयाची असेल तर काही गोष्टी आपल्याला करायलाच पाहिजे. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख आज सभागृहात उपस्थित आहेत ते देखील निवृत्त होत आहेत. आम्ही आज निवृत्त होत आहोत याचे आम्हाला बिलकूल दु:ख नाही, आम्ही समाधानी आहोत पण या सभागृहात प्रा. बी.टी. देशमुखांसारखा सदस्य असणे अत्यंत आवश्यक आहे हीच आमची खंत आहे. कारण आपल्यासारखा सुजाण सदस्य सभागृहात नसेल तर मागासलेल्या विभागाचे प्रश्न परखडपणे कोण मांडणार असा प्रश्न निर्माण होतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम ....

मागच्या अधिवेशनात सांगण्यात आले होते की, मराठवाडा आणि विदर्भाचा अनुशेष आता संपला आहे. परंतु 1994 मध्ये अनुशेषाच्या संदर्भात इंडिकेटर समितीची नियुक्ती करण्यात आली होती. या कमिटीने मराठवाडा आणि विदर्भाचा 6.5 हजार कोटींचा अनुशेष काढला होता तो अनुशेष 1 एप्रिल, 2010 रोजी संपला आहे हे आम्हाला मान्य आहे. 1994 ते 2010 या 16 वर्षामध्ये 50-60 हजार कोटी रुपये खर्चले गेले त्यामधून जो काही अनुशेष निर्माण झाला आहे तो अनुशेष सरकारच्या निदर्शनास सातत्याने आणण्याचे काम माननीय प्रा. बी.टी.देशमुख यांनी केलेले आहे. माननीय प्रा. बी.टी. देशमुख यांना या सभागृहाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळावयास पाहिजे होती असे मला वाटते. आपले येथे नसण्यामुळे मागासलेल्या भागाचे फार मोठे नुकसान होणार आहे. मा. प्रा.बी.टी.देशमुखांनी केवळ विदर्भाचेच नेतृत्व केले असे नाही तर त्यांनी विदर्भ आणि मराठवाडा या दोन्ही भागाचे नेतृत्व केले होते. माननीय अजितदादा पवार यांना मला असे सांगावयाचे आहे की, आम्ही आज निवृत्त होत आहोत म्हणून आपण वाईट वाटून घेऊ नका. या पूर्वी भौतिक अनुशेषासाठी 40 हजार कोटी रुपयांचे काम संपल्यानंतर उर्वरित महाराष्ट्राचे लागवड सिंचनाचे प्रमाण देशाच्या प्रमाणात 46 टक्क्यावर गेलेले आहे. परंतु मराठवाडयाचे सिंचनाचे प्रमाण 26 टक्के होणार आहे तर विदर्भाचे सिंचनाचे प्रमाण 28 टक्के होणार आहे. त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भातील सिंचनाचे प्रमाण व उर्वरित महाराष्ट्राच्या सिंचनाच्या प्रमाणात 20 टक्क्याचा फरक का आहे ? आम्ही पैशाचा हिशोब करीत नाही. पैशाचा हिशोब आम्हाला नको आहे. तुमच्या 100 एकरातील जमिनीतील 46 एकर जमिनीला पाणी मिळणार आहे व विदर्भातील एकूण 100 एकराच्या जमिनीपैकी 28 एकराच्या जमिनीलाच पाणी मिळणार आहे. पाण्याचे समन्यायी व्यवस्था नसेल आणि केवळ पैशाचाच हिशोब असेल तर मराठवाडा आणि विदर्भाला न्याय मिळणार नाही.

सभापती महोदय, या प्रसंगी मी सांगू इच्छितो की, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण व स्वर्गीय चिंतामणराव देशमुख हे महाराष्ट्राचे खरे द्रष्टे नेते होते. त्यांनी महाराष्ट्राची स्थापना होतांना असे सांगितले होते की, विदर्भ आणि मराठवाडयाचे नेतृत्व करणा-यांचा खरा कस लागणार आहे. महाराष्ट्रातील मागासलेल्या विभागाला आपल्या बरोबर आणण्यासाठी ख-या अर्थाने कस लागणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम ....

आहे. प्रसंगी मराठवाडा आणि विदर्भाला झुकते माप दिले तरी ते वावगे होणार नाही. त्यामुळे मा. अजितदादांनी सुध्दा मराठवाडा आणि विदर्भाला झुकते माप द्यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, या सभागृहात मी या पुढे बोलणार नाही. परंतु आम्ही आपल्याकडून न्यायाची अपेक्षा करीत आहोत. आम्ही आपल्याकडून अतिरिक्त मागण्यांची अपेक्षा करीत नाही. मी मागे म्हणालो होतो की, मा. अजितदादा आपण उर्वरित महाराष्ट्राचे आहात त्यामुळे आपण पूर्ण महाराष्ट्राचे व्हा. ज्याप्रमाणे मा. यशवंतराव चव्हाण व मा. वसंतराव नाईक तसेच मा. शरद पवार हे जसे पूर्ण महाराष्ट्राचे नेते आहेत त्याप्रमाणे आपण सुध्दा पूर्ण महाराष्ट्राचे नेते व्हा. आपल्याला तशी पार्श्वभूमी सुध्दा लाभलेली आहे. त्यामुळे आपण सुध्दा न्याय्य व्यवस्था आणण्यासाठी प्रयत्न करावा अशी निवृत्त होणा-या सर्व सदस्यांच्या वतीने मी इच्छा व्यक्त करतो.

सभापती महोदय, सभागृहात प्रश्नाच्या चर्चेच्या वेळेस माझे आणि मा. प्रा. बी.टी.देशमुख यांचे ब-याच वेळेस वादविवाद झाले होते. मा. प्रा. बी.टी.देशमुख यांच्यासह निवृत्त होणा-या सदस्यांचा एकच विचार आहे की, महाराष्ट्र हा अभंग राहिला पाहिजे,

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम.....

महाराष्ट्रातील सर्व विभागांचा न्याय्य विकास झाला पाहिजे अशा भावना व्यक्त करुन आणि या सभागृहाला वंदन करुन माझे भाषण पूर्ण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुमुख जगवानी (जलगांव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापति महोदय, मेरे कार्यकाल के दौरान इस उच्च सभागृह के सम्माननीय साथियों ने मेरा जो साथ दिया है, उसके लिए मैं उनका तहेदिल से शुक्रगुजार हूँ. "हिन्दुस्तान" यह शब्द यहां पर बैठे बैठे मेरे दिमाग में आया. मेरे बारे में सद्भावना प्रकट करते हुए माननीय सदस्यों ने उल्लेख किया कि मैं पाकिस्तान के सिंध प्रान्त से आया हूँ. मेरे बुजुर्ग ग्रेटर हिन्दुस्तान में पैदा हुए थे. 1947 के पहले हम हिन्दू थे और हिन्दू राष्ट्र में पैदा हुए थे. हिन्दुस्तान तो इतना अजीम है कि 1947 के बाद कितने ही विदेशी यहां पर आए और वे इस देश की नागरिकता लेकर राजनीति में आए गए. हमारे लिए तो कानून बनाकर दिया कि आप यहां पर आएं. माननीय सदस्यों को ऐसा नहीं कहना चाहिए कि आप सिंध प्रान्त से आए हैं. हमने पाकिस्तान अपना धर्म बचाने के लिए छोड़ा है, पैसे के लिए हमने पाकिस्तान नहीं छोड़ा है. अगर हम पैसे के लिए पाकिस्तान नहीं छोड़ते तो आज हमारा नाम अली, करीम या और कुछ होता. हम अपना धर्म बचाने के लिए यहां पर आए हैं. इसलिए माननीय सदस्यों से मेरी प्रार्थना है कि हम सिन्धियों के लिए कभी भी ये शब्द इस्तेमाल मत कीजिए कि हम पाकिस्तान से आए हैं.

सभापति महोदय, मैं इतना खुशनसीब हूँ कि मैंने अपने 6 साल के कार्यकाल में 3 मुख्यमंत्री और 3 उपमुख्यमंत्री देखे हैं. मैं समझता हूँ कि माननीय श्री. बी.टी. देशमुख ने भी एक कार्यकाल के दौरान इतने मुख्यमंत्री और उपमुख्यमंत्री नहीं देखे होंगे. मैंने अपने सिंधी समाज के लिए इस सदन में जो भी प्रपोजल पेश किए, उनके बारे में इस सदन के मेरे सभी साथियों ने सहयोग दिया है.

सभापति महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार ने बहुत अच्छी बात कही. माननीय श्री. छगन भुजबल ने भी कहा कि इस क्षेत्र में आगे आने के लिए सामाजिक कार्य बहुत जरुरी है. आज हमारे जैसे सामाजिक कार्य करने वाले लोगों का इस सभागृह में आना बहुत मुश्किल हो गया है. अगर आपकी सूचनाएं आपके अधिकार या सभागृह के समर्थन से आगे चलीं तो मैं उम्मीद करता हूँ कि भारतीय जनता पार्टी और शिवसेना के सहयोग से मुझे इस सदन में वापस आने का मौका मिलेगा. आप सभी माननीय सदस्यों ने मेरा साथ दिया, उसके लिए मैं आभारी हूँ. मैं उम्मीद करता हूँ कि कभी गरीबों का कार्य या मेरे समाज का कार्य रहेगा तो मैं कभी भी आपके पास आने में हिचकिचाहट महसूस नहीं करुंगा. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आज या सदनामध्ये आम्हा निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप देताना आमच्या बद्दल ज्या भावना व्यक्त करण्यात आल्या त्याबद्दल मी सर्वांचे मनापासून आभार मानतो.

आपल्या सर्वांच्या सान्निध्यात गेली 12 वर्षे कशी निघून गेली ते मला कळले सुध्दा नाही. आज आमच्या निरोपाचा समारंभ होत आहे. माझ्या पक्षाने मला दोन वेळा या सभागृहात आमदार म्हणून काम करण्याची संधी दिली. त्याबद्दल मी पक्षाचा सुध्दा मनापासून ऋणी आहे.

मला या निमित्ताने माझ्या नेत्याची मला आठवण येते. माझा जन्म वाशिम जिल्ह्यातील पुसद गावात झाला. मी मुळात ॲलोपथी डॉक्टर. माझे पुसद येथे हॉस्पीटल आहे. डॉक्टरच्या प्रॅक्टीसमध्ये मी समाधानी होतो. माझे नेते आणि मित्र स्व.सुधाकरराव नाईक यांच्या आग्रहा खातर मी राजकारणात पाय ठेवला. त्यांच्यामुळे मला पहिल्यांदा विधानपरिषदेवर काम करण्याची संधी मिळाली. तेव्हा मला त्यांची आठवण होणे साहजिकच आहे.

यानंतर श्री.गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी..

त्यानंतरच्या काळात आदरणीय श्री.शरद पवार यांनी मला येथे येण्याची संधी दिली होती आणि त्यानंतर माननीय उपमुख्यमंत्री श्री अजित पवार आणि माननीय गृहमंत्री श्री आर. आर. पाटील यांनी मला सांभाळून घेतले आहे. या सर्व नेते मंडळीचे जेवढे आभार मानावे तेवढे कमीच आहे. सभापती महोदय, मी जवळजवळ 12 वर्षे या सभागृहाचा सदस्य होतो त्यामुळे येथून पुढची टर्म मिळाली नाही याचे मला अजिबात वाईट वाटत नाही.त्याबद्दल माझ्या मनात काहीही खंत नाही. वास्तविक पाहता पुन्हा तिस-या टर्म करिता मला पक्षाकडून विचारण्यात आले होते . सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित दादा पवार यांनी त्याचा मघाशी उल्लेख देखील केला होता परंतु पक्षाने मला पुन्हा सदस्य म्हणून निवडून येण्याच्या बाबतीत विचारले असता मी त्यास अत्यंत विनम्रपणे नकार दिला आहे. आज माझे वय 74 वर्षाचे आहे. त्यामुळे या वयात कोठे तरी थांबले पाहिजे असा मी विचार केला आहे आतापर्यंत 40 वर्षाच्या काळात सामाजिक, शैक्षणिक, सहकार क्षेत्रात मी भरपूर काम केले आहे त्या कामाची आठवण उराशी जपून उर्वरित आयुष्य चांगल्या प्रकारे घालवावे असा मी विचार केला आहे..आपण कोठे तरी आता थांबले पाहिजे असेच मला वाटत होते. एका शायरने असे म्हटले होते की,

" रहने दो अपनी यादों के उजालों को साथ में
कौन जाने किस गली में जिन्दगी की शाम हो जाए "

तेव्हा ही संध्याकाळ जेव्हा व्हावयाची असेल तेव्हा होईल.

सभापती महोदय, गेल्या 12 वर्षाच्या कालखंडात आपण, माननीय उपसभापती आणि सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी मला भरभरुन प्रेम दिले त्याची शिदोरी मला उर्वरित आयुष्यात पुरेल. म्हणूनच अत्यंत समाधानाने मी येथेच थांबण्याचे ठरविले होते. सभापती महोदय, जवळजवळ 12 वर्षे मला आमदार म्हणून या सभागृहात काम करण्याची संधी मिळाली होती त्याचबरोबर अल्पकालावधीसाठी का होईना परंतु राज्यमंत्री म्हणूनही मी काम केले होते. त्याकरता आमच्या पक्षाच्या नेत्यांना मी धन्यवाद देतो.

सभापती महोदय, पुसद सारख्या शहरामध्ये विविध क्षेत्रात मी काम केले होते. आमच्या पक्षाच्या नेत्याच्या आशीर्वादामुळे 13 वर्षे मी नगरपरिषदेमध्ये नगरसेवक म्हणून काम केले होते

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी..

त्याचबरोबर त्यातील 5 वर्षे नगराध्यक्ष होण्याचा मान मला मिळाला होता. बाबासाहेब नाईक सहकारी सूत गिरणीचा मी पंधरा वर्षे अध्यक्ष होतो . ही सूत गिरणी सुस्थितीत आणण्याचे चांगले काम मी केले होते. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री अजित दादा पवार आणि माननीय गृहमंत्री श्री आर आर पाटील यांनी या सहकारी सूत गिरणीस भेट दिली होती त्यावेळी या गिरणीची प्रगती पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले होते.त्याची मला अजूनही आठवण आहे. सभापती महोदय कापूस पणन महासंघाचा अध्यक्ष म्हणून सतत 9 वर्षे काम करण्याची मला संधी मिळाली आहे. त्याचबरोबर ज्या शैक्षणिक संस्थेची स्थापना 1962 साली कै. वसंतराव नाईक यांनी केली होती त्या शैक्षणिक संस्थेचा 30 वर्षे अध्यक्ष राहण्याचे भाग्य देखील मला मिळाले आहे. या पेक्षा आणखी मोठे समाधान काय असू शकते ? हे सर्व समाधान बरोबर घेऊन मी उर्वरित आयुष्य व्यतित करणार आहे.सभापती महोदय, सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांचे मी पुन्हा एकदा आभार मानतो.

सभापती महोदय, या ठिकाणी बोलत असतांना सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री अजित पवार यांनी तसेच इतरही काही सन्माननीय सदस्यांनी माझ्या नाटय कलेबद्दल उल्लेख केला होता त्यासंबंधीची एक आठवण मी या ठिकाणी सांगू इच्छितो. नागपूर नगरीतच माझा नाटय कलेशी संबंध आला होता. 1955 ते 1960 या काळात मी नागपूर मेडीकल कॉलेजचा विद्यार्थी होतो त्यावेळी माझे नाटय प्रेम बहरले होते आणि पाच ते सात मराठी नाटकात मी कामे देखील केली होती. 1962-63 साली पुसद येथे विदर्भ साहित्य संघाचे रौप्य महोत्सवी अधिवेशन झाले होते त्या अधिवेशनासाठी कै. यशवंतराव चव्हाण, कै वसंतराव नाईक आणि कै. आचार्य अत्रे आले होते त्यांच्या उपस्थितीमध्ये हा रौप्य महोत्सवाचा कार्यक्रम झाला होता त्यावेळी " अंमलदार " हे नाटक आम्ही त्यांच्या समोर सादर केले होते आणि त्यांच्याकडून शाबासकी मिळवली होती हे सांगताना मला अत्यंत आनंद आणि अभिमान वाटत आहे त्याचबरोबर .त्या वेळी नागपूर युनिर्व्हसिटीतर्फे नागपूर इंटर युनिर्व्हसिटी कॉम्पीटीशनमध्ये खोलकुटे ट्रॉफी ठेवण्यात आली होती. ही ट्रॉफी आता आहे किंवा नाही हे मला माहीत नाही परतु 1956 साली नागपूर मेडीकल कॉजेजमधून एक नाटक सादर करुन बेस्ट ॲक्टरचे बक्षिस मिळवले होते.

नंतर श्री.सरफरे

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी. हिराणी....

1957 मध्ये पंडित जवाहरलाल नेहरुंनी दिल्लीमध्ये प्रथमच युथ फेस्टिव्हल घडवून आणला होता. त्यावेळी विविध युनिव्हर्सिटीच्या मुला-मुलींना त्याठिकाणी आपली कला सादर करण्यासाठी आमंत्रित केले होते. त्यावेळी तालकटोरा गार्डनमध्ये आम्ही जवळपास 1400 मुले व मुली दहा दिवस थांबलो होतो. त्याठिकाणी सुरु असलेल्या कार्यक्रमामध्ये आम्ही नागपूर युनिव्हर्सिटीमार्फत "तीन पावले" हे मराठी नाटक सादर केले होते. परंतु पुणे युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांची मराठी भाषा शुध्द असल्यामुळे आमच्या वैदर्भीय मराठी भाषेला किंमत मिळेल की नाही याची मला खूप भिती वाटत होती. मला याठिकाणी सांगण्यास आनंद वाटतो की, पुणे युनिव्हर्सिटीबरोबर असलेल्या नाटकाच्या शेवटच्या स्पर्धेमध्ये आमच्या नाटकाचा पहिला क्रमांक आला. त्या युथ फेस्टिव्हलमध्ये भाग घेऊन आमच्या मराठी नाटकाला बक्षिस मिळवून आम्ही नागपूरमध्ये आलो. त्यावेळी नागपूर युनिव्हर्सिटीचे व्हाईस चॅन्सेलर आमचे स्वागत करण्यासाठी रेल्वे स्टेशनवर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते आमचा सत्कारही करण्यात आला होता. मी याठिकाणी माझ्या आठवणी सांगत आहे. माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी एखादा नाटकातील उतारा बोलून दाखविण्याची मला विनंती केली, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी देखील मागणी केली. परंतु मला आपणास सांगावेसे वाटते की, 1955 ते 1960 मधील तो काळ होता, त्याला 50 वर्षे झाली आहेत. त्यामुळे आता राहिल्या आहेत त्या फक्त आठवणी. त्या आठवणींना सोबत घेऊन पुढील वाटचाल करण्याची माझी इच्छा आहे. सभापती महोदय, निरोप म्हटला की, मनाला थोडया वेदना होणे स्वाभाविक आहे. यवतमाळमध्ये एका कार्यक्रमामध्ये निरोपाचे भाषण करीत ग. दि. माडगूळकरांनी कवितेच्या ज्या दोन ओळी म्हटल्या होत्या त्या ओळी या निरोपाच्या भाषणाचा शेवट करीत असतांना मी आपणासमोर सादर करुन माझे भाषण संपवितो.

"आली निरोपाची वेळ, जीव भारावूनी जातो,
असू द्यावा प्रेमबंध आम्ही जाऊनी येतो"

धन्यवाद.जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, लोकशाहीच्या या पवित्र महामंदिरामध्ये हे सभागृह आपल्याला निरोप देत असतांना या सभागृहाचा निरोप घेण्यासाठी आपण उपस्थित असू नये ही गोष्ट योग्य न वाटल्यामुळे मी मुद्दाम याठिकाणी उपस्थित राहिलो आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये गेली 30 वर्षे मी काम करीत आहे. या कालावधीमध्ये लोकांचे शेकडो प्रश्न सुटलेले आहेत. संसदीय लोकशाहीमध्ये विन्स्टन चर्चिल यांचे पराभवाचे अतिशय सुप्रसिध्द उदाहरण सांगितले जाते. संसदीय लोकशाहीच्या वर्गामध्ये मी अनेक वर्षे शिकलो आहे आणि शिकविले आहे. 1939 ते 1945 पर्यंत जवळ जवळ 6 वर्षे चाललेल्या दुसऱ्या महायुध्दाच्या खाईमधून आपल्या देशाला बाहेर काढणाऱ्या विन्स्टन चर्चिल यांना उत्तम यश मिळाल्यानंतर सुध्दा पुढील निवडणुकीमध्ये त्यांच्या पक्षाचा पराभव झाल्यामुळे त्यांना बहुमत मिळू शकले नाही. पराभूत होणाऱ्या प्रत्येक व्यक्तिनी ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, मानवी शरीर हे जसे अमर नाही त्याप्रमाणे प्रतिनिधित्व सुध्दा हे कायम किंवा निरंतर असू शकत नाही. प्रतिनिधित्वाचा अंत कसा व्हावा याचाही विचार ज्याचा त्यालाच करावा लागतो. लोकशाहीमध्ये दुसरी एक महत्वाची गोष्ट मानली गेली आहे की, आपण ज्या उद्दिष्टासाठी काम करतो त्या उद्दिष्टामध्ये तडजोड करुन सभागृहात येण्याचा पर्याय स्वीकारावयाचा की त्या उद्दिष्टाशी तडजोड न करता पराभव स्वीकारावयाचा याचाही विचार करावा लागतो. ज्यावेळी आपल्याला या पराभवाने हे उद्दिष्ट उत्तमरित्या साध्य होईल असा मनाचा कौल मिळतो त्यावेळी त्यालासुध्दा सामोरे जावे लागते. अनुशेषाच्या प्रश्नाच्या बाबतीत मी या दुसऱ्या पर्यायाची निवड केली. मला ती गोष्ट समोर दिसत होती. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्याचा उल्लेख केला असला तरी तपशिलवार मी त्याबाबत उल्लेख करणार नाही. मी अतिशय प्रसन्न भावनेने, अंत:करणाने आणि कृतज्ञतेच्या भावनेने या सभागृहामध्ये निरोप घेत आहे. सभासदत्वाची गोष्ट दूर राहिली, यापूर्वी सुध्दा माझ्यावर एकदा असा प्रसंग आला होता. 1974 सालापासून पाटबंधारे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याची व्यवस्था बदलून टाकली.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यासाठी आम्ही काही प्रतिनिधींनी एक फार मोठा संघर्ष केला होता. मी 8-15 दिवस अहोरात्र जागरण करुन त्या विषयाच्या संबंधातील कागदपत्रे गोळा केली होती आणि एक मोठे बुलेटीन काढले होते. त्यावेळी विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी मोठी चर्चा देखील उपस्थित केली होती. 8-10 दिवसाच्या शारीरीक श्रमामुळे दोन-तीन दिवस मी सतत हॉस्पिटलमध्ये जाऊन येत होतो आणि वोक्हार्ड हॉस्पिटलच्या डॉ.चौबेसाहेबांसारख्या ज्येष्ठ तज्ज्ञांनी सुध्दा मला लेखी स्वरुपामध्ये असा सल्ला दिला होता की, आता तुम्ही भाषणे वगैरे करु नका. त्यावेळी माझ्या मनामध्ये जो विचार आला, तो चुकीचा आहे असे मला अनेकांनी सांगितले आणि एखाद्या वेळेस मलाही तसेच वाटले की अशी चूक करु नये. पण त्यादिवशी माझ्या मनामध्ये असा विचार आला की, आपण सभागृहामध्ये जाऊन हा विषय न मांडणे यामुळे होणारे नुकसान जास्त असेल म्हणून आपण सभागृहामध्ये गेले पाहिजे अशा प्रकारची भावना माझ्या मनामध्ये त्यादिवशी आली. त्यानंतर मी त्यादिवशी सदनामध्ये भाषण पूर्ण केल्यानंतर शेवटी उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल झालो. या निवडणुकीला सामोरे जाताना सुध्दा मला ही गोष्ट स्पष्टपणे दिसत होती आणि तसे ते दिसत असताना सुध्दा आपण अशा प्रकारे तडजोड स्विकारुन चांगल्यारितीने सभागृहामध्ये जाण्यापेक्षा, आपण ती तडजोड न स्विकारता पराभव स्विकारल्यामुळे ते काम पुढे जाईल अशा प्रकारची भावना माझ्या मनामध्ये सातत्याने राहिली आणि मी त्याप्रमाणे पराभवाला सामोरा गेलो.

सभापती महोदय, गेली 30 वर्षे या सदनामध्ये काम करीत असताना, या पवित्र अशा मंदिराने लोकशाहीची जी प्रतिष्ठा वाढविली, त्याची अनेक उदाहरणे माझ्या मनात, माझ्या डोळया समोर आहेत. सभापती महोदय, आज मी आपल्याला घंटी वाजविण्याची संधी देणार नाही. कारण मी आपल्याला हा त्रास अनेक वर्षे दिलेला असल्याने, त्या अगोदरच मी माझे भाषण संपविणार आहे. गेल्या 30 वर्षाच्या काळामध्ये या सदनामध्ये अनेक प्रश्न सुटतात हे मी पाहिलेले आहे. आपण ज्यावेळी सदनामध्ये सार्वजनिक हिताचे प्रश्न घेऊन बोलतो, त्यावेळेला चारही बाजुने जे बळ येते, तेव्हा आपल्याला असे वाटते की, आपण किती बलवान झालो आहोत. अमरावती पाणी पुरवठ्याच्या प्रश्नाच्या बाबतीत केंद्र शासनाच्या जिऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडियाचा रिपोर्ट होता की, हे गाव 100 टक्के बोअरच्या माध्यमातून पाणी पीत आहे आणि जर याबाबतीत ताबडतोब व्यवस्था केली नाही तर "This City will have to be evacuated" असा रिपोर्ट मध्ये उल्लेख

. . . .3 यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केला होता. त्यावेळी माननीय श्री.सुब्रमण्यम् साहेब नगर विकास विभागाचे मंत्री होते आणि त्यांच्याकडे पाणी पुरवठा विभाग होता. त्यांना देखील सदरहू रिपोर्ट मिळाला होता आणि त्याची एक प्रत माझ्या हातात होती. मी ज्यावेळी ते वाचून दाखविण्यास सुरुवात केली, तेव्हा माननीय सभापती, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आणि सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य या सर्वांनी माझ्या आक्रोशाला जो एक प्रकारचा पाठिंबा दिला म्हणजे त्यादिवशी मी अनेक वर्षे वर्गामध्ये जो सिध्दांत शिकलो आणि अनेक वर्षे शिकवला, त्याची मला प्रत्यक्ष अनुभूती त्यादिवशी अनुभवास मिळाली, म्हणजे जर सार्वजनिक महत्वाचा प्रश्न असेल तर तुमच्या बाहूमध्ये हत्तीचे बळ कुठून येते हे आपल्याला कळत देखील नाही. मग त्या प्रश्नासाठी एका बाजूला विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य उठून उभे राहतात. माननीय सभापती पुन्हा-पुन्हा विचारतात आणि सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्यांना उठून उभे रहाणे शक्य नसले तरी खाली बसून माननीय मंत्री महोदयांना सांगत आहेत की, "तुमचे हे बरोबर नाही. ही तुमची चूक आहे." मी सदनामध्ये अशा प्रकारची भावना अनेक वेळा अनुभवलेली आहे. त्या अनुभवाने माझ्या सदस्यत्वाला फार मोठी धन्यता मिळवून दिलेली आहे.

सभापती महोदय, मला या सदनामध्ये येऊन 8-15 दिवस देखील झाले नव्हते. या राज्याच्या निर्मितीसाठी जी चळवळ झाली, त्याचा मी एक अपरिहार्य असा भाग होतो आणि मला त्याचा सातत्याने अभिमान वाटत आला आहे. तसेच मी व्यवसायाने शिक्षक असल्यामुळे शिक्षक आणि शिक्षण, त्याचप्रमाणे या राज्याच्या निर्मितीच्या कार्यामध्ये सहभागी असल्यामुळे अनुशेषाचा प्रश्न ही माझ्या कामाची प्रमुख दालने राहिलेली आहेत आणि माझ्या जिव्हाळ्याचे विषय राहिलेले आहेत. अनुशेषाचा जो विषय आहे तो महाराष्ट्राच्या हिताचा नाही हे मी अनेक वेळा बोललो आहे. पण आज मी त्या विषयाबाबत बोलत नाही. पण आज निरोपाच्या भाषणामध्ये एकच गोष्ट सांगू इच्छितो की, या सदनामध्ये आल्यानंतर पहिल्या आठ दिवसामध्ये नागझरी येथे गोळीबार झाला होता. तेव्हा कापूस उत्पादक संघाच्या वतीने डॉ.बोकरे, भाई श्री.सुदाम देशमुख यांनी आंदोलन केले होते आणि मी त्या आंदोलनामध्ये देखील सहभागी होतो. त्यावेळी नागझरी येथे झालेल्या गोळीबारामध्ये माणसे मृत्युमूखी पडली. त्यावेळी विरोधी पक्षनेते माननीय श्री.ग.प्र.प्रधानसर होते आणि माननीय सर्वश्री.एन.डी.पाटीसाहेब, कानिटकर, मधु देवळेकर इ.होते. त्यावेळी मी देखील ...

.. . .3 यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वये सूचना दिली होती. सभागृहाचे कामकाज चालवित असताना सभापती महोदय, आपल्याला त्या जागेवरुन अनेक अडचणी असतात, याची जाणीव आहे आणि जेव्हा त्या जाणिवेतून चर्चा सुरु झाली, तेव्हा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्यावेळचे माननीय सभापती श्री.रा.सु.गवईसाहेब यांनी असा निर्णय दिला की, "हा विषय महत्वाचा आहे. त्या मुळे यावर चर्चा झाली पाहिजे ही सन्माननीय सदस्यांची सूचना मी मान्य करतो. उद्या दुपारी 12.00 वाजता किंवा 1.00 वाजता या विषयावर चर्चा होईल. पण माननीय सभापती यांनी असे सांगितल्याबरोबर सदरहू चर्चा आजच झाली पाहिजे असा विरोधी पक्षाकडून आग्रह सुरु झाला. परंतु माननीय सभापती यांनी त्याबाबत निर्णय दिलेला असल्यामुळे ते आपल्या निर्णयावर कायम राहिले. मग विरोधी पक्षाने सभात्याग केला. मी मुद्दाम त्यावेळचे प्रोसीडींग पाहून आलो. पण त्यावेळी विरोधी पक्षाने सभात्याग केल्यानंतर माननीय सभापतींनी असे सांगितले की, "तुम्ही जर सभात्याग करणार असाल तर उद्या ही चर्चा करण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही."

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ D/ KTG/ MMP/ प्रथम सौ. रणदिवे.... 17:55

प्रा. बी. टी. देशमुख...

सभापती महोदय, मी त्यावेळी सभागृहात उठून उभा राहिलो आणि माननीय सभापतींना असे म्हणालो की, "महोदय, मी सुध्दा नियम 93 अन्वयेची सूचना दिलेली आहे. विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष याच्या बाहेर सुध्दा पुष्कळ जग शिल्लक आहे. मी बहिष्कारामध्ये सामील नाही. आपण मला चर्चा उपस्थित करण्याची संधी दिली पाहिजे". मी आज मुद्दाम ती सर्व चर्चा पाहून या ठिकाणी आलो आहे. माननीय सभापतीच्या तोंडून असे उद्‌गार निघाले की, "मग चर्चेमध्ये पहिले नाव प्रा. बी.टी. देशमुख यांचे राहील आणि प्रा.बी.टी.देशमुख या चर्चेला सुरुवात करतील" आपल्याला माहीत आहे की, विरोधी पक्ष नेत्यांचा तो अधिकार असतो. दुसऱ्या दिवशी तो विषय दिवसाच्या कामकाजाच्या क्रमामध्ये आला. मला विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य येऊन भेटले ते असे म्हणाले की, "विरोधी पक्ष नेत्यांचा तो अधिकार आहे." त्यावेळी मी असे म्हटले की, "माननीय विरोधी पक्ष नेते श्री. ग.प्र. प्रधान सर यांनी हा विषय मांडला तर मला अतिशय आनंद होईल. पण चर्चाच होणार नसेल तर मला ते मान्य होणार नाही." या सर्व घटनाक्रमामुळे दुसऱ्या दिवशी ती चर्चा उपस्थित करण्याचे कर्तव्य मला पार पाडावे लागले.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये लोकांचे शेकडो प्रश्न सुटलेले, येथील लोकप्रतिनिधींनी सोडविलेले मी आपल्या डोळयांनी पाहिलेले आहे. अतिशय पवित्र अशा प्रकारची ही प्रक्रिया आहे. संघर्ष करत असताना बाळासाहेब भारदे यांनी या विषयी मर्यादा घालून दिलेल्या आहेत की, "वार करत असताना वैर करण्याची भावना मनामध्ये ठेवू नये. वार तर करावाच लागतो. वार करणार नाही तर लढाई होणार नाही. वार करत असताना वैराची भावना मनामध्ये ठेवू नये आणि दुजाभाव दाखवत असताना सुध्दा बंधुभाव मनामध्ये असला पाहिजे. वाद आणि संवाद याची फेक आणि लोकांची भलाई हीच आपली कमाई आहे असे जर मानले तरच लोकशाहीची पुण्याई कृतार्थ होईल. बहुमत आहे म्हणून बेपर्वाई नको आणि बहूमत नाही म्हणून दांडगाई नको." म्हणून सभापती महोदय, मला मनापासून धन्यता वाटते की, गेल्या 30 वर्षात मी माझी जागा सोडून कधी ही वेलमध्ये गेलो नाही. मला माझ्या गुरुंनी तो बोध दिला होता. सभापती महोदय, वेळ संपल्याची घंटी वाजविण्याची संधी आज आपल्याला देऊ नये अशा प्रकारची तीव्र भावना माझ्या मनामध्ये आहे. या सभागृहाचा मी मनापासून आभारी आहे. 30 वर्षांचा प्रचंड असा कालखंड माझ्या मतदारसंघाने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मला दिला. या सभागृहांनी आणि सभागृहातील उभय पक्षांनी माझी ही भूमिका मान्य करुन काम करण्याची संधी मला मिळाली. त्यासंबंधीचा भेदभाव मनामध्ये न ठेवता एखाद्या विषयाला पुढे नेण्याचे काम मला करता आले. यामध्ये दोन्ही बाजूच्या पक्षाने जी भूमिका घेतली त्याचे फार मोठे श्रेय त्यांना आहे असे मानणारा मी आहे.

सभापती महोदय, शेवटी मी एकच गोष्ट सांगू इच्छितो की, लोकशाहीमध्ये आपण या ठिकाणी येऊन जे काम करतो ते लोक पहात असतात. ज्या दिवशी आपल्याला असे वाटते की, आपल्या न येण्याने सुध्दा या कामाला जास्त न्याय मिळेल. त्या दिवशी, ज्या व्यथा आपण या ठिकाणी मांडतो, जी उद्दिष्टे आपण या ठिकाणी घेऊन येतो, ती साध्य होण्याचा मार्ग प्रशस्त होतो निवडणुकीमध्ये पुढे काय होणार हे सुध्दा आपल्याला कळते. ते कळत नाही अशातला भाग नाही आणि ते ज्या वेळी कळते त्यावेळी त्याला आनंदाने सामोरे जाण्याची तयारी ठेवणे हा त्यावरील अतिशय उत्तम उपाय व्यथांच्या सोडवणुकीसाठी असतो. महाराष्ट्र राज्याची प्रगती आपल्याला पुढे न्यावयाची असेल तर या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये हा विषय आपण मनापासून सोडविला पाहिजे आणि ही सभागृहे तो निश्चितपणाने सोडवतील.कारण त्या शिवाय दुसरा तरणोपाय नाही. सभापती महोदय, शेवटी पुन्हा एकदा मी आपले आभार मानतो. सर्व माननीय सभापतींनी माझ्या कामावर अत्यंत अलोट प्रेम केले. व्यक्तीगत जीवनामध्ये अनेक संधी उलटया-सुलटया येत असताना मी त्यात कधी पडलो नाही, याचे अनेक साक्षीदार आहेत. सभापती महोदय, अनेक चांगल्या संधी समोर येत असताना त्याला मी बळी न पडता काम करीत राहिलो. ज्या मार्गावरुन चालण्याचे स्वीकारले त्याच मार्गाने प्रवास केला. त्यामुळे या सभागृहाचा निरोप घेत असताना मी अतिशय प्रसन्न मनाने या सभागृहाचा निरोप घेत आहे. मी मनापासून आपला आभारी आहे. विरोधी पक्ष नेत्यांचा, सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांचा आणि उभय बाजूच्या सन्माननीय सदस्यांचा आणि या सभागृहाचा मी अत्यंत आभारी आहे. आपल्या सभागृहाच्या कामकाजाची सुरुवात आपण वंदे मातरम या गीताने करतो. "वेद मंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम " असे या गीता विषयी महाराष्ट्रातील एका महाकवीने लिहून ठेवले आहे. आता लोकशाहीच्या या महामंदिराविषयी बोलावयाचे झाल्यास मी असे म्हणेन,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख....

वंद्य हे मंदिर आम्हा वेद मंत्राहूनही
धन्य आम्ही जाहलो इथे 30 वर्षे राहुनी
लोक व्यथांना लोपविण्याचे सामर्थ्य इथले पाहुनी
धन्य आम्ही जाहलो इथे 30 वर्षे राहुनी
वंद्य हे मंदिर आम्हा वेद मंत्राहूनही

सभापती महोदय, अत्यंत कृतार्थतेच्या भावनेने या सभागृहाला मी मनापासून वंदन करीत आहे व संपूर्ण कृतकृत्यतेच्या भावनेने या सभागृहाचा आदर पूर्वक निरोप घेत आहे.

(संपूर्ण सभागृहाने उभे राहून टाळयांच्या गजरात सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी. देशमुख यांना शुभेच्छा दिल्या)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : या सभागृहाचे 11 सन्माननीय सदस्य आज निवृत्त होत आहेत. त्यापैकी सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र जैन, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम वसंतराव काळे, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ दादा मोते आणि सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर भास्कर तांबे हे चार सन्माननीय सदस्य पुन्हा या सभागृहात निवडून आलेले आहेत. त्यांचे मी या ठिकाणी अभिनंदन करतो, स्वागत करतो. या व्यतिरिक्त या सदनाचे 7 सदस्य यापुढे सदस्य म्हणून या सभागृहात येणार नाहीत परंतु त्यांनी या सदनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्वसामान्य समाजाकरिता जे काम केलेले आहे त्या कामाच्या अनुषंगाने या ठिकाणी जवळजवळ तीन तास सदनाच्या दोन्ही बाजूने सदनाचे नेते त्याचबरोबर विरोधी पक्ष नेते आणि अन्य सदस्यांनी आपल्या उत्स्फूर्त भावना या ठिकाणी मांडल्या.

सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम हे माझ्याबरोबर राज्याचे मंत्री म्हणून सुध्दा काम करीत होते. ज्यावेळी मी स्वत: आमदार होतो तेव्हा ज्या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम बसतात ते ठिकाण त्यांचे आणि त्याच्या बाजूला सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी जे ठिकाण घेतलेले आहे ते माझे होते. आम्ही दोघेही बॅक बेंचर्स होतो. त्यावेळी आमचा सातत्याने एक विचार होता की, कोणत्या ना कोणत्या मार्गाने महाराष्ट्रामध्ये असमतोल विकासाची भावना सातत्याने तीव्र होत आहे, विदर्भाच्या अनुषंगाने, मराठवाड्याच्या अनुषंगाने, कोकण विभागाच्या अनुषंगाने असमतोल विकासाच्या संदर्भात दिवसेंदिवस तीव्र भावना निर्माण होत आहे आणि त्यामुळे अखंड महाराष्ट्राचे आमचे जे स्वप्न आहे ते नकळत काही प्रमाणात अडचणीत येईल की काय अशा पध्दतीची जी भावना आहे ती कोणत्या पध्दतीने सोडवावयाची यासाठी आम्ही लॉबीत आणि या ठिकाणी सातत्याने विचार करीत होतो. अलीकडच्या काळामध्ये सुदैवाने महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेऊन विशेषत: पाटबंधारे विभागाची जी तरतूद वाढविली त्यावेळी आम्ही दोघेही खरे खूश झालो. जरी दोन, तीन, चार वर्षात आम्ही समतोल विकास गाठू शकलो नाही तर त्यादृष्टीने महाराष्ट्र शासनाने टाकलेले हे अत्यंत महत्वाचे पाऊल आहे. त्यावेळी आम्ही शेजारच्या आंध्र प्रदेशच्या बाबतीत सातत्याने बोलत असू. त्या आंध्र प्रदेशमध्ये इरिगेशनसाठी जास्तीत जास्त अर्थसंकल्पीय तरतूद केली जाते. ते कधीही केंद्र सरकारला दाद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

देत नव्हते. किंबहुना तुम्ही आम्ही ज्यावेळी चर्चा करतो त्यावेळी तुमच्या आमच्या बरोबर सुध्दा ते कधी सरळ बोलत नव्हते. परंतु अर्थसंकल्पामध्ये जास्तीत जास्त तरतूद करुन सिंचनासाठी आंध्र प्रदेशमध्ये जास्तीत जास्त पैसे कसे येतील आणि सिंचनाची क्षमता कशी वाढेल यासंबंधी ते कार्यरत होते याबद्दल आम्ही चर्चा करीत होतो. सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम हे अतिशय परखड विचाराचे आहेत. त्याचा सखोल अभ्यास आहे. ते अत्यंत कमी बोलणारे आणि एखाद्या प्रश्नाच्या संदर्भात त्यांचे अत्यंत पक्के मत असले तर मग ते कोणाचीही भीड न बाळगता बोलतात.. ते मनाने अत्यंत मोकळे आहेत. यापूर्वी एकदोन वेळा त्या वेळच्या माननीय सभापतींबरोबर नकळत त्यांची मतभिन्नता झाली. त्यावेळी शेवटी मी सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम साहेबांना विनंती केली. आम्ही दोघेही त्या ठिकाणी बसत होतो. ते माझे म्हणणे मानत होते आणि मी देखील त्यांचे म्हणणे मानत होतो. म्हणून त्या दिवशी ती मतभिन्नता निघून गेली. अशा पध्दतीचे त्यांचे व्यक्तिमत्व होते. महाराष्ट्रामध्ये अत्यंत प्रभावी काम करण्याची ज्यांची उमेद आहे, वैचारिक बैठक आहे असे आपले सर्वांचे मित्र सन्माननीय सदस्य डॉ. कमलकिशोर कदम साहेब निवृत्त होत आहेत. अन्य कामाच्या निमित्ताने ते सभागृहामध्ये काम करीत आहेत. त्यांच्या पक्षामध्येही त्यांचे प्रभावी काम आहे. सन्माननीय श्री. पवार साहेब आणि त्यांच्या अन्य सहकाऱ्यांचा त्यांच्यावर अढळ विश्वास आहे. अन्य क्षेत्रामध्ये त्यांनी प्रभावी काम करावे, मनन करावे आणि महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने त्यांनी आम्हा सर्वांना सातत्याने वैचारिक फार मोठी देणगी द्यावी आणि या पुढच्या काळात सुध्दा काम करण्याच्या दृष्टीने आम्हाला सहकार्य करावे अशी माझी त्यांना सदनामार्फत विनंती आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

सन्माननीय सदस्य श्री.गुरुमुख जगवानी हे अत्यंत कमी बोलणारे माझे मित्र आहेत. परंतु एखादे काम असेल तर माझ्या दालनामध्ये 5 मिनिटे, 15 मिनिटे किंवा अर्धा तास, तास झाला तरी मी जोपर्यंत ठीक आहे असे म्हणत नाही तोपर्यंत ते न हालणारे असे माझे सिन्सियर मित्र आहेत. माझे मराठी त्यांना समजत नव्हते आणि त्यांचे हिंदी मला समजत नव्हते. तरी सुध्दा आम्ही दोघेही प्रयत्न करीत होतो. उल्हासनगरचा एक अत्यंत कठीण इश्यू होता. तो इश्यू सोडविण्यासाठी सरकारनेही त्यांना मदत केली होती. त्यांनीही त्यासाठी खूप प्रयत्न केले होते. सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि आमच्या सर्व मित्रांनी ज्यावेळी मनावर घेतले त्याच वेळी उल्हासनगरच्या नागरी इमारतींचा प्रश्न मार्गी लागला.

सन्माननीय सदस्य श्री.विलासरावजी शिंदे हे सांगली जिल्हयातील एक नेतृत्व आहे. मघाशी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी किंवा सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे स्व.यशवंतराव चव्हाण साहेब, स्व.वसंतदादा पाटील आणि त्यानंतरच्या काळात म्हणजे सन्माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरदराव पवार यांच्या कुशल नेतृत्वाखाली जवळजवळ 40 वर्षे काम करणारे सांगली जिल्हयातील एक कणखर नेते आहेत. अनेक क्षेत्रात काम करीत असताना कणखर विचार असणारे, कोणत्याही पध्दतीचे संकट आले तरी त्याला न डगमगणारे आणि पक्षाकरिता सर्व शक्ती पणाला लावणारे सन्माननीय सदस्य श्री.विलासराव शिंदे आहेत. त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने संधी दिली होती. यापूर्वी सुध्दा सन्माननीय उपमुख्यमंत्री यांनी सांगितल्याप्रमाणे एकदा श्री.विलासराव शिंदे यांची पश्चिम महाराष्ट्रात 1978 साली मोठी लढत झाली होती. स्व.राजारामबापू पाटील, श्री.एन.डी.पाटील आणि श्री.विलासराव शिंदे यांची ती लढत होती. सन्माननीय उपमुख्यमंत्री यांनी सांगितल्याप्रमाणे त्यावेळी परिस्थिती निर्माण झाली. स्व.राजारामबापू पाटील आणि श्री.एन.डी.पाटील हे नंतर मंत्री झाले आणि श्री.विलासराव शिंदे यांना आमदार म्हणून काम करावे लागले.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी हे स्व.सुधाकरराव नाईक यांचे जिवलग सहकारी आहेत. डॉ.हिराणी आणि माझा जवळजवळ 20 वर्षांचा परिचय आहे. सहकार क्षेत्र असेल, सामाजिक क्षेत्र असेल, शैक्षणिक क्षेत्र असेल या सर्व क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करणारे विदर्भातील एक आगळे वेगळे कार्यकर्ते म्हणून त्यांच्याकडे पाहणे गरजेचे आहे. सदनामध्ये सुध्दा ते एखाद्या प्रश्नासाठी हिरिरीने प्रयत्न करीत होते. माझे लक्ष वेधण्याचाही ते प्रयत्न करायचे, पण मी त्यांना संधी दिली नाही म्हणून ते कधी रागावले नाहीत किंवा त्यांनी कधी नाराजीही व्यक्त केली नाही. पण संधी मिळाली तर त्यांच्या मनामध्ये जी सामाजिक खदखद असेल त्यादृष्टीने तो प्रश्न मांडून त्या प्रश्नाचे उत्तर ते घेत होते. आज सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी यांना त्यांच्या पक्षाने पुन्हा संधी देण्याची तयारी दाखविली होती. परंतु त्यांनी मोठया मनाने सांगितले की, मला पक्षाने खूप संधी दिलेल्या आहेत. त्यांनी इतर क्षेत्रात काम करण्यासाठी घेतलेला हा निर्णय अन्य कार्यकर्त्यांनी डोळयासमोर ठेवण्यासारखा आहे. पुढील काळामध्येही त्यांना चांगले काम करता यावे यादृष्टीने मी माझ्या भावना व्यक्त करतो.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

सन्माननीय सदस्य श्री.विश्वनाथ उमाजी डायगव्हाणे हे शिक्षकांचे अनेक प्रश्न अत्यंत परखडपणे मांडून या सदनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत होते. त्याच प्रमाणे अनेक प्रश्न सोडवून घेण्याचा ते प्रयत्न करीत होते.

सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख हे गेली 30 वर्षे या सदनाचे सदस्य म्हणून आहेत. तेही निवृत्त होत आहेत. मी राज्यमंत्री आणि मंत्री होतो तेव्हा पासून प्रा. बी.टी.देशमुख साहेबांना पाहिलेले आहे. प्रा. बी.टी.देशमुख सरांचा प्रश्न असला की रात्री अडीच-तीन वाजेपर्यन्त अभ्यास करुन सकाळी सभागृहामध्ये येत असताना बी.टी.सरांच्या 13 उपप्रश्नांचा पूर्ण अभ्यास केलेला असला तरी त्याच्या 14व्या आणि 15व्या प्रश्नात अडकणार नाही याची पूर्ण काळजी घेऊन येत होतो. त्यांच्या मनामध्ये व्यक्तिगत आकस कधीही नव्हता. सर्वसामान्य समाजाचे प्रश्न सुटावेत, विदर्भाच्या अनुशेषाच्या बाबतीत न्याय मिळावा या सारखे अनेक व्यापक प्रश्न ते या सदनामध्ये विचारीत होते आणि विचारलेल्या प्रश्नाची अचूक उत्तरे मिळतील यादृष्टीने त्यांचा प्रयत्न असायचा. प्रा. बी.टी.देशमुख सरांचे वैशिष्ट्य असे की, त्यांची वैचारिक बैठक अत्यंत परखड आणि कणखर आहे. एकदा स्व. सुधाकरराव नाईक साहेबांनी मला एक कामगिरी दिली होती. स्व. सुधाकरराव नाईक हे त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री होते आणि मी प्रदेश काँग्रेसचा अध्यक्ष होतो. त्यांनी मला प्रा.बी.टी.देशमुख सरांशी व्यापक चर्चा करण्यास सांगितले. आम्ही दोघे तासभर एकत्रित बोललो. मी त्यांना सांगितले की, "बी.टी.सर महाराष्ट्राच्या, विदर्भाच्या आणि शैक्षणिक क्षेत्राच्या हिताच्या दृष्टीने माननीय मुख्यमंत्री आणि मी असे ठरविलेले आहे की, तुम्ही महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री म्हणून आमच्याकडे यावे. त्यामुळे शिक्षण क्षेत्राचा विकास होईल, महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने काम करता येईल." त्यावेळी त्यांनी सांगितले की, "या प्रश्नावर व्यापक चर्चा करावयाची आहे असे जेव्हा मला तुम्ही सांगितले त्याच वेळी, आपण अशी चर्चा करण्याकरिता माझ्याकडे येणार हे मी हेरले होते". त्यांनी मला असेही सांगितले की, "मी माझ्या वैचारिक बैठकीवर ठाम आहे. काही केले तरी मी माझ्या विचारापासून बाजूला होणे बरोबर नाही. त्यामुळे तुम्ही देऊ केलेले पद मी स्वीकारु शकत नाही." अशा कणखर पध्दतीने उत्तर देणारे महाराष्ट्रातील एक तेज:पुंज व्यक्तिमत्व असे बी.टी.सरांच्या बाबतीत म्हणावे लागेल. दुर्दैवाने अनपेक्षितपणे ते पराभूत झाले. तडजोड की तत्व या दोन गोष्टी त्यांच्यापुढे होत्या. त्यांनी तडजोड स्वीकारली असती तर कदाचित ते तरले असते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

पण तत्व म्हणून ते पुढे गेले. त्यावेळी नकळत राजकीय दृष्ट्या एक अपघात झाला. मी फक्त एवढेच सांगेन की बी.टी.साहेब तुम्ही ज्या ज्या क्षेत्रात आहात त्या त्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्रातील सर्व कार्यकर्त्यांना सातत्याने मार्गदर्शन करा. राजकीय आणि वैचारिक जबाबदारीच्या बाबतीत योग्य पध्दतीने मार्गदर्शन करा. आपण या सदनामध्ये पुनश्च यावे यासाठी सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचा आपणाला पूर्ण पाठिंबा आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना हेमंत चव्हाण ह्या अत्यंत अल्पकाळ या सदनाच्या सदस्या होत्या. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार आणि त्यांच्या अन्य सहका-यांनी सांगितले की, श्रीमती वंदना चव्हाण यांच्याकरिता राष्ट्रीय किंवा राज्य पातळीवर जरुर विचार करता येईल.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

पण या सदनामध्ये मी सांगेन की, अल्पकाळात त्यांनी विशेषत: पर्यावरणाबाबत केलेली जी भाषणे आहेत ती इतकी उत्कृष्ट आहेत की, It is a record. म्हणजे पर्यावरणाच्या दृष्टीने जर समजा अगदी अचूक मार्गदर्शन मिळावे यादृष्टीने वाचण्यासारखे असणारे डॉक्यूमेंट म्हणून जर बघितले तर ॲड.वंदना चव्हाण यांनी केलेली अत्यंत उत्कृष्ट अशी भाषणे या ठिकाणच्या लायब्ररीमध्ये उपलब्ध आहेत. इतकी उत्कृष्ट त्यांची त्या विषयावर तयारी होती. मला खात्री आहे की, नजिकच्या काळामध्ये त्या राष्ट्रीय पातळीवर किंवा अन्य ठिकाणी त्यांच्या पक्षाच्या माध्यमातून जातील आणि अत्यंत चांगले काम करण्याची त्यांना संधी मिळेल. यापेक्षा अधिक न बोलता सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम आणि श्री.गुरुमुख जगवानी, प्रा.बी.टी.देशमुख सर या सर्वांना भावी आयुष्यामध्ये यापेक्षा जास्त उत्कृष्ट काम करण्याची शक्ती परमेश्वराने द्यावी अशी प्रार्थना करतो आणि मी माझे भाषण पूर्ण करतो.

निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याच्या निमित्ताने आता विधानभवनाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या पोर्चमध्ये एकत्रित छायाचित्र काढण्याचा आणि त्यानंतर विधानभवनाच्या प्रांगणात चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कृपया सर्वांनी उपस्थित रहावे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शनिवार, दिनांक 4 डिसेंबर, 2010 रोजी सकाळी 10.00 ते 12.45 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या बैठकीमध्ये म.वि.प.नियम 97 अन्वये अल्पकालीन प्रस्तावावरील अपूर्ण चर्चा मंत्रीमहोदयांच्या उत्तरासह पूर्ण करण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 17 मिनिटांनी, शनिवार, दिनांक 4 डिसेंबर, 2010 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही